१९६८०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. २९२
REFBK-0011421
REFBK-0011421


तमिळनाडु
पं. महादेवशास्त्री जोशी

भारत परिचय पुस्तकमाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २१०३०५ वि:
क्रमांक २६२ नों. दि.



# तमिळनाडु

[ सांस्कृतिक परिचय ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८२२

लेखक
पं. महादेवशास्त्री जोशी

प्रथमावृत्ति
शके १८८२
सन १९६०

REFBK-0011421

ज्ञानराज प्रकाशन, पुणें २

मूल्य तीन रुपये

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | तमिळहम् | १ |
| २. | साहित्य आणि साहित्यकार | १२ |
| ३. | आळवार आणि नायन्मार | ३९ |
| ४. | देव–धर्म | ६८ |
| ५. | मंदिरें–गोपुरें | ७८ |
| ६. | नाट्य–नृत्य–उत्सव | १०० |
| ७. | गिरिजन आणि हरिजन | १२८ |


* * *

चित्रकार

श्री. सुधाकर खासगीवाले


प्रकाशक

**सौ. सुधा जोशी**

ज्ञानराज प्रकाशनाकरितां

४२१ शनिवार पेठ, पुणें २.

मुद्रक

**चिं. ग. वझे**

साधना प्रेस

४३०/३१ शनिवार पेठ, पुणें २.

सन १९६०

# प्रास्ताविक

या पुस्तकानें मी एका नव्या वाङ्मयीन कार्याचा शुभारंभ करीत आहें. ‘ भारतपरिचय पुस्तकमाला ’ हें या उपक्रमाचें नांव आहे. या मालेंतलें पहिलें पुष्प म्हणून ‘ तमिळनाडु ’ हें पुस्तक आज वाचकांच्या सेवेला सादर होत आहे. तमिळनाडच्या सांस्कृतिक जीवनाचा सामान्य परिचय या पुस्तकाच्या द्वारें घडावा अशी अपेक्षा आहे. अशाच प्रकारें भारताच्या प्रत्येक प्रदेशाचा अथवा भाषिक राज्याचा सांस्कृतिक परामर्ष या पुढें एकेका पुस्तकाच्या द्वारें घेण्याचा माझा संकल्प आहे.

भारत हा एक खंडप्राय देश आहे हें आतां कोणाला सांगायची गरज नाहीं. एक भाषा बोलणाऱ्यांचीं भिन्न राष्ट्रें जगाच्या नकाशावर आपण पाहूं शकतों. पण एक नव्हे, अनेक नव्हे; तर चौदा भाषा बोलणाऱ्यांचें मिळून ‘ एक राष्ट्र ’ हें उदाहरण फक्त भारताचेंच आहे. ‘ पृथिव्यै समुद्र-पर्यन्ताया एकराळिति ! ’ भारताचा हा मोठा गौरव आहे.

भारताचे भिन्न भिन्न प्रदेश आतां भाषिक तत्त्वावर विभागण्यांत आले आहेत. त्या त्या भाषिकांच्या सोईसाठीं आणि उत्कर्षासाठीं म्हणून ही अंतर्गत विभागणी झालेली आहे. द्वैत अन् कलह माजविण्यासाठीं नव्हे तर, अद्वैत आणि प्रेम परिपुष्ट करण्यासाठीं ! प्रत्येक प्रदेशाची केवळ भाषाच वेगळी आहे असें नव्हे; तर त्याचें सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक वळणहि वेगळें आहे. मूलभूत सांस्कृतिक तत्त्वें आसेतुहिमाचल सारखीं असलीं तरी या एकत्वांतलें नानात्वहि तितकेंच सुंदर आणि आकर्षक आहे. एकाच फुलाला पाकळीगणीक वेगवेगळ्या रंगछटा दिसाव्या, तसा हा प्रकार आहे. प्रत्येक देशाचें जें हें वेगळें वैशिष्ट्य आहे तें जतन व्हावें, त्याचा विकास व्हावा आणि अन्य प्रदेशांतल्या लोकांनीं जाणिवेच्या डोळ्यांनीं त्याचा परिचय करून घ्यावा, असा आजचा सर्वमान्य दृष्टिकोन आहे.

भारताच्या सलगपणांतलें हें विलगपण त्या त्या भाषेच्या विकासक्रमांतून दिसून येतें. प्रादेशिक कवींच्या आणि महाकवींच्या रसवंतींतून तें द्रवतें, पाझरतें. त्या त्या प्रदेशांतल्या संतांच्या आणि आचार्यांच्या विचारधनानें तें संपन्न होतें. नाट्य, नृत्य, सण, उत्सव, इत्यादि प्रसंगीं प्रकट होणाऱ्या कलाप्रकारांतून तें चमकते. दैवतांचीं स्थानें कलाक्षेत्रें आणि धर्मक्षेत्रें यांच्या दर्शनांतून तें मनावर बिंबतें. आणि हें सारें पाहात असतांना आणि

त्याच्याविषयीं ऐकत असतांना कुठें तरी आपल्या प्रदेशांच्या सांस्कृतिक आणि भावात्मक जीवनाशींहि त्याचे धागेदोरे जुळत जातात. परकें किंवा दुसऱ्याचें म्हणून निरखूं लागावें, तों तों त्या ठिकाणीं अव्यक्त आत्मीयतेचा प्रत्यय वाढूं लागतो. आणि त्याबरोबरच रुचिवैचित्र्याचाहि आनंद लाभतो तो वेगळाच !

भारतानें आपल्या भौतिक विकासासाठीं आज भगीरथाचा वसा घेतला आहे. कुठल्याहि प्रदेशांत जा, आपल्याला आजमितीस कांहींतरी नवी रचना, नवी घडण, नवी उभारणी सर्वत्र आढळते. या प्रयत्नपरमेश्वराची आपण पूजा-अर्चा करतों आणि ती करायलाच हवी ! पण केवळ भौतिक नव-निर्मितीनें भारताचा सर्वांगीण विकास होईल, असें मानणें मात्र युक्त नव्हे. भौतिक विकासाबरोबरच आपल्याला या देशाचें सांस्कृतिक पुनरुत्थानहि घडवून आणायचें आहे. प्रत्येक भाषिक राज्यांतल्या जनतेनें त्यासाठीं अन्य प्रदेशांच्या सांस्कृतिक जीवनाची ओळख करून घ्यायला हवी. ओळख प्रथम. परिचय त्या नंतर. परिचयांतून पुढें विचारांच्या आणि भावनांच्या एकत्वाची अनुभूति. आणि त्या अनुभूतीच्या प्रकाशांत आपापलीं जीवनें उजळून घेऊन राम-भरतांचा भ्रातृभाव जागृत करणें अन् सर्वोदय साधणें हें अंतिम उद्दिष्ट होय !

एवढा मोठा हेतु मनांत धरून केलेला हा छोटासा प्रयत्न आहे !

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं मला अनेक लेखकांचें आणि ग्रंथकर्त्यांचें साहाय्य झालेलें आहे. त्या सर्वांचें ऋण मी कृतज्ञतापूर्वक शिरावर वागवीत आहें.

साधना प्रेसचे श्री. वझे यांनीं या पुस्तकाची सुबक छपाई केली. चित्रकार श्री. सुधाकर खासगीवाले यांनीं त्याची अंतर्बाह्य सजावट केली. त्यासाठीं या दोघांचाहि मी आभारी आहें. श्री. के. जोशी ॲन्ड को. तसेंच जी. एस्. मोघे ॲन्ड सन्स यांचेहि चित्रांचे ठसे उत्तम बनवून दिल्याबद्दल आभार मानायलाच हवेत.

हें पुस्तक हातावेगळें करून ‘ केरळ ’ या आगामी पुस्तकाच्या निर्मिती-साठीं मी आतां त्या प्रदेशाचा ‘ पान्थस्थ ’ बनत आहें.

पुणें : गुरुपौर्णिमा<br>शके १८८२<br>(दि. ८।७।६०)

—महादेवशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 26305 वि: ...
क्रमांक 262 नों दि 20/11/60



# तमिळकम्

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
11829

आर्यावर्त आणि दक्षिणापथ असे भारताचे दोन प्रमुख विभाग फार पुरातन काळापासून मानलेले आहेत. विंध्य पर्वतश्रेणी ही या दोन प्रदेशांची विभागरेषा होय. विंध्याच्या उत्तरेचा भारत तो 'आर्यावर्त' आणि दक्षिणेचा तो 'दक्षिणापथ' किंवा दक्षिण भारत. हे दोन्ही मिळून भारताची मूर्ति परिपूर्ण होते. भाषा, राहणी, हवामान, परंपरा, इत्यादि गोष्टींनीं हे दोन भाग अगदीं वेगळे पडतात, हें खरें; पण या भिन्नत्वांतहि एक मौलिक अशी एकता आहे. संस्कृत भाषा, चातुर्वर्ण्य, पौराण-धर्म, शिव-विष्णु हीं दैवतें आणि राम-कृष्ण हे अवतार, या सांस्कृतिक धाग्यादोऱ्यांनीं हे दोन्ही भाग एकत्र जोडले गेले आहेत. दोन्ही मिळून एक झाले आहेत. विविधता—रुचिवैचित्र्य यांची आकांक्षा कायम ठेवून त्यांनीं भारताच्या मर्यादा 'आसेतु हिमाचल' केल्या आहेत.

या दोन्ही विभागांत दक्षिण-भारत हा प्राचीन ठरतो. या बाबतींत भूगर्भशास्त्राचे जाणकार कांहीं वेगळ्याच गोष्टी सांगतात. त्यांच्या मतें फार फार प्राचीन काळीं उत्तर भारत म्हणतात तो नव्हताच मुळीं ! तिथें पसरून राहिला होता तो अथांग निळा दरिया. देवतात्मा हिमालय त्याच्या पोटांत लपून बसलेला होता. मग अन्य डोंगरटेकड्यांची कथा ती काय! भूमिच नव्हती; तर माणूस तरी कुठून असणार !

पण अशा त्या कदिमकाळींसुद्धा दक्षिण भारत विद्यमान होता. तिथे डोंगर होते, टेकड्या होत्या अन् त्यांतून नद्या, ओढे अन् झरेहि खळाळून वाहत होते. नद्या आणि पर्वत यांच्या सान्निध्यानें तिथें माणसांची वस्तीहि नांदत होती. एतावता उत्तर भारतापेक्षां दक्षिण भारत प्राचीन ठरतो आणि तिथली मानव परंपराहि फार पुरातन मानावी लागते. तामिळनाडमधल्या तिनवेल्ली जिल्ह्यांत जें उत्खनन झालें, त्या ठिकाणीं सर्वांत जुन्या आदिमानवाचे अवशेष सांपडले आहेत. याला मानववंशशास्त्रांत 'पालियोलिथिक' मानव म्हणतात. त्याच्या पुढचा मानव तो 'निओलिथिक' आणि त्याहीनंतरचा तो आजचा मानव होय. दक्षिण भारतांत अशा प्रकारें मानवाचें अस्तित्व आणि त्याची उत्क्रांति अश्मयुगापासून तों लोहयुगापर्यंत आणि तिथून वर्तमान युगापर्यंत सलगपणें होत गेली आहे, हें आजमितीस पुराव्यानिशीं सिद्ध झालें आहे.

## द्रविड-प्राचीन जमात

दक्षिण भारतांत वसणारी द्रविड जाति ही जगांतल्या अत्यंत प्राचीन जातींपैकीं एक होय. हे द्रविड लोक कोण होते, त्यांचा दुसऱ्या कोणत्या जातींशीं विशेष संबंध होता, हे मूळचे भारतांतलेच का दुसरीकडून कुठून तरी येऊन भारतांत स्थायिक झाले, हें अजून पुरतेपणीं न उकललेलें गूढच आहे. संशोधकांचे तर्क मात्र चालू आहेत. ऐतरेय ब्राह्मणांत त्यांना दस्यु म्हटलें असून विश्वामित्राच्या शापित संततीपैकीं एक जमात म्हणून त्यांना मानलें आहे. मनु म्हणतो, कीं द्रविड लोक प्रथम क्षत्रिय होते; पण क्रियालोप झाल्यामुळें ते पुढें वृषल म्हणजे शूद्र बनले.

पण श्रुति-स्मृतींतल्या या उल्लेखांवरून त्यांच्याविषयींची जिज्ञासा शमत नाहीं आणि कांहीं उलगडाहि होत नाहीं. आणि म्हणूनच त्या कामीं कित्येक संशोधक आपापलीं संशोधनाचीं दप्तरें घेऊन पुढें आले आहेत. कांहींच्या मतें ते लेमोरिया देशाचे मूळ रहिवासी होते. आजच्या कन्याकुमारीच्या दक्षिणेस एका काळीं फार विशाल असा भूभाग पसरला होता. त्याची पूर्वसीमा मलाया द्वीपसमूहाला जाऊन भिडली होती आणि पश्चिम सीमा मादागास्कर आणि आफ्रिका यांना स्पर्श करीत होती. लेमोरिया प्रदेश म्हणतात तो हाच. द्रविड

लोक मूळ या प्रदेशांत रहात होते. कधी काळीं त्या भागांत महान् जलप्रलय झाला आणि त्या भूभागाला दक्षिण सागरानें पोटांत घेतलें. त्या महान् उत्पातांत जगले वांचले ते द्रविड लोक तिथून बाहेर पडले आणि दक्षिण भारतांत येऊन सुरक्षित झाले. कांहींच्या मतें ते मूळ मध्य एशियाच्या पठारावर राहणारे लोक होत. ते तिबेटमार्गें भारतांत उतरले आणि आसाम प्रदेशांतून खालीं घसरत घसरत दक्षिणेंत जाऊन थडकले आणि तिथेंच वसले. पण एवढ्यावरच हें संपत नाहीं. त्यांच्या मूलस्थानाविषयीं आणखी एक बळकट सिद्धांत शिल्लक रहातोच—

द्रविड लोक प्रथमतः एशियामायनर, क्रीट, सायप्रस इत्यादि एजियन द्वीपांत राहत होते. त्यांचा आणि प्राचीन ग्रीकांचा शेजारसंबंध होता. त्यांना तिथें द्रामिल या नांवानें उल्लेखीत. द्रामिलचे द्रामिड, द्राविड असे पर्याय होत होत त्यांतूनच 'तामिळ' शब्द उगवला आणि तोच पुढे स्थिर झाला. हे लोक काही बलुचिस्तान आणि सिंध या खुष्कीच्या मार्गानें तर कांहीं समुद्रमार्गें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरले आणि तिथून खालीं सरकत, सरकत दक्षिणेंत येऊन स्थायिक झाले. बलुचिस्तानची 'ब्राहुई' ही भाषा तमिळ भाषेशीं मिळती जुळती आहे, हा या सिद्धांताला मिळालेला पुरावा.

या भिन्न भिन्न मतांच्या खरेखोटेपणाची शहानिशा थोडावेळ बाजूला ठेवली, तरी एक गोष्ट निःसंशय सत्य कीं द्रविड हे दाक्षिण भारतांतले प्राचीन लोक आहेत. विंध्य आणि नर्मदा यांच्या दक्षिण अंगाला गेलीं कित्येक हजार वर्षें त्यांचें वास्तव्य आहे. तिकडील अनेक जातीजमातींचे ते पूर्वज मानले गेले आहेत. दक्षिणेंत आर्यांचें पाऊल पडण्यापूर्वीं स्वतंत्रपणें संस्कृति-विकासाच्या अनेक पायऱ्या चढून ते वर आले होते. त्यांची स्वतःची भाषा होती. स्वतंत्र अशी शिल्पकला होती. घरें आणि नगरें निर्माण करण्यांत ते तरबेज होते. ते शेतीहि करीत आणि आपसांत लढायाहि करीत. समुद्रमार्गें त्यांचा परदेशांशीं व्यापारहि चाले.

पण तमिळनाडमध्यें जे आहेत, ते सगळे मात्र द्रविड नव्हेत. तोळ-काप्पियरनें आपल्या व्याकरण-ग्रंथांत तमिळनाडमधल्या तीन प्रमुख जातींचा उल्लेख केला आहे. मक्कळ, ।देवर आणि नकरर किंवा नागर या त्या तीन

जाती. मक्कळ म्हणजे शुद्ध द्रविड. देवर शब्द त्यानें ब्राह्मणासाठीं योजला आहे. अगस्त्य मुनीनें दक्षिणेचा मार्ग मोकळा केल्यावर त्याच्या मागून कित्येक शतकें उत्तरेच्या आर्य ब्राह्मणांचा ओघ तिकडे वाहत राहिला होता. या ब्राह्मणांनीं कावेरीचें तीर आपल्या वस्तीसाठीं पसंत केलें होतें. तिथूनच त्यांनीं तमिळनाडमध्यें आर्यसंस्कृतीचा प्रसार सुरू केला होता आणि स्थानिक लोक त्यांना 'देवर' म्हणून ओळखीत होते. नकरर म्हणजे तिथले वनवासी आणि गिरिवासी जन होत. तमिळनाडमध्यें तोडा, मरवर, कुरुंबर इत्यादि अनेक आदिवासी जमाती आहेत. त्या सर्वांना तोळकाप्पियरनें नकरर म्हणून उल्लेखलें आहे.

## भौगोलिक विभाग

प्राचीन तामिळ प्रदेशाचे भौगोलिक अवस्थेनुसार पांच विभाग मानलेले होते. त्यांना 'तिणै' असें म्हणत. तिणै शब्दाचा अर्थ भूखंड किंवा प्रदेश असा आहे. कुरिंजि, पालै, मुल्लै, मरुदम आणि नेयिदल अशीं त्या पांचांचीं नावें होतीं.

पहाडी प्रदेशाला कुरिंजि म्हणत. या भागांत जंगली जमाती रहात आणि शिकार व कंदमुळें यांच्यावर निर्वाह करीत. द्रविड संस्कृतीचा 'श्रीगणेशा' याच प्रदेशांत झाला असावा असें म्हणतात. गुहांचा त्याग करून ते मोकळ्या जागीं लांकडी घरें बांधूं लागले. तमिळनाडमध्यें वास्तुशास्त्राचा पाया त्यांनीं घातला. कुरिंजिनिवासी लोक मुख्यत्वें शिकारी असल्यामुळें लग्नाच्यावेळीं नवरदेव आपल्या वधूला एखादा वन्य पशूचा दांत किंवा वाघनख भेट म्हणून देई. मग ती वधू आपल्या सौभाग्याचें प्रतीक म्हणून तो अलंकार कायमचा गळ्यांत बांधी. तोच प्रघात पुढें 'ताळी'च्या रूपानें सार्वत्रिक झाला. ताळी म्हणजे मंगळसूत्र. तें वधूच्या गळ्यांत बांधणें हा दक्षिणेंतल्या लग्नांतला एक धार्मिक विधि आहे. हें मंगळसूत्र महाराष्ट्रापर्यंत आलें आहे. पण उत्तर भारतांत मात्र त्याचा अभाव आहे.

पालै ही तमिळनाडमधली मरुभूमि होय. तिथें कांहीं रुजायचें नाही कीं, पिकायचें नाहीं. तरी पण त्याहि भागांत प्राचीन काळीं कांहीं जमाती राहत

होत्या. मरवर आणि कल्ळर अशीं त्यांचीं नावें होतीं. त्यांना कांहीं निर्माण करतां येत नसे; त्यामुळें त्यांच्यांत लूटमारीची प्रवृत्ति उत्पन्न झाली. हे लोक वाल्ह्या कोळ्याप्रमाणें वाटमारी करीत आणि प्रसंगीं आपसांतच लुटालूट करीत. त्यांचे वेगवेगळे गट असत आणि त्यांच्यावर एखादा अनभिषिक्त सरदार असे. अशा सरदारांना ‘ काकई ’ म्हणत. हे लोक कालीचे उपासक होते.

मुल्लै म्हणजे वनप्रदेश. तिथें वास्तव्य करणाऱ्या जमातींनीं पशुपालन सुरू केलें. पहाडी प्रदेशांतूनच हे लोक खालीं उतरले होते. पशुपालन ही संस्कृतीची दुसरी अवस्था मानली जाते. त्यामुळें कुरिंजिप्रदेशांतल्या लोकांपेक्षां हे लोक अधिक सुसंस्कृत बनले. जोंवर ते शिकारीवरच केवळ जगत, तोंवर त्यांना शिकार मिळवण्यासाठीं लांब लांब पल्ले मारावे लागत. त्यामुळें घराची आणि मुलांबाळांची सर्व जबाबदारी स्त्रीला पत्करावी लागे. त्यामुळें साहजिकच तिचा अधिकार मोठा ठरून त्यांच्यांत ‘ मातृसत्ताक कुटुंबपद्धति ’ अस्तित्वांत आली होती. पण मुल्लै प्रदेशांत जीवन बदललें. पशुपालन आर्थिक दृष्ट्या लाभकारक होऊं लागल्यामुळें त्याबद्दल विशेष काळजी घेणें सुरू झालें. पशु हें धन म्हणून मानलें जाऊं लागलें. त्याची मुख्य जबाबदारी पुरुषांवर आली. त्यामुळें मातृसत्ताक कुटुंबपद्धति जाऊन त्याजागीं ‘ पितृसत्ताक कुटुंबपद्धति ’ अस्तित्वांत आली. त्याच्या अनुरोधानें कुलप्रथाहि सुरू झाली. अनेक कुलांवर देखरेख करणारे आणि कुलाकुलांमधल्या आर्थिक अन् सामाजिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवणारे कुलपति निर्माण झाले. आणि पुढें या कुलपतीं-तूनच द्राविड राजसंस्था उगम पावली.

नेयिदल म्हणजे समुद्रकिनाऱ्याचा म्हणजे कोकणांतल्या भाषेंत खालाटीचा प्रदेश. इथल्या लोकांना ‘ पडवर ’ म्हणत. हे लोक समुद्राच्या कांठाकांठानें आपल्या छोट्या छोट्या वस्त्या उभारून राहात. समुद्र हेंच त्यांचें उपजीविकेचें साधन होतें. ते मच्छीमारी करीत आणि मीठहि पिकवीत. सर्वकाळ समुद्राशीं संबंध आल्यामुळें ते होड्या चालवण्यांत कुशल बनले. इतकेंच नव्हे; तर ते लहान मोठ्या नौका बांधण्यांतहि पट्टीचे कारागीर ठरले. मध्ययुगांत दक्षिण भारताचा रोम इत्यादि देशांशीं व्यापार सुरू झाला, तेव्हां याच पडवर जातीनें त्याकामीं निष्णात नावाडी आणि खलाशी पुरवले.

मरुदल म्हणजे नदीकाठची समतळ भूमि! कावेरी आणि ताम्रपर्णी या तमिळनाडमधल्या दोन प्रमुख नद्या होत. कावेरी कुर्गमधल्या ब्रह्मगिरि पर्वतावरून निघते आणि तमिळनाडमधले तिरुच्चिरापल्ली आणि तंजाऊर हे दोन जिल्हे फुलवीत, पिकवीत पूर्वसागराला जाऊन मिळते. आर्यांनी ज्या प्रेमादरानें गंगामाहात्म्य वाढवलें, त्याच प्रेमादरानें द्रविडांनीं कावेरीचें माहात्म्य वाढवलें आहे. प्राचीन तमिळसाहित्यांत कावेरीचीं स्तोत्रें जागोजाग आढळतात.

ताम्रपर्णी नदी पश्चिम घाटाच्या दक्षिण टोकावरून उगम पावते आणि तिरुनेलवेलि या जिल्ह्यांतून वाहत येऊन समुद्राला भेटते. दक्षिणेंतलीं अनेक पुण्यक्षेत्रें या दोन पुण्यसरितांच्या तीरांवर गाजत आहेत. आर्यसंस्कृतीचीं प्राचीन केंद्रेंहि याच नद्यांच्या कांठीं निर्माण झालीं आणि तिथेंच आर्य-द्रविड संस्कृतींच्या समन्वयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या नद्यांच्या सांन्निध्यांत राहणाऱ्या जाती म्हणजे ‘ उलवर ’ आणि ‘ वेळ्ळाळर ’ या होत. हे लोक नद्या, तलाव यांच्या पाण्यावर शेती करीत. तमिळनाडमधल्या जीवनाला स्थायी स्वरूप प्राप्त झालें तें इथूनच. शेतीला प्राधान्य मिळाल्यामुळें तिच्या अनुरोधानें इथे ग्रामवस्तीची मांडणी झाली. या स्थायी वस्तीमुळें इतर ‘ तिणै ’ मधल्या लोकांची या भागांत अनेक कारणांसाठीं ‘ जा ये ’ सुरू झाली. वेळ्ळाळर लोकांना मीठ आणि मासळी पुरवण्याचें काम पडवरांनीं पत्करलें. मुल्लै प्रदेशांतले लोक त्यांना दूध-दहीं पुरवूं लागले. कुरिंजि प्रदेशांतले लोक वेळ्ळाळरांचीं घरें उभारण्यासाठीं गवंडी आणि पाथरवट म्हणून पुढें आले. पांचीहि प्रदेशांत असें आदान-प्रदान सुरू झालें. त्यांच्यामधले सुरवातीचे व्यवहार वस्तुविनियमाच्या पद्धतीवरच चालत. पुढें रोमन लोकांशीं व्यापार सुरू झाल्यावर त्यांना नाण्यांची ओळख झाली. अशा प्रकारें परस्पर सहजीवनाच्या आधारावर तमिळनाड, संस्कृतीच्या एकेक पायऱ्या चढूं लागला. आपल्या आदिम अवस्थेंतून बाहेर पडून त्यानें सभ्यतेच्या मार्गावर पाऊल टाकलें. कुरिंजीमधलें संस्कृतीचें आदिम स्वरूप मुल्लै अन् मरुदम या भागांत अनेक अंगांनीं विकसित झालें. मात्र कुरिंजीमधल्या गुहावासी जीवनाला मरुदमच्या सभ्यतेप्रत पोंचायला किती युगांचा काल मध्यें लोटला असेल, तें सांगणें कठिण आहे.

आतांपर्यंत सांगितल्या त्या गोष्टी तामिळ संस्कृतीच्या इतिहासपूर्व अवस्थेंतल्या समजाव्या. या कालखंडाविषयीं पुराव्यानिशीं कांहींच सांगतां येत नाहीं. साहित्यांतले ओझरते उल्लेख आणि त्यावरून काढलेलीं अनुमानें यांवरूनच त्या अज्ञातकालीन मानवजीवनाची कल्पना करावी लागते.

इतिहासकाळांत प्रवेश केल्यानंतरच तामिळनाडच्या निश्चित चतुःसीमा आपल्या हातीं लागतात. तोळकाप्पियर हा अगस्त्यशिष्य आपल्या व्याकरण ग्रंथांत सांगतो, कीं ' उत्तरेस तिरुपतीपासून तों दक्षिणेस कुमारीपर्यंत तमिळांचा सुंदर प्रदेश पसरला आहे. ' संघम् कालांतल्या अनेक ग्रंथकारांनीं या विधानाचा पुरस्कार केलेला आढळतो. तमिळनाडच्या पूर्व-पश्चिम सीमा दोन्ही दिशांच्या सागरांना भिडलेल्या होत्या. आजचा केरळ प्रदेश प्राचीन काळीं तमिळनाडमध्येंच समाविष्ट होता. तमिळसाहित्यांत हा सर्व द्रविडप्रदेश ' तमिळहम् ' या नांवानें उल्लेखलेला आहे.

## राजवंश

या तमिळहम्चे राजकीय दृष्ट्या प्रथम तीन स्वतंत्र विभाग होते. पांड्यनाड्ड, चोळनाड्ड, अन् चेरनाड्ड. पुढें इसवी सनाच्या चौथ्या शतकांत तोंडैनाड्ड आणि नवव्या शतकांत कोंगुनाड्ड मिळून तीन्हींचे पांच विभाग झाले. चोळांच्या आग्नेयीस केलिमेरपासून कोट्टायम्पर्यंत पांड्यांचें राष्ट्र होतें. वर्तमान मदुरा, तिरुनेलवेलि, त्रिवांकुर आणि कोच्चि एवढा प्रदेश त्या राज्यांत मोडत होता. कोरकई ही त्यांची पहिली राजधानी. हें एक उत्कृष्ट बंदर होतें. इथूनच त्यांनीं परदेशांशीं आपला व्यापारी संबंध प्रस्थापित केला होता. कालांतरानें त्यांची ही राजधानी मोडली आणि पांड्य राजे आपला बाडबिस्तरा घेऊन मदुरेस आले. तिथें त्यांनीं नवी वैभवशाली राजधानी उभारली.

चोळ राजे पूर्व समुद्राच्या तटावर आपला कबजा करून बसले होते. उरैयुर या राजधानींतून ते आपलीं सूत्रें हालवीत. वेळ्ळार नदी ही त्यांची दक्षिण सीमा. त्यांचा एक सामंत कांचींतहि जाऊन बसला होता.

पांड्य देशाच्या वायव्य भागांत चेरांची सत्ता गाजत होती. पालाघाट ओलांडून खालीं कोइंब्रतोर, सेलमपर्यंत त्यांनीं आपले हातपाय पसरले होते.


पेरियार नदीच्या मुखावरचें वंजी हें नगर त्यांनीं आपली राजधानी बनवलें होतें. त्याला लागूनच 'तोंडि' हें एक चांगलें बंदरहि त्यांना मिळालें होतें.

दंतकथा असें सांगते कीं, पांड्य, चोळ, चेर हे मुळांत तीघे भाऊ होते. वयांत आल्यावर त्यांचें आपसांत पटेना; म्हणून ते विभक्त झाले. एवढ्यावरच थांबलें असतें तरी ठीक होतें; पण तसें न होतां त्यांच्यांत वैराची ठिणगी पडली आणि ते एकमेकांना मदत करण्याऐवजीं यादवी युद्धें लढूं लागले. एकमेकांच्या प्रदेशांचे लचके तोडूं लागले.

या दंतकथेंतलीं यादवी युद्धें हीं खरीं आहेत; पण ते तीघे सख्खे भाऊ होते ही गोष्ट सत्य नाहीं. हीं तीन्ही मुळांतच स्वतंत्र अशीं जमातींचीं राज्यें होतीं. पांड्य हे पडवर जमातीचे होते. चोळ लोक वेळ्ळाळर या किसान जमातींतून वर आले होते. चेर लोकांची जमात 'उलवर' होती अन् ती पहाडी होती. या तीन्ही जमाती मुळांत द्रविड वंशाच्या होत्या, एवढेंच त्यांच्यामधलें बंधुत्व. त्यांच्यांत वर्णव्यवस्था नव्हती. पुढें आर्य ब्राह्मण दक्षिणेंत उतरले तेव्हां त्यांना आपल्या संस्कृतिप्रसाराच्या कामीं या राजांनीं आपापल्या-परी मदत केली. म्हणून त्यांनीं या तीन्ही राजवंशांना क्षत्रियत्व बहाल करून कोणाला सूर्यवंशांत तर कोणाला चंद्रवंशांत घालून दिलें.

पांड्य वंशानें सनपूर्व पांचव्या शतकापासून तों सन १३१० मध्यें मलिक कफूरनें त्याचा पराजय करीपर्यंत म्हणजे सुमारें १९०० वर्षें तमिळ-नाडच्या कांहीं भागावर राज्य केलें. या राजवंशांत अनेक महापराक्रमी आणि प्रजावत्सल राजे होऊन गेले. यांनीं संपदाहि मिळवली आणि राज्यविस्तारहि केला. अंतःस्थ भानगडींमुळें ते कमजोर झाले अन् अखेरीस कोसळले.

पांड्यांपेक्षांहि कांकणभर सरस असा चोळवंश निघाला. त्या वंशांतला परम प्रतापी राजा म्हणजे करिकाळ चोळ हा होय. पांड्य आणि चेर हे दोन्ही राजे संघटित होऊन त्याच्यावर चालून आले. पण कोईलवणि या रणक्षेत्रावर करिकाळनें एकट्यानें त्यांचा धुव्वा उडवला. प्रभु रामचंद्रानंतर लंकेवर यशस्वी चढाई करणारा हाच नरपुंगव होय. यानें लंका तर जिंकलीच; शिवाय तिथून परत येतांना बारा हजार कैदी पकडून आणले. त्यांना वेठीला धरून करिकाळनें कावेरी नदीवर छानदार बंदर बांधून घेतलें. यानें आपली


तामिळनाडु
आंध्र राज्य
मद्रास
म्हैसूर राज्य
चेंगलपट
वेलूर
उत्तर आर्काट
कांचीवरम्
सेलम
दक्षिण आर्काट
पांडिचेरी
कावेरी नदी
कुडलूर
नीलगिरी
कोयंबत्तूर
बंगालचा समुद्र
तिरुचिरापली
कोयंबत्तूर
तंजाऊर
कारिकल
उदकमंडलम्
तिरुची
तंजाऊर
केरल
मदुरे
देवकोटै
मदुरे
रामनाद
रामेश्वरम्
लंका
तिरुनेलवेली
तिरुनेलवेली
ताम्रपर्णी
कन्याकुमारी

राजधानी उरैयुर येथून उचलली आणि त्यासाठीं 'कावेरी पुंपट्टिणम्' हें नवें नगर वसवून तिथें तिची स्थापना केली. हें लांबलचक नांव उच्चारणें कठिण जात असेल, तर 'पुहार' हें सुटसुटीत नांव लक्षांत ठेवा. पुहार नगरींतले महाल उभे करण्यासाठीं मगधांतले कारागीर, अवंतीचे लोहार, यवन देशांतले सुतार अन् महाराष्ट्रांतले स्थपती तिथे गेले होते.

करिकाळनें दिग्विजय करण्यापेक्षां देशांतल्या निर्माणकार्यावर अधिक भर दिला. त्यानें पुष्कळसे तलाव खोदले. कावेरीला बांध घालून कालवे काढले आणि राज्यांतल्या शेतीला पाण्याचा सुकाळ करून टाकला. जगाच्या इतिहासांत अमर होऊन राहायला करिकाळची एवढी एकच गोष्ट पुरेशी आहे.

करिकाळच्याच वंशांत पुढें आठव्या शतकांत विजयालय नांवाचा एक समर्थ राजपुरुष निपजला. त्यानें पांड्य आणि पल्लव यांना जिंकून आपल्या राज्याच्या सीमा वाढवल्या. तिथून पुढें पूर्व समुद्रांतलीं मलाया, बलि, सुमात्रा इत्यादि द्वीपेंहि जिंकून घेतलीं. त्यानंतर त्यानें भारताच्या उत्तरेला धडक मारली. या मोहिमेंत त्याच्या चतुरंग दलानें बंगालपर्यंत दौड मारली. तिथल्या एकेका राजाला परास्त करून परत येतांना त्यानें गंगाजलाचे कित्येक घडे भरून आणले. त्या पुण्यजलासाठीं एक स्वतंत्र तलाव खोदून त्यांत त्या जलाचें विसर्जन केलें आणि त्या उत्तर दिग्विजयाची स्मृति आपल्या नांवाशीं निगडित रहावी म्हणून स्वतःला 'गंगैकोंडचोळन्' (गंगा आणणारा चोळ) अशी नवी पदवी जोडून घेतली. आजहि गंगैकोंडपुरम् या ठिकाणीं तो तलाव आपलें हृदय खोलून उभा आहे. आजहि त्याच्याच पाण्यानें तंजाऊर आणि तिरुचि या जिल्ह्यांतली बरीचशी शेतजमीन भिजत आहे. चोळांचें राज्य धनधान्यसमृद्ध झालें आणि प्रजेला सर्वतोपरी कल्याणकारी ठरलें. त्यांनीं अनेक मंदिरें उभारलीं. उत्कृष्ट नाविकदल तयार केलें. राज्ययंत्रणा बांधेसूद बनवली. आणि न्यायदानहि आदर्शभूत केलें. पण चौदाव्या शतकांत अशा सुस्थित राज्याचाहि मलिक कफूरच्या हस्तें अस्त झाला, हें खेदानें सांगावें लागतें.

चेरांचें राज्यहि बरेंच मोठें होतें. चोळ राज्याच्या बरोबरीनेंच त्याचीहि स्थापना झाली होती. त्रिवांकुर, कोचिन आणि मलबारचा कांहीं भाग एवढा प्रदेश चेरांच्या राज्यांत मोडत होता. चेर राजांनीं इतर राजवंशांशीं राज्य-

विस्ताराच्या बाबतींत विशेषशी स्पर्धा केली नाहीं. त्यांनीं व्यापारावर आपलें लक्ष केंद्रित केलें आणि राज्यांतले उद्योगधंदे भरभराटीस आणले.

पुढें इसवी सनाच्या ५ व्या शतकापासून एक नवाच राजवंश तमिळ-नाडमध्यें उदयाला आला आणि त्यानें त्या प्रदेशावर कधींहि बुजली जाणार नाहीं अशी आपली संस्कृतिक मुद्रा उठवली. या राजवंशाचें नांव पल्लव असें आहे. हे पल्लव कोण आणि कुठले याविषयीं विद्वानांत पुष्कळ मतभेद आहेत. कांहीं विद्वानांचें मत पुढीलप्रमाणें आहे—

पल्लव वंश ही वाकाटकांचीच एक शाखा होय. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून तों पांचव्या शतकापर्यंत मध्यभारतावर वाकाटाकांचेंच राज्य होतें. त्यांचीच एक शाखा दक्षिणेकडे निघाली आणि शंभर-दोनशें वर्षें हळूहळू आपलें सामर्थ्य वाढवीत चौथ्या शतकांत तिनें कांचीवर आपला अधिकार प्रस्थापित केला आणि आपलें स्वतंत्र राज्य थाटलें.

सिंहविष्णु आणि महेंद्रवर्मा हे दोघे पुण्यशील, प्रतापी राजपुरुष कांचीच्या सिंहासनाचें सामर्थ्य अन् वैभव वाढवून गेले. महेंद्रवर्म्यानें आपलें राज्य खूप वाढवलें. एका बाजूनें त्यानें बादामीच्या चालुक्यांवर धडक मारली, तर दुसऱ्या बाजूनें लंकेवरहि चढाई केली. पण रणविजय हेंच कांहीं पल्लवांचें वैशिष्ट्य नव्हे. त्यांच्या सांगण्यासारख्या गोष्टी इतर पुष्कळच आहेत.

पल्लवांच्या कारकीर्दींत तमिळनाडमध्यें अद्‌भुत अशी धर्मजागृति झाली. तिकडचीं शैव-वैष्णवांचीं धार्मिक आंदोलनें याच काळांत उत्कर्ष पावलीं. आर्यांचा वैदिक धर्म दक्षिणेंत पूर्णपणें प्रतिष्ठित झाला तो पल्लवांच्या काळांतच. त्यांनीं संस्कृत भाषेला राजमान्यता दिली. देवस्थानांच्या आश्रयानें मोठमोठ्या संस्कृत पाठशाळा निर्माण करून त्यांनीं संस्कृत विद्येचें वैभव आणि साहित्य वाढवलें. भारवि आणि दशकुमारचरिताचा कर्ता दंडी हे संस्कृत भाषेचे मान्यवर महाकवि पल्लवांच्या राज्यांतच पुढें आले. पल्लवांच्या काळांत तमिळ प्रदेशांत सर्वत्र वेदघोष आणि शास्त्रचर्चा दुमदुमल्या. अशाप्रकारें संस्कृत भाषेला राजाश्रय देत असतांना तमिळ भाषेचीहि त्यांनीं उपेक्षा केली नाहीं. पल्लवांच्या काळांत तमिळ भाषेनेंहि खूपच प्रगति केली.

सर्वच पल्लव राजे हे शिवभक्त होते. त्यांनीं तिकडच्या शैवपंथाला कर्णाच्या औदार्यानें आश्रय दिला. कांची नगराला ‘ विद्या-कलांचें माहेर ’ ही गौरवास्पद उपाधि पल्लवांमुळेंच प्राप्त झाली. त्यांनीं कलाकौशल्य इतकें वाढवलें कीं, भारतांतलेच नव्हेत; तर परदेशांतले व्यापारीहि तिथल्या वस्तू खरेदी करण्यासाठीं कांचीच्या खेपा करूं लागले. द्राविड शिल्प आणि वास्तु या कलांचा नवा आणि मनोहर आविष्कार पल्लवांपासूनच सुरू होतो. कांचीचीं कैलास आणि वैकुंठपेरुमल हीं मंदिरें याची साक्ष देण्यासाठीं सदैव उभीं आहेत. शत-सहस्रस्तंभांचे विशाल मंडप उभारणें आणि मुख्य देवालयांवर उंच शिखर चढवणें हीं पल्लवांच्याच कलात्मक भव्य दृष्टीचीं प्रतीकें होत.

संग्रहालय,
अनुक्रम २४३०५ वि:
क्रमांक २६२ नों: दि: १५/११/६०





# साहित्य आणि साहित्यकार

तामिळ भाषा ही द्रविड परिवारांतली एक प्राचीन आणि समृद्ध अशी भाषा आहे. भारतांतल्या अतिप्राचीन भाषांपैकीं ती एक आहे. संस्कृत भाषा सोडली, तर देशी भाषांत सर्वांत जुनें वाङ्मय तमिळ भाषेचेंच आढळतें. या भाषेचा प्रारंभकाळ ख्रिस्तपूर्व पांचशें वर्षें इतका प्राचीन मानावा लागतो. 'थोड्या शब्दांत जोरकस अर्थ व्यक्त करण्याच्या बाबतींत तमिळ भाषेचा हात धरणारी दुसरी भाषा क्वचित्‌च असेल,' असे तिच्याविषयींचे गौरवोद्‌गार रे. पर्सीव्हल यानें काढले आहेत. तमिळ भाषा बोलणारे लोक पुलिकतपासून त्रिवंद्रम्‌पर्यंत अन् समुद्रकिनाऱ्यापासून पूर्वघाटापर्यंत, एवढ्या प्रदेशांत पसरले आहेत. ही सुमारें दोन कोटी लोकांची भाषा आहे. शिवाय, सिलोनमध्यें सुमारें निम्मे म्हणजे अंदाजें सव्वाकोट तमिळ भाषी लोक आहेत ते वेगळेच. इकल, कुसुव अन् येरुकल अशा तिच्या तीन पोटभाषा आहेत. पहिल्या दोन नीलगिरी पर्वतांतल्या वन्य जमाती बोलतात अन् तिसरी भटक्या लोकांच्या बोलण्यांत आढळते.

तमिळ लिपि ही ब्राह्मी लिपींतूनच उगम पावून आजच्या स्थिर अवस्थेला प्राप्त झाल्याचें संशोधक सांगतात. बारा व्यंजनें अन् अठरा स्वर एवढ्या संकुचित वर्णमालेंतच तमिळचा सारा कारभार चालतो. 'क, च, ट, त, प' हे नागरीचे पांच वर्ग प्रत्येकीं पांच व्यंजनांचे आहेत. पण तमिळ लिपींत प्रत्येक वर्गांतला पहिला वर्ण आणि शेवटचें अनुनासिक हे दोन वर्ण खेरीज

करून मधल्या तीन वर्णांचा अभावच आहे. म्हणजे ' क ' ला संदर्भानुरूप ' ख, ग, घ ' या तीन्ही वर्णांचें काम एकट्यालाच करावें लागतें. ' य, र, ल, व ' हे चार वर्ण आहेत; पण ' श, ष, स, ह ' यांचा पत्ता नाहीं.

कांहीं भाषापंडित या भाषेचा संबंध उरल-अलताई भाषा-परिवाराशीं जोडतात, तर कांहीं संशोधक तिचें नातें आस्ट्री भाषेशीं दाखवतात. दंतकथे-वरून कळतें, कीं तमिळ भाषा शिवानें जन्माला घातली आणि तिचें व्याकरण प्रथम अगस्त्य ऋषीला शिकवलें. दंतकथा ही बऱ्हंशीं कल्पित असते हें मान्य करूनहि तमिळ भाषेशीं अगस्त्याचा जो अविच्छेद्य संबंध आहे तो अमान्य करतां येणार नाहीं.

विंध्याचलाच्या दुर्गम पर्वतश्रेणी उल्लंघून आर्यांना दक्षिणापथाचा मार्ग उपलब्ध करून देणारा आणि उत्तर-दक्षिण भारता-मधला सांस्कृतिक सेतु या दोन नात्यांनीं अगस्त्याचें नांव सर्वप्रथम उल्लेखावें लागेल. तो आर्यावर्तांतून दक्षिणेंत उतरला आणि परत आपल्या मूळ भूमीकडे वळलाच नाहीं. त्यानें आपलें सर्व आयुष्य तमिळ भाषी जनतेच्या सेवेला वाहून कृतार्थ केलें. द्रविडां-मध्यें आर्य संस्कृतीचा प्रचार करीत असतांना त्यानें तमिळ भाषेचेंहि अध्ययन केलें. त्यानें आर्यांच्या दैवतकथा द्रविडांना ऐकवल्या आणि त्यांच्या आचार-विचारांचें ज्ञान स्वतः करून घेतलें. त्यानें द्रविडांना अनेक विद्या-कला शिकवल्या आणि तमिळ भाषेच्या अभिवृद्धीसाठीं ' संघम् ' नांवाची एक साहित्य परिषद्हि स्थापन केली.



अगस्त्य–चिदंबरम्

तमिळ प्रदेशांत अगस्त्याचें नांव आदरानें उच्चारलें जातें. रघुकुलाचा जसा वसिष्ठ, तसा तो पांड्य राजवंशाचा कुलगुरु मानला जातो. तिकडचे लोक अगस्त्याच्या कथा भक्तिप्रेमानें सांगतात अन् ऐकतात. तामिळ भाषेंतलीं पुराणेंहि अगस्त्यकथांनीं भरलेलीं आहेत. अगस्त्याशीं संबंधित अशीं अनेक

तीर्थं आणि स्थळेंहि त्या भागांत आहेत. तमिळनाडमधला त्याचा पहिला शिष्य तोळकाप्पियर हा होय. तमिळ भाषेचें पहिलें व्याकरण अगस्त्याचें आणि दुसरें त्याच्या शिष्याचें. तोळकाप्पियर हा केवळ वैयाकरणच नव्हता, तर कविहि होता. त्यानें केलेली सूर्यनारायणाची प्रार्थना ऋग्वेदांतल्या सूर्य-सूक्तांशेजारीं ठेवली, तर हा द्रविड ऋषि वैदिक ऋषींच्या पंक्तीला मानानें बसवण्याजोगा वाटतो. त्याचें हें पुढील सूक्त वाचा—

" विरितिरैप् पेरूङ्कडल अमिल दत्तन्न
ओरुमुदर् कडवुळ् निरप्परवुडुम् तिरुवोडु
शुऱ्ऱम् तळीइ कुऱ्ऱम् नीक्कि
तुन्वम् तोडरा इन्बन् एय्दि
कुरूतलै पनिक्कुम् आऱ्ऱल् शान्रु
............ "

" समुद्रमंथनांतून जसें अमृत वर येतें, तसा हे सूर्या ! तूं सागरांतून वर येतोस. हे आदिदेवा, आम्ही तुझी उपासना करतों. आम्हांला विपुल संपत्ति आणि प्रेमळ आप्तजनांचा सुखद सहवास मिळूं दे. आमच्या अंगीं अशी शक्ति येऊं दे कीं, आम्ही मृत्यूवरहि विजय मिळवूं शकूं. "

तोळकाप्पियरनें आपल्या ग्रंथांत तत्कालीन साहित्याचे दोन ठळक विभाग सांगितले आहेत. एक 'अहम्' आणि दुसरा 'पुरम्.' अहम् विभागांत सगळें प्रेमात्मक वाङ्मय समाविष्ट असून पुरम्‌मध्यें युद्ध आणि इतर राज-कारणी साहित्याचा अंतर्भाव होतो. संघम्‌कालीन शाहिरांना प्रेम आणि युद्ध या दोन्ही गोष्टींचें विलक्षण आकर्षण होतें. ते सर्व प्रकारच्या प्रेमाचा अनुभव घ्यायला आतुर होते आणि साहसीहि होते. भावाभावांमधलें, मायलेकरांतलें, स्त्री-पुरुषांमधलें असें सर्व प्रकारचें प्रेम, निसर्गांतलीं प्रतीकें आणि उपमानें वापरून त्यांनीं सजीव आणि सर्वंकष बनवलें आहे. संघम्‌कालीन कवींचें हेंच निकराचें प्रेम पुढें नायन्मार अन् आळवार यांच्या 'भक्ती'त रूपांतरित होऊन विशाल आणि गंभीर बनलें. युद्धविषयक साहित्यांत त्यांनीं अनेक राज-वंशांचे पराक्रम, अनेक वीरांचीं वैयक्तिक बलिदानें, युद्धांचे प्रकार, संधि-विग्रह, हें सारें ओजस्वी वाणीनें वर्णिलें आहे. इतकेंच नव्हे; तर तोळकाप्पि-

यरच्या कालांतल्या कित्येक कवींनीं स्वतःहि रणधुमाळी खेळून आणि रक्तरंजित होऊन आपल्या काव्यांत अनुभूतीचा अर्क ओतला आहे.

### तमिळ संघम्

तमिळनाडमध्यें पांड्य राजवंशाची धवल कीर्ति अजरामर ठरली आहे. हे राजे जसे पराक्रमी होते, तसेच विद्या-कलांचेहि भोक्ते होते. श्री आणि सरस्वती या दोघीहि त्यांच्या घरीं गुण्यागोविंदानें एकत्र नांदत होत्या. या पांड्य राजांपैकीं एकानें अगस्त्याच्या प्रेरणेनें आपल्या राज्यांत एक साहित्यिकांचा संघ स्थापन केला. कवींनीं ग्रंथ निर्मावे, संघम्च्या परिषदेंत त्यांचें वाचन व्हावें, जे प्रशंसनीय ठरतील त्यांवर संघम्नें मान्यतेचा शिक्का उठवावा, मग राजानें त्यांचा गौरव करावा आणि नंतर राजाच्याच प्रोत्साहनानें त्या ग्रंथांचा देशभर प्रचार व्हावा असा तिथला शिरस्ता होता. तमिळ साहित्यांत अशा तीन संघम्चे उल्लेख मिळतात. हे तिन्ही संघम् पांड्यांच्याच भिन्न भिन्न राजधान्यांमधून स्थापन झाले, हें विशेष !

पहिल्या संघम्चें नांव 'तलैचंगम्' असें होतें. हा दक्षिण मदुरेंत स्थापन झाला होता. याचे पांचशें एकोणपन्नास सभासद होते आणि अगस्ति हा त्यांचा प्रमुख होता. 'अगत्तियम्' हा अगस्त्यप्रणीत ग्रंथ या संघम्चा लक्षण ग्रंथ होता.

दक्षिण मदुरा ही पांड्यांची पहिली राजधानी. ही समुद्रतीरावर वसली होती आणि सागरी व्यापाराचें मोठें केंद्र बनली होती. हें ठिकाण आजच्या कन्याकुमारीच्या दक्षिणेस कित्येक कोस खालीं होतें असें म्हणतात. पण एकाएकीं या नगरावर निसर्गाची अवकृपा झाली. तीन्ही अंगीं समुद्र वाढून आला आणि त्यानें ती राजधानी आपल्या पोटांत गडप केली. प्राचीन तमिळ वाङ्मयांत या दुर्घटनेचे अनेक ठिकाणीं उल्लेख सांपडतात.

या जलप्रलयानंतर पांड्य राजे मग तिथून वर आले आणि त्यांनीं कवाटपुरम् या ठिकाणीं आपली नवी राजधानी उभी केली. या कवाटपुराचा रामायण आणि महाभारत या दोन्ही ग्रंथांत उल्लेख आहे. इथें नव्या राजधानीबरोबरच नव्या साहित्य संघाचीहि स्थापना झाली. हा दुसरा संघम् 'इडैचंगम्' या नांवानें विश्रुत आहे. तोळकाप्पियरचें व्याकरण या काळांत

निर्माण झालें असें मानतात. पण पांड्यांची हीहि राजधानी सागराला गिळली नाहीं आणि त्यानें या कवाटपुरावर लाटांचे डोंगर लोटून त्याला आपल्या उदरांत रिचवलें. त्या नगराबरोबरच दुसरा संघम्‌हि समाप्त झाला.

पांड्य राजे तिथून उठले आणि बरेच वर येऊन त्यांनीं आजच्या मदुरेंत आपली तिसरी राजधानी थाटली. त्याबरोबरच तिथें तिसरा संघम्‌हि निर्माण झाला. याचें नांव 'कडैच्चंगम्' असें होतें. एवढ्या प्रचंड आपत्ती कोसळल्या तरी संघम्‌नें पांड्य राजांना सोडलें नाहीं आणि पांड्यांनींहि संघम्‌चा पुरस्कार करण्यांत कधीं वित्तशाठ्य केलें नाहीं. सनपूर्व सुमारें दीडशें वर्षें हा या तिसऱ्या संघाच्या स्थापनेचा काल मानतात. तमिळ साहित्यांत 'संघम् काल' म्हणून उल्लेखला जातो तो हाच काल होय.

या काळांत विशेषत्वानें नाट्य आणि संगीत या विषयांवरचे ग्रंथ निर्माण झाले. या काळांतल्या वाङ्मयाचे भिन्न भिन्न असे एकूण पन्नास संग्रह मिळतात त्यांना एट्टुतोगै, पत्तुप्पाट्टु आणि पदिनेण्‌कीळकणक्कु अशीं नांवें दिलेलीं आहेत. एट्टुतोगैमध्यें आठ काव्यसंग्रह आहेत. प्राचीन काळीं तमिळनाडचे पांच प्रदेश मानीत. त्यांना 'तिणै' अशी संज्ञा होती. या संग्रहांतून पांचहि 'तिणै' ची सामाजिक आणि धार्मिक अवस्था, तसेंच चेर राजांच्या परक्रमांचीं कृत्यें, या गोष्टींचें वर्णन आढळतें.

'पत्तुप्पाट्टु' हा दहा काव्यांचा संग्रह.आहे. नक्कीरर, कपिलर इत्यादि त्या काळच्या सुप्रसिद्ध कवींनीं लिहलेलीं हीं पद्यें आहेत. या काव्यांवरून तमिळ-नाडचें तत्कालीन राजनैतिक जीवन कळून येतें. या काव्यांत मुरुग म्हणजे कार्तिकेय याचे भिन्न भिन्न अवतार आणि त्याचीं क्षेत्रें यांचें रोचक वर्णन असून आजमितीसहि मुरुगाचे भक्त हीं पदें श्रद्धेनें गात असतात. या काळांत कांचीनगरीचें आर्यीकरण झालें होतें आणि त्या नगरींत शिव आणि विष्णु यांचीं मंदिरेंहि उभारलीं गेलीं होतीं, हें त्या पद्यांवरून कळतें.

## महाकवि नक्कीरर

नक्कीरर हा तिसऱ्या संघम्‌चा अध्यक्ष होता, तसाच पारंगत पंडितहि होता. संघम्‌कालीन कविमालिकेंत मानाचा पहिला टिळा यालाच लावला जातो.

याच्या कालाविषयीं निश्चित माहिती मिळत नाहीं. त्याच्या जातीचाहि पत्ता लागत नाहीं. त्यामुळें त्याच्या चरित्राची जिज्ञासा दंतकथांच्या ताकावरच भागवून घ्यावी लागते. कोणी म्हणतात तो ब्राह्मण होता, तर कोणी सांगतात, कीं त्याची जात वेळ्ळाळर होती. पण जात कोणतीहि असली, तरी त्याचें पांडित्य आणि निधडें धैर्य हें मात्र सर्वांनीं प्रशंसावें असेंच आहे. एकच कथा सांगितली तरी त्याच्या गुणदोषांची वानगी तिच्यांत मिळेल—

पांड्य राजा हा त्याचा आश्रयदाता. तो एक दिवस आपल्या पट्टराणी-सह सौधतलावर विश्राम करीत होता. एवढ्यांत एकाएकीं कसला तरी अपरूप असा सुगंध त्याच्या श्वासांत मिसळून गेला. त्याला वाटलें, कीं त्या सुगंधाचा उगम राणीच्या केशबंधांत असेल. पण तिच्या वेणींत तर एकहि फूल नव्हतें. फूल नाहीं आणि सुगंध आहे, ही अनुभूति अद्‌भुत होती. हें गूढ कसें उकलावें, तें राजाला कळेना. दुसऱ्या दिवशीं हजार सुवर्णमुद्रांची एक थैली त्यानें संघम्‌च्या मंडपाला टांगून घोषणा करवली—

" ऐका हो ऐका ! जो कोणी पंडित या सुगंधाचा उगम सांगून महाराजांचा संशय निवारील त्याला ही सुवर्णमुद्रांची थैली मिळेल ! "

राज्यांत ही बातमी सर्वत्र पसरली. अनेक पंडित त्या बक्षिसाच्या आशेनें दरबारांत येऊन राजाला त्या सुगंधाची उत्पत्ति सांगूं लागले, पण राजाचें कांहीं समाधान होईना. त्याच वेळीं धरुमि नांवाच्या एका ब्राह्मणानें मदुरेच्या सुंदरेश्वरम्‌पुढें धरणें धरलें. ब्राह्मण गरीब होता अन् सुंदरेश्वरम्‌चा पुजारी होता. तो देवाला म्हणाला—

" देवा, आजवर मी तुझी पूजा भक्तिभावानं केली असेल, तर राजाच्या समस्येचं खरं उत्तर तूं मला सांग. हजार सुवर्णमुद्रा मला मिळतील. पोरंबाळं सुखानं चार घास खातील. मग मला तुझ्या सेवेवांचून दुसरं कांहीं व्यवधान उरणार नाहीं. माझं एवढं गाऱ्हाणं तूं ऐकायलाच हवंस. "

सुंदरेश्वरम्‌नें तें ऐकलें. त्यानें ब्राह्मणाला त्या समस्येचें उत्तर कानांत सांगून राजाकडे रवाना केलें. ब्राह्मण दरबारांत येऊन बोलला.

" राजा, तुझ्या संशयाचं निराकरण मी करतों. "

“ बोल तुझं उत्तर. ” राजा म्हणाला.

“ नृपश्रेष्ठा, हा सुगंध कोणत्याहि फुलाचा नाहीं. तो तुझ्या पट्टराणीच्या मुलायम केसांचा आहे.”

अर्थात् राजा त्यावर खूष झाला हें सांगणें नकोच. कारण त्या उत्तरांत त्याच्या राणीच्या गुणसौंदर्याचा गौरव होता. त्या एकाच उत्तरामुळें त्याची राणी ‘ पद्मिनी ’ ठरत होती. दरबारांतल्या पंडितांनींहि त्या उत्तराला माना डोलवल्या. पण त्या पंडितसभेंत एकच पुरुष असा निघाला कीं, त्यानें नकारार्थी मान हालवली. तो रोख ठोक शब्दांत बोलला.

“ उत्तर चूक ! सपशेल चूक ! ”

तो होता महापंडित नक्कीरर ! त्याची विद्वत्ता राजमान्य होती आणि दराराहि मोठा होता. तोच जेव्हां धरुमि ब्राह्मणाचें तें उत्तर मान्य करीना, तेव्हां बाकीच्यांनींहि आपल्या डोलविलेल्या माना ताठ केल्या.त्यामुळें मनांत असूनहि राजाला तें बक्षिस ब्राह्मणाला देतां येईना. ब्राह्मण बिचारा आशेनें दरबारांत गेला होता; पण त्याला रिक्त हस्तानें तिथून परत यावें लागलें. त्यानें पुनश्च येऊन सुंदरेश्वरालाच सांकडें घातलें. सुंदरेश्वरहि चकित झाला. एका ब्राह्मणाचें रूप घेऊन तो संघमूच्या मंडपांत आला आणि त्यानें नक्कीररला प्रश्न केला.

“ धरुमि ब्राह्मणाचं उत्तर स्वीकारायला आपत्ति कोणती आली, तें सांगाल काय ? ”

त्यावर नक्कीरर बोलला.

“ आपत्ति अतिशयोक्तीची ! राणीच्या केंसांपेक्षां सुगंधी असं फूल आजवर जगांत उमललं नाहीं, असं बोलणं एक तर वेडेपणाचं असलं पाहिजे अथवा खुशामतीचं तरी. ”

“ चुकतां तुम्ही कविराज ! राणी ही देवता आहे. देवतांचे केंस फुलांपेक्षांहि सुगंधित असतात. उदाहरणार्थ शिवाची पार्वती— ”

“ मला हेंहि मान्य नाहीं. ”

“ साक्षात् जगज्जननी पार्वतीविषयींहि शंका ? ”

“ होय. पार्वतीहि या गोष्टीला अपवाद नाहीं.”

सुंदरेश्वरमूला नक्कीररच्या गर्विष्ठ उत्तराचा क्रोध आला. लगेच त्यान ब्राह्मणरूप टाकून आपलें शिवरूप प्रकट केलें. नक्कीररनें त्याला ओळखलें. त्याचा तृतीय नेत्र क्रोधावेशानें उघडण्याच्या बेतांत आहे हेंहि त्याला कळून आलें. पण नक्कीरर तरीहि डगमगला नाहीं. त्यानें पूर्वीच्याच निर्भयपणानें उत्तर केलें.

" देवा सुंदरेश्वरा, तूं साक्षात् ज्वलंत होऊन समोर उभा राहिलास, तरी सत्य तें सत्य ! सत्याला सर्वेश्वराचीहि डर नाहीं ! "

असा होता हा बाणेदार पुरुष ! यानें तमिळसाहित्याची मौलिक सेवा केली आहे. त्यानें ' अहप्पोरुळ ' ग्रंथावरच्या आपल्या भाष्यांत तीन्ही संघमूचा इतिहास ग्रथित करून ठेवला आहे.

## कवि कपिलर

याच्याच काळांतला दुसरा श्रेष्ठ कवि म्हणजे कपिलर ! याच्या घरीं प्रतिभा दिवे उजळीत होती अन् विद्या पाणी भरीत होती. समकालीन सगळे कवी, महाकवी त्याचा आदर सन्मान करीत. सभेंत आला, कीं सगळे त्याला उत्थापन देत. तिरुवादऊर या गांवीं त्याचा जन्म झाला. त्याची बालबुद्धीहि तीक्ष्ण होती. पुढें अध्ययनानें तिला विलक्षण धार चढली. अध्ययन समाप्त केल्यावर तो संघमूचा सदस्य बनला. पांड्य राजाहि त्याला सन्मानानें वागवी. ' कुरिंजिप्पाट्टु ' हें त्याचें सुप्रसिद्ध काव्य होय. तामिळ भाषेच्या अष्टकाव्यांत याची गणना होते. या काव्याच्या निर्मितीमागें एक लहानशी घटना आहे—

ब्रह्मदत्त नांवाचा एक उत्तरेचा राजा एके दिवशीं मदुरेंत पांड्य राजाच्या भेटीस आला. त्यानिमित्त राजानें दरबार भरवला. त्या प्रसंगीं दरबारी कवींनीं आपापलीं काव्यें गाऊन ब्रह्मदत्तापुढें तमिळ भाषेचें प्रदर्शन केलें. पण ब्रह्मदत्ताच्या मुद्रेवरची सुरकुती कांहीं मोडेना. तो आपला निर्गुण, निरंजन, बसून राहिला होता. खरें म्हणजे ब्रह्मदत्ताला ती भाषा आवडली नव्हती. कपिलरनें तें पाहिलें. ती गोष्ट त्याच्या मनाला लागली. त्यानें लगेच आपल्या प्रतिभेला साद घातली, शब्दार्थांना तांतडीचें निमंत्रण दिलें आणि आपलें

शीघ्रकाव्य घडाघडा म्हणायला सुरुवात केली. त्या काव्याचें माधुर्य ब्रह्मदत्ताला इतकें पटलें आणि ठसलें, कीं पुढें तो स्वतःच तमिळ भाषेचा भक्त बनला. कपिलरनें त्यावेळीं बाजी राखली अन् दरबारहि गाजवला !

कालांतरानें त्याला मदुरेचा कंटाळा आला. देशाटन करण्याची त्याची इच्छा बळावली. त्याच्या काळांत तमिळनाडमध्यें छोटीं मोठीं सामंत–सरदारांचीं राज्यें अस्तित्वांत होतीं. अशा अनेक राज्यांतून कपिलर हिंडला. हिंडतां हिंडतां एका राजाची कीर्ति त्याच्या कानावर आली. त्याचें नांव होतें पारि. हा एक पहाडी राजा होता. जसा विद्याप्रेमी तसाच दानशूर ! कपिलरला वाटलें कीं, या राजाला एकदा भेटावें. त्यानें तिथें जाऊन राजदर्शन घेतलें. त्या एकाच दृष्टिभेटींत पारीला वाटलें, कीं ' आपला जन्मजन्मांतरींचा सुहृदच भेटायला आला आहे. ' थोडयाच काळांत दोघांचें चांगलें सूत जमलें. राजसत्ता आणि कविसत्ता दोघी गळ्यांत गळा घालून वागूं लागल्या. कपिलर-शिवाय राजाचें पान हालेना. तो जणूं दुसऱ्या शरीरांतला त्याचाच आत्मा बनला. कपिलरनेंहि ठरवलें कीं, ' यापुढें अन्यत्र कुठें जायचें नाहीं अन् मित्राला अंतर द्यायचें नाहीं ! '

पण दुर्दैवाची गोष्ट अशी घडली कीं, पारि राजाच कपिलरला सोडून गेला. कुठें दुसऱ्या देशांत नव्हे, तर सरळ परलोकांत ! प्रसंग मोठा घनघोर उत्पन्न झाला. पारीला दोन उपवर मुली होत्या. त्यांतली एक तर अतिसुंदर आणि कलाचतुर होती. शेजारच्या एका राजाच्या मनांत ती भरली. त्यानें तिला पारीकडे मागणी घातली, पण तो राजा पारीचा जांवई होण्याला किंवा राजकन्येचें पाणिग्रहण करायला लायक नव्हता. म्हणून पारीनें त्याची मागणी झिडकारली. त्या राजाला तो अपमान वाटला, पण तो एकटा पारीचें कांहीं वांकडें करूं शकत नव्हता. म्हणून त्यानें शेजारच्या आणखी काहीं राजांचें साहाय्य मिळवलें. जे पारीच्या वाइटावर होते, ते सगळे राजे एकवटून पारीच्या किल्ल्यावर चढाई करून आले. पारी त्यांना सामना देण्यासाठीं रणांगणांत उतरला. ' आपदि मित्रपरिक्षा ' असें एक सुभाषित आहे. आपत्तीच्या प्रसंगीं खरा मित्र कोण तें कळतें, असा त्याचा अर्थ ! कपिलर त्या कसोटीला उतरला. रणभूमीवर खडया सुरांत अनेक वीरगाथा गाऊन त्यानें पारीच्या

सैन्यांत चैतन्य भरलें. पण अनेकांच्या पुढें एकट्याचा निभाव लागला नाहीं. त्या घोरांदर रणकंदनांत पारीच्या वर्मी घाव लागला आणि तो धारातीर्थी पडून पावन झाला.

आत्ता होता अन् आत्ता नाहीं, अशी आपल्या मित्राची अवस्था पाहून कपिलरचेंहि काळीज उलथलें. पण त्याला दुःख आळवीत बसायलाहि सवड नव्हती. पारीच्या दोन्ही उपवर कन्यांचें शत्रूंपासून संरक्षण करणें, ही जबाबदारी आतां त्याच्या अंगावर येऊन पडली होती. कपिलरनें आपल्या छातीचा कोट करून ती पार पाडली. त्यानें त्या राजकन्यांना अशा एका गुप्त स्थळीं नेऊन ठेवलें, कीं त्यांचें नखसुद्धा शत्रूच्या दृष्टीस पडूं नये. युद्ध समाप्त झाल्यावर कपिलर त्या दोघींसाठीं वरसंशोधन करायला निघाला. थोड्याच काळांत कपिलरनें त्या दोन्ही मुलींची चांगल्या स्थळीं घरभरणी लावली. तो मित्रकर्तव्यांतून मुक्त झाला; पण मित्राच्या दुःखांतून मात्र मुक्त झाला नाहीं. त्याच्या दुःखाचा एकच विरंगुळा होता अन् तो म्हणजे काव्य ! त्यानें त्या काळांत रचलेल्या अनेक कविता 'अहनानूरु' अन् 'पुरनानूरु' या संग्रहांत संग्रहीत केलेल्या आहेत. अशाप्रकारें कपिलरचें जीवन समाप्त झालें. त्याच्या मृत्यूनें संघमूच्या कविगणांतला एक तेजस्वी तारा गळून पडला, असें लोकांना वाटलें.

'पदिनेण्कीळकणक्कु' नांवाचा प्राचीन तमिळ साहित्यांत आणखी एक काव्यसंग्रह आहे. त्यांत अठरा काव्यांचा समावेश झालेला आहे. त्यांतला सर्वांत मोठा आणि सर्वमान्य असा ग्रंथ म्हणजे तिरुवल्लुवरचें तिरुकुरळ् ! संघम् कालखंडांतली ही अप्रतिम रचना मानली जाते. जगांतल्या अनेक भाषांमध्यें कुरळ्चीं भाषांतरें आणि भावानुवाद झालेले आहेत. कुरळ्ला मराठी पेहेराव चढविण्याचें श्रेय पूज्य साने गुरुजींना आहे. हा ग्रंथ निर्माण झाल्याला दोन हजार वर्षांच्या वर काळ लोटला आहे. तरी पण अजूनहि त्याची प्रत्येक पाकळी टवटवीत आहे अन् सुगंध कायम आहे. तमिळनाड-मध्यें गेलीं दोन हजार वर्षें या ग्रंथराजाचा अविच्छिन्न प्रचार आहे. तिरुवल्लुवरची लोकप्रियता त्या प्रदेशांत निराबाध आहे. भारत सरकारनें थोड्याच कालापूर्वी त्याच्या चित्राचीं पोस्टल तिकिटें काढलीं होतीं, यावरून

त्याच्या भारतभूषणत्वाची कल्पना करतां येईल. या तिरुवल्लुवरची जीवन-कथा कर्णोपकर्णी प्रसारित होत असते ती अशी—

याच्या आईचें नांव आदि आणि बापाचें नांव भगवान् ! या दांपत्याला एकूण सहा अपत्यें झालीं. त्यांतलें वल्लुवर हें कुसधुणें शेंडेफळ होय. हा मोठा बहुभाषी अन् बुद्धिमान् निपजला. याच्या पत्नीचें नांव वासुकी. हीं दोघें मैलापोर गांवांत साळ्याचा व्यवसाय करून आपला निर्वाह चालवीत.

त्याच गांवांत एक सावकार राहत होता. त्याला एक मुलगा होता अन् तो व्रात्य होता. तो कोणाचीहि चेष्टा मस्करी करी अन् भल्याभल्यांची फजिती उडवी. बापाच्या अमाप दौलतीचा मद त्याच्यापेक्षां मुलालाच अधिक चढला होता.



तिरुवल्लुवर

एक दिवस वल्लुवरची अन् त्याची गांठ पडली. सावकारपुत्रानें त्याचीहि रळी उडवण्याचा प्रयोग केला. पण वल्लुवरनें आपल्या शांत, स्निग्ध अन् प्रेमळ स्वभावानें त्याचें मन जिंकलें. वल्लु-वरच्या व्यक्तिमत्त्वाला सर्वभावें शरण होऊनच तो घरीं आला.

पुढें सावकारानें त्याला वल्लुवरकडेच शिकायला ठेवलें. सावकारपुत्र हळू हळू बहुश्रुत आणि त्याहि-पेक्षां 'माणूस' बनूं लागला. मग एक दिवस सावकारानें वल्लुवरला म्हटलें.

"महाराज ! आपलं हृदय म्हणजे बहुमोल विचारांचा जिवंत झरा आहे. त्या विचारांच्या सामर्थ्यानेंच माझा मुलगा सुधारला. पण जगांत असे किती-तरी लोक आहेत, कीं जे अज्ञानाच्या अंधारांत चांचपडतात अन् इकून

फिरून गोते खातात. त्यांना कोण सन्मार्ग दाखवणार ? महाराज, तुम्ही त्यांचे उद्धारक व्हा. तुमचे जीवनविषयक विचार खोल आहेत, व्यापक आहेत अन् त्रिकालाबाधित आहेत. तुम्ही ते ग्रंथरूपानें लिहून काढा अन् पुढच्या अनंत अज्ञानी जीवांसाठीं त्यांचा ज्ञानदीप पाजळून ठेवा. ”

वल्लुवरनें ती गोष्ट मान्य केली. त्यानें आपले मौलिक विचार हळूहळू काव्य-बद्ध करायला सुरुवात केली. दीड ओळीची एक कविता. दहा कवितांचा एक गुच्छ. अशा प्रकारें त्यानें १३३ अध्यायांत आपल्या ग्रंथाची मांडणी केली. धर्म, अर्थ आणि काम अशा तीन विभागांत तो ग्रंथ संपूर्ण झाला. मोक्षाविषयीं मात्र त्यानें कांहीं लिहिलें नाहीं. त्याचें म्हणणें असें, कीं मनुष्य दृढनिष्ठेनें स्वधर्म आचरील, तर त्याला मोक्ष आपोआप मिळेल. धर्मसिंहासनावर वज्रासन घालून बसणाऱ्या माणसाला मोक्षाची काळजी करण्याचें कारणच नाहीं.

ग्रंथ पुरा होतांच सावकारानें प्रथम त्याचा श्रवणलाभ घेतला. त्याच्या मनाची धणी पुरली. वल्लुवरनें जें लिहिलें तें त्याच्या दृष्टीनें सातांसमुद्रांच्या पलीकडचें होतें. त्यानें वल्लुवरला मग आणखी एक प्रार्थना केली—

“ साधुवर्य, तुम्हीं हा ग्रंथ घेऊन मदुरेला चला. तिथल्या संघम्ची याला मान्यता मिळवा. एकदा याची विद्वज्जनांनीं वाहवा केली, कीं मग घरोघरीं याचीं पारायणं होतील. ”

केवळ सावकाराची भीड म्हणून वल्लुवर तें बाड काखोटीस मारून ‘ संघम् ’ च्या विद्वत्सभेपुढें दाखल झाला. पहिल्यानें त्याची चेष्टाच झाली. फाटक्या माणसाला प्रथम तरी कुचेष्टेवांचून दुसरें कांहींच मिळत नाही, असा अनुभवच आहे. पण वल्लुवरच्या प्रांजळ विनंतीवरून ते पंडित त्याचा ग्रंथ ऐकायला तयार झाले. आणि पुढें ऐकतां ऐकतां तल्लीन झाले, स्तिमित झाले. त्यांना वल्लुवरच्या पुढें आपली विद्वत्ता थिटी वाटली. सर्वांनीं त्या ग्रंथाला एकमुखी मान्यता दिली. कोणी तर म्हणाले, कीं ‘ कुरळ् ’ म्हणजे तमिळ भाषेचा वेद आहे. वल्लुवरनें आपल्या या छोट्याशा ग्रंथांत साऱ्या जीवनाची लांबी, रुंदी अन् खोली मापून टाकली आहे. यास्तव कुरळ्चे चार दोन उतारे इथें उद्धृत करणें योग्य ठरेल—

"मनत्तुक्कण् माशिल नातल् अनैत्तरन् आकुल नीर पिर् "

'निष्कलंक बनून आपल्या मनासमोर उभे राहा. तोच खरा धर्म आहे. जर मनांत किल्मिष असेल, तर बाकीचें सगळें केवळ अवडंबर !'

"अन् बुम् अर् नुम् उडैत्तायिन्
इल्वाव्कै पणबुम् पयनु मदु"

'प्रेम आणि धर्म यांनीं पूर्ण असलेलें गृहस्थजीवनच श्रेष्ठ आणि सफल म्हणावें.'

"चिरै काक्कुइ् काप् पॅवन
शॅय् थुम् महाव्रिर् । निरैकाक्कुइ् काप्पे तलै"

'घराच्या चार भिंतींत बंद करून ठेवल्यानें स्त्रीचें संरक्षण होऊं शकत नाहीं. तिचें मनोधैर्य हाच तिचा उत्तम संरक्षक होय.'

"पयन् रुक्कार शॅायद् उदवि नयन् रुक्किन्
नन् मै कडलिर् पॅरिदु"

'प्रतिफलाची अपेक्षा न धरतां केलेल्या उपकाराची महत्ता सागराहूनहि विशाल आहे.'

वल्लुवराचा हा ग्रंथ 'कुरळ्' या छंदांत होता. पण मदुरेच्या विद्वत्सभेनें त्या नांवाच्या मागें 'तिरु' ही पूज्यतादर्शक उपाधि जोडली. जें काव्य तिथें येतांना नुसतें 'कुरळ्' होतें, तेंच तिथें आल्यावर 'तिरुकुरळ्' बनलें. त्याचा कर्ता साधा वल्लुवर होता तोहि 'तिरुवल्लुवर' झाला. या ग्रंथांतले विचार सर्वंकष आहेत. त्यांचा स्वाद सार्वभौम आहे, देशकालातीत आहे. तमिळ साहित्याचा तो एक अमृतकलश आहे. वल्लुवरच्या या धवल यशानें भारावलेले जैन, बौद्ध, वैष्णव, त्याला आपापल्या पंथांत ओढतात. आपल्या पंथाचा देदीप्यमान तारा म्हणून सगळेच त्याला पुढें करतात.

या तिरुवल्लुवरच्या बाबतींत अजूनहि विद्वानांत वादंग चाललेलें आहे. वल्लुवर या त्याच्या नांवावर आधारून बनलेल्या दंतकथा, तो 'वल्लवन' या हीन जातींत जन्मल्याचें सांगतात. पण संशोधकांना ही गोष्ट मान्य नाहीं.

त्यांनीं त्याच्या नांवाची निराळ्या उपपत्तीनें उकल केली आहे. वल्लवर किंवा वल्लवन हा संस्कृत 'वल्लभ' शब्दाचा अपभ्रंश आहे. तिरुवल्लुवर म्हणजे 'श्रीवल्लभ.' हा एक राजकीय किताब आहे. वल्लुवर हा तत्कालीन एखाद्या राज्याचा आर्य चाणक्याप्रमाणें प्रधान किंवा उच्चाधिकारी असावा. हीन जातींत जन्मलेल्या आणि राजकारणाचा गंध नसलेल्या एखाद्या पुरुषाला 'कुरळ्' सारखा ग्रंथ लिहितां येणें सर्वथा अशक्य आहे. त्या ग्रंथांतले राजकीय आणि व्यावहारिक विचार राजकारणाच्या खोल पाण्यांत पोहलेल्या एखाद्या मुरब्बी पुरुषालाच सुचणें शक्य आहे. 'येरा गबाळांचें' तें काम नव्हे.

संशोधकांचा हा युक्तिवाद पटण्याजोगा आहे खास !

तिरुकुरळ्च्या पश्चात् जवळ जवळ त्याच्याच तोडीचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'नालडियार.' हा एक विचारपरिप्लुत नीतिग्रंथ असून एका जैन कवीनें त्या वचनांचा संग्रह केला आहे. त्यांतील प्रत्येक पद्य चार चरणांचें आहे. म्हणून त्याला 'नालडियार' म्हणतात. याची पद्यसंख्या चारशें असून हाहि ग्रंथ विद्वानांच्या प्रशंसेस पात्र झाला आहे. या ग्रंथाच्या उत्पत्तीविषयीं एक आश्चर्यजनक कथा आहे ती अशी—

सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं ऐंशी हजार जैन साधू नीलगिरि इत्यादि पर्वतांत राहात होते. एकदा त्यांच्या प्रदेशांत दुष्काळ पडला आणि ते जीव जगविण्यासाठीं म्हणून पांड्य देशांत आले. तिथल्या राजानें सत्कारपूर्वक त्यांना ठेवून घेतलें. कालांतरानें दुष्काळ संपला आणि साधूंनीं परत आपल्या गिरिप्रदेशांत जायचें ठरवलें. पण राजाला ही गोष्ट रुचली नाही. हे साधू धर्मज्ञ आणि पंडित असल्यानें त्यांना जाऊं दिल्यास राज्याची सांस्कृतिक-दृष्ट्या मोठी हानि होईल, या कल्पनेनें त्यानें त्यांना परवानगी नाकारली. पण साधूंना नगरवास नकोसा झाला होता. त्यांनीं एका रात्रीं गुपचूपपणें तिथून पलायन केलें. दुसऱ्या दिवशीं तपास करतां असें दिसलें, कीं प्रत्येक साधूच्या आसनाखालीं एकेक पद्य लिहलेलें आहे. राजानें तीं पद्यें वाचलीं; पण त्यांचा एकाचा दुसऱ्याशीं कांहीं मेळच बसेना. 'काय करायचें आहे असलें गबाळ' म्हणून त्यानें ते सगळे तुकडे नदींत फेकायला सांगितले. पण

आश्चर्य असें, कीं जो गठ्ठा होता तो लाटांवर पसरून पांगून गेला आणि त्यांतलीं निवडक चारशें पद्यें वाहून न जातां परत किनाऱ्याला येऊन लागलीं. मग राजाचे डोळे उघडले. त्यानें त्या पद्यांचा संग्रह करायला लावला आणि त्याला 'नालडियार' असें नांव दिलें. हा ग्रंथ संन्यासप्रधान असून त्यांत गृहस्थाश्रमाला दुसरें स्थान दिलेलें आहे. त्यांतल्या नैतिक विचारांचे कांहीं कण वाचण्याजोगे आहेत—

"तुकळ्तीर् पेरुञ्चेल्वम् तोन्रियक्काल तोट्टुप्
पकडु नडन्द कूष् पल्लारोडुण्क
अकडुर यार् माट्टुम् निल्लादु शॅल्वम्
शकटक्काल पोलवरुम्"

'पवित्र कृषिकर्मादि द्वारा मिळवलेली संपत्ति हीच श्रेष्ठ संपत्ति आहे. तिच्यांतून प्राप्त झालेलें अन्न आपल्या मित्र-बांधवांना वांटून मगच त्याचा स्वतः उपभोग घ्यावा. संपत्ति ही कोणाजवळहि कायमची राहत नाहीं. संपत्ति अन् विपत्ति यांचा नेहमी चक्रनेमिक्रम असतो.'

"तान् कॅडिनुम् तक्कार केडॅण्णरक् तन् उडम्बिन् ।
उन कॅडिनुम् उण्णार् कैत्तुणरक वान्कविन्द ।
वैयहमॅल्लाम् पॅरिनुम् उरैयरक पॉय्योडिडै
मिडैन्द शॉल"

'जो सज्जन असेल तो स्वतःवर कितीहि आपत्ती कोसळल्या तरी दुसऱ्याचें वाईट चिंतीत नाहीं. भुकेनें व्याकुळ झाला तरी अभक्ष्य भक्षीत नाहीं. आणि ब्रह्मांडाएवढें ऐश्वर्य मिळालें तरी असत्य बोलत नाहीं."

'विद्वानांचें अनुमान आहे, कीं तमिळ मधला तिसरा संघम् इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या अखेरीस विघटित झाला. पण अशी विघटना होऊनहि साहित्यनिर्मिति मात्र अव्याहत चालूच राहिली. संघकाल हें स्फुट कवितांचें युग होतें, तर पुढच्या कालांत लघु आणि महाकाव्यें निर्माण झालीं. या काळांत बौद्ध आणि जैन हे दोन्ही धर्म दक्षिण भारतांत दाखल झाले होते. त्यांनीं साहित्याचा आश्रय घेऊन आपापल्या सांप्रदायिक ज्ञानाचा प्रचार सुरू

केला होता. जैन आणि बौद्ध या दोन्ही पंथांनीं तमिळ साहित्यांत मोलाची भर घातली आहे. विशेष म्हणजे तमिळमधलीं महाकाव्यें जैन आणि बौद्ध यांनींच निर्माण केलीं आहेत. हीं महाकाव्यें म्हणजे तमिळ साहित्याचें अमूल्य रत्नभांडार होय. या काव्यांत कथानकाच्या प्रवाहाबरोबरच त्या त्या पंथाचे धार्मिक आचारविचारहि ग्रथित केलेले आहेत. त्या काळच्या तमिळनाडची धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनाची माहिती या महाकाव्यांमधूनच आपणांस मिळते. हीं महाकाव्यें पुढील नांवानीं प्रसिद्ध आहेत : शिलप्पधिकारम्, मणिमेखलै, जीवकचिंतामणि, वलयापति आणि कुंडलकेशी. पहिलीं तीन उपलब्ध आहेत; पण पुढच्या दोहोंचा पत्ता लागत नाहीं. त्यांचीं त्रुटित कथानकें अन्य ग्रंथांत कांहीं अंशीं आढळतात. शिलप्पधिकारम् म्हणजे नूपुर महाकाव्य होय. एका नूपुरावरून एका जोडप्याच्या जीवनांत ज्या उत्पाती घटना घडल्या, त्यांचें वर्णन या महाकाव्यांत आहे. संक्षेपांत त्याचें कथानक असें—

" पुहार ही चोळांची राजधानी. त्या नगरांत कोवलन् नांवाचा एक वैश्य पुत्र आणि कण्णकी नांवाची एक वैश्य कन्या या दोघांनीं जन्म घेतला. वयांत आल्यावर त्यांचा विवाह झाला. खरें म्हणजे त्यांचा संसार सोन्याचा होता. पण थोड्याच काळांत कोवलन्ची मति भ्रष्ट झाली. तो माधवी नांवाच्या एका नर्तकीच्या नादीं लागला आणि आपल्या प्रियदर्शिनी पत्नीला पूर्णपणें विसरला. त्यानें माधवीसाठीं सारी धनदौलत उधळून दिली. शेवटीं तर तो आपल्या घरादारालाहि आंचवला. त्यापुढें त्याला नगरांत राहणें अशक्य झालें. तो कण्णकीला घेऊन घराबाहेर पडला आणि मदुरेंत पोंचला. त्यावेळीं त्याच्याजवळ शिल्लक असलेली दौलत म्हणजे कण्णकीचीं दोन नूपुरें. तींच मोडून खाण्याची त्याच्यावर वेळ आली. तो त्यांतलें एक नूपुर काढून घेऊन तें बाजारांत विकण्यासाठीं निघाला.

वाटेंत त्याला दरबारचा सोनार भेटला. तो महाठक होता. त्यानें राणीचें एक नूपुर चोरलें होतें आणि राणी त्या चोरीचा जारीनें तलास करीत होती. त्यामुळें आज ना उद्यां त्या सोनाराची गठडी वळण्याची शक्यता होती. सोनार त्याच चिंतेंत होता. अशा वेळीं कोवलन् नेमका त्याला भेटला. त्याच्या हातांतलें तें नूपुर थेट राणीच्या नूपुरासारखें होतें. तें पाहून

सोनाराचे घातकी डोळे चमकले. त्यानें चोर म्हणून कोवलन्लाच पकडलें आणि मुद्देमालासह राजापुढें उभें केलें. राजानेंहि योग्य तो विचार न करतां कोवलन्ला मृत्युदंडाची शिक्षा दिली. कोवलन् बिचारा राजाच्या क्रोधाला नाहक बळी पडला. ही गोष्ट कण्णकीला समजली. ती दुःखशोकानें बेभान झाली. दुसरें नूपुर घेऊन तिनें राजवाड्याचा रस्ता धरला आणि आपल्या पतीचें निरपराधित्व सिद्ध केलें. तो राजा न्यायप्रिय होता. आपण चोराला सोडून संन्याशाला बळी दिलें, या अनावर पश्चात्तापानें तो सिंहासनावरून खालीं कोसळला अन् त्याच क्षणीं मृत्यु पावला. पण तेवढ्यानें कण्णकीचा क्रोध शमला नाहीं. तिनें आपल्या पातिव्रत्याच्या तेजानें अग्नि उत्पन्न करून सारें मदुरानगर जाळून भस्म केलें. नंतर ती वेड्या-सारखी भटकत चेर राज्यांत पोंचली आणि तिथल्या एका डोंगरावर चढून सदेह स्वर्गाला गेली."

इळंगोवडिहळ् हा या महाकाव्याचा कर्ता आहे. तत्कालीन चेर राजाचा हा धाकटा भाऊ होता. चेर राजे वैष्णव होते; पण इळंगोनें मात्र तारुण्यांतच जैन धर्म स्वीकारून मुनिव्रत घेतलें होतें. तमिळ भाषेंतलें हें पहिलें महाकाव्य होय. हें प्रवाही नाट्यमय शैलींत लिहिलेलें आहे. तो तत्कालीन तमिळ समा-जाचा आरसा आहे म्हटलें तरी चालेल.

'मणिमेखलै' हें महाकाव्य शिलप्पधिकारमूचाच उत्तरार्ध आहे. कोवलन्पासून माधवीला झालेल्या कन्येचें नांव मणिमेखलै असें होतें. तिचीच कथा या महाकाव्यांत वर्णित आहे. याचा कर्ता शीतलै शात्तनार हा शेवटच्या संघमूचा सभासद होता. त्यानें तीस सर्गांत आपली काव्यकथा वर्णिली आहे. या कथानकाचे दुवे विस्कळीत आहेत; पण तरीहि त्यांत कवीची सुंदर भाषाशैली आणि गाढी विद्वत्ता दिसून पडते. हा कवि बौद्ध होता आणि त्यानें वैदिकधर्मी पंडितांशीं अनेक वार दंड थोपटून शास्त्रार्थ केले होते. त्याच्या या वादप्रवृत्तीचें प्रतिबिंब मणिमेखलैमध्येंहि पडल्यावांचून राहिलें नाहीं.

'जीवकचिंतामणि' हें तिसरें महाकाव्य एका जैन मुनीचें आहे. त्याचें नांव तिरुतक्क देवर. हें या पंचमहाकाव्यांच्या मालिकेंतलें शेवटचें महाकाव्य होय. इसवी सनाच्या नवव्या शतकांत याची रचना झाली. या महाकाव्यांत

जीवक नांवाच्या एका राजकुमाराचें विलासी आणि पराक्रमी जीवन चित्रित केलेलें आहे. या काव्यांत शृंगार रसाचा महापूर लोटला आहे. त्या पुरावर जैन धर्माचे सिद्धांतहि अधून मधून तरंगतात. याचा नायक म्हणजेच जीवक तारुण्यांत अनेक विवाह करतो, नानाप्रकारचे समृद्ध विलास भोगतो, अनेकांशीं युद्धें खेळतो आणि शेवटी जीवनाची क्षणभंगुरता जाणून राज्यत्याग करून संन्यस्त होतो. या काव्यावर श्रीकृष्णाच्या चरित्राची छाप आहे. त्या काळच्या तमिळ प्रदेशाचें समाजजीवन त्यांत व्यक्त झालें असल्यानें ऐतिहासिकदृष्ट्या या महाकाव्याला महत्त्व प्राप्त झालें आहे. कंबन्नें आपलें रामायण याच महाकाव्याच्या शैलीनें लिहिलें आहे आणि त्यांतल्या अनेक कल्पनाहि उचलल्या आहेत.

पंचमहाकाव्यांप्रमाणेंच पंचलघुकाव्यें हीसुद्धा याच कालांतली रचना आहे. नीलकेशी, चूडामणि, यशोधरकाव्यम्, नागकुमारकाव्यम् आणि उदयणन्कदै अशीं त्यांचीं नांवें आहेत. या पांचांपैकीं चूडामणीची कथा थोडक्यांत अशी—

प्रजापति नांवाचा एक राजा होता. त्याला दोन राण्या होत्या. दोघींना दोन पुत्र झाले. त्यापैकीं विनयन् हा गोरा आणि तिविट्टन् हा काळा निघाला. मात्र दोन्ही मुलगे नाकीं डोळीं नीटस आणि सुरेख होते. एके दिवशीं एक ज्योतिषी राजाकडे आला आणि त्यानें राजाला सांगितलें.

"राजा, तुझ्या या काळ्या तिविट्टन्चा स्वर्गातल्या अप्सरेशीं विवाह होईल!"

राजाला त्या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें. त्या भविष्यावर त्याचा विश्वासच बसेना. पण त्याचवेळीं स्वर्गात अप्सरांच्या राणीलाहि तसेंच स्वप्न पडलें आणि ती तिविट्टन्चा शोध करीत त्या राजाकडे आली. तिनें आपली मुलगी देऊन तिविट्टन्ला जांवई केलें.

या कथेंत समाजमनावरचा ज्योतिष्यांचा पगडा, वधूनें वराची केलेली निवड, वीरांचीं रोमहर्षक युद्धें, समाजातल्या अनेक चालीरीती, असा भरपूर रोचक मालमसाला आहे. त्याच्याच जोडीनें जैनांच्या धर्मसिद्धांतांचेंहि विवेचन आहे.

या काळांतल्या आणखी एका नांवाजल्या ग्रंथाचा उल्लेख करणें जरूर आहे. याचें नांव 'कलिथ्थोकई.' हा दीडशें प्रेमगीतांचा संग्रह आहे मदुरेंतल्या नल्लंथुवनर नांवाच्या एका पंडितानें या प्रेमगीतांचा संग्रह केला आहे. प्राकृत भाषेंतली हालाची जशी सप्तशती, तसाच हा ग्रंथ समजला पाहिजे. हीं पद्यें बहुतांशीं संवादात्मक आहेत. गीतगोविंद या काव्यांत एक राधा असते, एक तिची सखी असते आणि तिसरा रासविहारी श्रीकृष्ण असतो. या तिघांच्या भावनांतून आणि संदेशांतून तें काव्य जसें आकार घेतें, तसेंच याहि पद्यसंग्रहाचें आहे. एक नवयौवना तरुणी, एक तिची दासी आणि एक त्या रमणीचा प्रियकर, यांच्या संवादांनीं हा काव्यसंग्रह रंगलेला आहे. विशुद्ध शृंगाराचा हा एक नमुना असून अश्लीलता किंवा अतिरेक यांचा त्याला कुठेंहि स्पर्श झालेला नाहीं. यांत अनेक जोडपीं अन् त्यांचीं अनेक प्रेमळ दृश्यें दिसतात. त्यांतलें एक दृश्य जातां जातां पाहून घ्या—

"एक नवयुवक शिकारीला निघाला आहे. वाटेंत त्याला एक आमराई दिसते. तिथें झोल्यावर एक तरुणी झोंके घेत बसलेली असते. तिला पाहतांच हा तरुण मदनविव्हल होतो व तिथेंच खिळून राहतो. मग पुढें होऊन तिचा अनुनय करूं लागतो. पण ती विनयवती मनांत असूनहि त्याच्या अनुनयाला उत्तेजन देत नाहीं. मग तो तरुण तिच्या दासीशीं संधान बांधतो. तिच्या स्वामिनीच्या सौंदर्याचें स्तोत्र करतो. दासीला त्याच्या मनींचें आर्त कळतें. ती आपल्या स्वामिनीशीं त्याच्याविषयीं रदबदली करते. हळू हळू तरुणीचाहि अनुराग जागृत होतो. मग कधीं दिवसा तर कधीं चांदण्या रात्रीं अशीं तीं दोघें एकमेकांना वारंवार भेटूं लागतात. कांहीं दिवसानंतर तो तिला हळूच सांगतो, कीं 'आपल्याला प्रवासाला जावें लागणार.' त्यावर ती कावरी, बावरी होऊन विचारते—

"कोणत्या गांवीं जाणार?"

"दूरच्या देशीं! फार लांब........"

"वाटेंत रानंवनं लागतील, हिंस्र पशू भेटंतील, चोर चांडाळ गांठतील, अनेक संकटं ओढवतील. मी पाया पडतें, तुम्ही जाऊं नका."

"छे, छे! मला गेलंच पाहिजे. काम अत्यंत महत्त्वाचं आहे."

"मग मलाहि बरोबर घेऊन चला."

"वेडी कीं काय? अग तूं किती नाजुक, किती सुकुमार! तुला इतक्या लांबचा प्रवास झेपायचा नाहीं."

"काळविटाच्या मागून हरिणी जाते. मीनजातीलाहि आपल्या प्रियकराचा विरह सहन होत नाहीं. मग मी तर माणूस आहें. माझं हृदय तुमच्या जिवाला जडलं आहे. तुम्हीं मला नेलं नाहीं, तर मी खाणं पिणं वर्ज्य करीन. तुमचा निदिध्यास घेऊन अखेर एक दिवस मरून जाईन!"

त्या भाषणानें प्रियकराचें मन द्रवतें. तो तिला बरोबर घेऊन निघून जातो. मुलगी नाहिशी झालेली पाहून तिच्या आईचें काळीज गलबलतें. ती तिच्या शोधार्थ निघते. रस्त्यांत भेटेल त्याला विचारीत सुटते.

"एका तरुण माणसाबरोबर, एक तरुण मुलगी तुम्हीं जातांना पाहिलीत का हो?"

वाटसरू तिला सांगतात.

"प्रेम करणाऱ्या तरुणाबरोबर तुझी तरुण मुलगी पळून गेली, तर त्यांत गैर तें काय झालं?"

"अहो! मी तिची आई आहें."

"असशील! पण म्हणून काय झालं? मोतीं जन्माला घालतो समुद्र; पण त्यांची माळ पडते राजाच्या गळ्यांत. पोवळीं खडकांत पैदा होतात, पण खडकांना त्यांचा उपयोग नसतो. तीं धारण करणारा रसिक श्रीमंत वेगळाच असतो."

आई बिचारी निराश होते. जड पावलांनीं घरीं परत येते. कांही दिवसांनीं मुलगी आपल्या प्रियकरासह येऊन आईला भेटते. आणि मग? ....मग शुभमंगल सावधान!

संघमूकालानंतर तमिळ वाङ्मयांत भक्तियुग अवतीर्ण होतें. या काळांत समाजामध्यें ज्या धार्मिक आणि पारलौकिक प्रवृत्तींचा प्रादुर्भाव झाला, त्यालाच पुढें भक्तीची जोड मिळाली. ही भक्ति काव्यधारेच्या रूपानें तमिळनाडच्या भूमिवर खळाळून वाहिली. या भक्तिकाव्यांचें शैत्य आणि

पावनत्व आजहि अनुभवाला येणारें आहे. हीं भक्तिपर काव्यें शैव आणि वैष्णव कवींनीं रचलेलीं आहेत. संघमूच्या काळांत तमिळनाडमध्यें बौद्ध आणि जैन यांनीं आपला जम चांगला बसवला होता. वैदिक धर्माच्या वृक्षाला त्यांनीं आंतून पोखरलें होतें. वैदिक भावनांचीं पाळेंमुळें उचकटून काढलीं होतीं. पण या काळांतले शैव–वैष्णव असे कांहीं प्रबळ आणि समर्थ निघाले, कीं त्यांनीं तमिळनाडमधून जैन अन् बौद्ध यांनाच बाहेर पिटाळलें. तिकडचे लोक या कवींना ईश्वरी अवतार समजून भजतात, तें उगीच नाहीं.

जैन–बौद्धांच्या कालांत समाज खऱ्या जीवनाला विन्मुख झाला होता. नैराश्याचें आणि निरसुटलेपणाचें पटल सर्वत्र पसरलें होतें. नाट्य, नृत्य, संगीत या ललितकला तुच्छ आणि हीन बनल्या होत्या. अशा वेळीं या कविश्रेष्ठांनीं गेय छंदांत दैवी प्रेमाच्या कविता रचून गायिल्या आणि लोकांचें कान, मन तृप्त केलें. त्यांनीं प्रेमकाव्याला तर नवजीवन दिलेंच; शिवाय तिकडच्या शैव–वैष्णव मंदिरांतून नृत्याची एक परंपरा निर्माण केली. ते देवाचे लाडके भक्त तसेच ललितकलांचे पुरस्कर्तेहि बनले. त्यांनीं जनतेला आपल्या काव्याच्या द्वारें जो संदेश दिला, त्याचें सार पुढील थोडक्याच वाक्यांत सांगतां येईल—

‘ हें विश्व जड तसेंच चेतन आहे. गुणदोषांनीं भरलेलें आहे. ही दैवी प्रकृतीची छाया आहे. छाया म्हणजे सत्य नव्हे हें खरें; पण सत्यरूप प्रकाशाचीच ती छाया आहे, हें विसरतां कामा नये. अमूर्त सत्य या छायेंत लपलेलें आहे. तें शोधून काढणें हें मानवी जीवनाचें ध्येय होय. जीवन हें त्या महान् ध्येयाच्या पूर्तीचें साधन आहे. म्हणूनच तें पवित्र आहे, सुंदर आहे, तसेंच लोभनीयहि आहे. त्याची निंदा किंवा हेटाळणी करणें योग्य नाहीं........’

तमिळनाडमध्यें शिवाचे परमभक्त असे त्रेसष्ट कवी होऊन गेले. ते स्वच्छंद होते आणि लौकिक व्यवहारापासून अलिप्त होते. त्यांना नायन्मार अशी संज्ञा आहे. या नायन्मारांत कालक्रमानें पहिलें स्थान ओव्वैयार या वैश्य स्त्रीला मिळालें आहे. तिची रचना ‘ कयीलैत्ति तिरुवंदादि ’ ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. आपल्या काव्यांत तिनें कैलासावर विराजमान असलेल्या शंकराचें ओजस्वी चित्र रेखाटलें आहे.

2५३०८ दि. ... २३ ... २४२ ... ९५७१८

नायन्मारांतले प्रमुख कवि चार : मणिक्कवाचकर, तिरुज्ञानसंबंधर, अप्पर आणि सुंदरर. ह्यापैकीं मणिक्कवाचकरची कविता 'तिरुवाचकम्' या नांवानें ओळखली जाते. उरलेल्या तिघांच्या काव्यसंग्रहाला 'तेवारम्' म्हणतात. 'तिरुवाचकम्' ही कवीच्या आध्यात्मिक अनुभूतींची कहाणी आहे. तिथल्या प्रचलित लोकगीतांच्या चाली उचलून त्यानें आपली काव्यमाला गुंफली आहे. 'तेवारम्' हा दहा दहा कवितांचा एकेक गुच्छ आहे. प्रत्येक दशकांत एखादा भाव तरी असतो किंवा एखाद्या क्षेत्राचें वर्णन तरी असतें. दशकाच्या शेवटीं एका चरणांत कवीची नाममुद्रा असते. तुकोबांच्या अभंगांत जशी 'तुका म्हणे' ही नाममुद्रा असते तशी. अप्परची कविता रहस्यवादी अन् मार्मिक आहे. त्याला सारें विश्व शिव-शक्तीच्या स्वरूपांतच दिसतें. त्याच्या कवितेंत विरह-वेदनेची एक सूक्ष्मशी कळ भरुन राहिली आहे. तो ईश्वरवर्णनाच्या जोडीनें प्रकृतिवर्णनालाहि महत्त्व देतो.

सुंदररची कविता सख्यभक्तीनें ओथंबलेली आहे. अर्जुन आणि श्रीकृष्ण यांचा जो सख्यसंबंध तोच आपला आणि शिवाचा आहे, असें तो मानतो. आपल्या मनांतील बऱ्या-वाईट गोष्टी तो शिवाला निःसंकोचपणें सांगतो. आपलें अंतःकरण त्याच्यापुढें उघडून ठेवतो. कवि म्हणून तर सुंदररची ख्याति आहेच; शिवाय त्यानें आपल्या पूर्वींच्या संतांचीं काव्यें सुरक्षित राखून पुढिलांना त्यांचा वारसा पोंचविण्याचें महान् कार्य केलें आहे. या दृष्टीनें आपल्या एकनाथमहाराजांशीं त्याची तुलना करतां येईल. नाथांनींहि ज्ञानेश्वरीचे पाठ शुद्ध करून आणि तिच्यावर प्रवचनें सांगून ती भावी कालांत लोकादराला पात्र केली.

सुंदररच्या दशक काव्याच्या आधारावरच पुढें शेक्कीळार नांवाच्या कवीनें 'पेरियपुराणम्' नांवाच्या एका मनोज्ञ काव्याची रचना केली. या काव्यांत सकल शैव कवींच्या जीवनगाथा वर्णिलेल्या आहेत. शेक्कीळार म्हणजे महाराष्ट्राचा महीपति समजला पाहिजे. 'पेरियपुराणम्' हा ग्रंथ तमिळनाड-मधल्या शिवभक्तांचा अनमोल ठेवा आहे. त्याचा सर्वत्र प्रसार आहे. यांत भक्तचरित्रें तर गायिलेलीं आहेतच; शिवाय 'तेवारम्' गीतांतलीं सूक्ष्म तत्त्वेंहि उलगडून दाखविलेलीं आहेत.

तमिळमधलें दुसरें एक लोकप्रिय पुराण म्हणजे ‘ कंदपुराणम् ’ हें होय. याचा कर्ता कच्चियप्प शिवाचारियर. हा मोठा विद्वान् होता अन् कांची नगरींत राहत होता. ‘ कंदपुराणम् ’ म्हणजे ‘ स्कंदपुराण. ’ या पुराणांत स्कंदाचें म्हणजेच सुब्रह्मण्याचें चरित्र त्याच्या अद्भुत कृत्यांसह विस्तारानें वर्णिलेलें आहे. तमिळनाडमध्यें या पुराणाचा मोठा आदर आहे. सुरस, सुंदर वर्णनें आणि रसार्द्र भाव या दोन्ही गोष्टींनीं हा ग्रंथ ‘ अमृतातेंहि पैजा जिंकणारा ’ झाला आहे. पुष्कळ घरीं आपल्याकडील गुरुचरित्राप्रमाणेंच या ग्रंथाचा नित्यपाठ चालतो.

## रामायणकर्ता कंबन

याच्या जोडीनें नामोल्लेख करावा लागतो तो कंबन्चा. तमिळ भाषेंत रामायणाची रचना करणारा हा पहिला महाकवि होय. या गुणश्रेष्ठ कवीचा जन्म नक्की कोणत्या शतकांत झाला, हा प्रश्न अजून विवाद्य आहे. कुणी त्याला नवव्या शतकांतला मानतात, तर कोणी त्याला बाराव्या शतकापर्यंत पुढें ओढतात. त्याचा जन्म, जात, आई-वडील, या सर्वच बाबतींत भिन्न मतें आहेत. त्याचें खरें चरित्र संदिग्धतेच्या धुक्यांत सांपडलें आहे. त्यामुळें त्याच्याविषयींच्या दंतकथांची चलती आहे. सर्वानुमतें एक गोष्ट निश्चित आहे ती ही, कीं त्याचा जन्म तिरूवळुन्दूर या गांवीं झाला. पण हा शैव होता, का वैष्णव होता, हेंहि निश्चित सांगणें कठीण आहे. मात्र तो कोणीहि असला, तरी शैव अन् वैष्णव या दोघांनाहि त्याच्याविषयीं प्रेमादर आहे. षडयप्प मुदलियार या नांवाच्या एका जमीनदारानें त्याचें पालनपोषण केलें. कंबन्नें आपल्या रामायणांत अनेक स्थळीं या आपल्या पालकाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे.

हा रामकथा लिहीत असतांना वाल्मीकीला अनुसरला आहे खरा; पण तो केवळ वाल्मीकीचा भाषांतरकार नव्हे. स्वतःच्या दृष्टीनें त्यानें रघुकुलनंदन राम पाहिला, स्वतःच्या भावनेनें रामायणाच्या रससागरांत तो डुंबला आणि स्वतंत्रपणें त्यानें रामायण रचलें. तमिळमधला हा एक रसिकमान्य असा ग्रंथराज आहे. तो सागरासारखा अथांग आणि तसाच रत्नाकरहि आहे. कंबन् हा असामान्य कल्पक आहे. तो दक्षिणापथाच्या प्रतिभेचा प्रतिनिधि

आहे. त्याच्या रामायणांत हिंदुधर्माची परंपरा, दक्षिणेची संस्कृति आणि त्याची आध्यात्मिक बैठक, या सर्वांचा साक्षात्कार घडतो. एकनाथांप्रमाणेंच त्यानेंहि व्यक्ति आणि स्थळें यांचें वर्णन करतांना त्यांवर नैतिक आणि आध्यात्मिक रूपकें बसविलीं आहेत. मिथिला हें जानकीचें माहेर. तिला तो सद्भावाचें स्थान मानतो. लंकेला अधर्माचा वसौटा ठरवतो. कोणत्याहि देशाचें माहात्म्य तिथें धान्य किती पिकतें अथवा भौतिक वैभव किती लखलखतें, यावर नसून त्या देशांत सद्गुणी आणि सच्छील माणसें किती निपजलीं, त्यावर अवलंबून आहे, असें कंबन् सांगतो. तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्याची धारणा अशी—

"मौलिक सत्य एकच आहे. तेंच भिन्न भिन्न संप्रदायांच्या रूपानें सर्वत्र पसरतें. जसा एकच आत्मा वेगवेगळ्या शरीरांत प्रविष्ट व्हावा, तसें! तें मूलभूत सत्य प्रेममय आहे. शिक्षणाच्या द्वारें त्याचें ज्ञान करून घ्यायचें असतें. शिक्षणाचें ध्येय तेंच. राजनीतींतहि दंडापेक्षां प्रेमाचा समावेश अधिक व्हायला हवा. त्यामुळें जगांतलीं युद्धें थांबतील आणि यश तेवढें चिरंतन राहील....."

त्यानें प्रेममय बंधुभावाची प्रशंसा रामाच्या मुखानें केली आहे. त्याचा राम म्हणतो—

"आम्ही मूळचे चौघे बंधू. पुढें निषादपति गुहक भेटला, तेव्हां झालों पांच. सुग्रीवाच्या मैत्रीनें झालों सहा आणि बिभीषण येऊन भेटला तेव्हां झालों सात."

रामराज्याचें वर्णन त्यानें एका निराळ्याच ढंगानें केलें आहे—

"कोदैहळ् शोरिवन कुळिर् इळ नरवम्
पादैहळ् शोरिवन परिमाणि कनहम्
ऊदैहळ् शोरिवन उयिर् उरुम् उमदम्
कादैहळ् शोरिवन शेविनुहर् कनिहळ्"

'रामराज्यांत फुलांच्या हारांतून मध गळत रहातो. जहाजांतून सोनें आणि हिरेमाणकें शरयूच्या किनाऱ्यावर टाकलीं जातात. वारे सदैव सुखस्पर्शी;

त्यामुळें जीव कसा शांत होतो. अन् काव्यरसवंतीच्या मधुर गीतांमुळें कान अगदीं तृप्त होतात.'

आपलें रामायण पुरें होतांच तो श्रीरंगम्ला गेला. त्यानें तिथल्या विद्वन्मंडळीला तें ऐकवलें. त्याचें श्रवण करतांना पंडितांना समाधानाचे डोल आले आणि त्यांनीं कंबन्ला 'कविच्चक्रवर्ती' ही पदवी दिली. असें सांगतात, कीं ओट्टक्कुत्तुर नांवाच्या एका कवीनें कंबन्च्याहि पूर्वीं तमिळ भाषेंत रामायण लिहिण्याचा उद्योग सुरू केला होता. त्याचें बालकांड लिहून पुरेंहि झालें होतें. पण कंबन्चें रामायण त्यानें जेव्हां ऐकलें, तेव्हां त्याला आपली योग्यता किती तें कळलें. त्यानें 'हात दाखवून अवलक्षण नको,' म्हणून स्वतःचें बालकांड स्वतःच्याच हातांनीं फाडून टाकलें. ओट्टक्कुत्तुर हा वयोवृद्ध तर होताच; शिवाय त्याला आपल्या कवित्वाचा दर्पहि होता. अशा या आढ्य कवीनें आपली रचना फाडून एका नव्या कवीचें श्रेष्ठत्व मान्य करावें यांतच कंबन्चा खरा गौरव आहे. कंबन् आपल्या रामायणाच्या पोथीसह दक्षिणेंतल्या अनेक स्थळांत आणि राज्यांत हिंडला. त्यानें सर्वत्र रामकथा गाऊन रसिकभक्तांचे कान तृप्त केले. कंबन् एखाद्या राज्यांत गेला, कीं तिथल्या राजाला आपला गौरव झाला असें वाटे. तो राजा मग त्याच्या स्वागतासाठीं मोठा सार्वजनिक सोहळा करी. त्याला आपल्या घरीं काहीं दिवस सन्मानानें ठेवून घेई.

नवव्या शतकापासून तों चौदाव्या शतकापर्यंतचा काळ हा तामिळ वाङ्मयांत 'कंबन्काल' या नांवानें ओळखला जातो. याच काळाच्या शेवटीं विल्लिपुत्तुरार या कवीनें तमिळ भाषेंत महाभारत रचलें. अशा प्रकारें कंबन्कालानें रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृतीचे दोन महान् मौलिक ग्रंथ तामिळ भाषेला सादर केले. कंबन्युग या दोन ग्रंथराजांच्या देशी अवतारानें धन्य झालें!


चौदाव्या शतकानंतर तमिळनाडमध्यें मोठ्या प्रमाणावर राजकीय उलाढाली झाल्या. हळूहळू पुरातन तमिळ राज्यें इतिहासजमा होऊन त्यांच्या जागीं आंध्र, मराठे, मुसलमान यांच्या सत्ता प्रबळ झाल्या. त्या काळांत ज्या लढाया आणि घालमेली झाल्या, त्यांनीं समाजजीवनांतलें स्थैर्य लोपलें. 'गृह,

सुत, धन, दारा ' यांपैकीं कशाचीच शाश्वती उरली नाहीं. लोकांच्या मनांत निराशेचें साम्राज्य पसरलें. त्या नैराश्यांतून फसवा, गुळचट अध्यात्मवाद डोकें वर काढून आला. प्रयत्नापेक्षां वैराग्यालाच विशेष भाव आला. ही समाजाची मनोवृत्ति साहित्यांतहि उमटल्यावांचून राहिली नाहीं. तत्कालीन कवी, मृत्यूचीं आणि नश्वरतेचीं गाणीं गाऊं लागले. ' सिद्ध ' कवींचा एक नवाच संप्रदाय पुढें आला. त्यानें वैराग्याची तळी उचलून धरली. योगसाधनेच्या द्वारें अमरत्व प्राप्त करून देण्याची धुन त्यांनीं समाजांत सुरू केली. यापुढच्या काळांत विशेषत्वानें अध्यात्मपर ग्रंथांची निर्मीति झाली. शैवसिद्धांत, शिवज्ञानबोधम् आणि कैवल्यनवनीतम् हे अशा ग्रंथांपैकीं नांवाजते ग्रंथ होत.

सतराव्या शतकाच्या मध्यभागीं कुमरगुरुपर नांवाचा एक विद्वान् संत तामिळनाडमध्यें निर्माण झाला. त्यानें अनेक प्रबंधकाव्यें रचलीं. अठराव्या शतकाच्या प्रारंभींचा प्रसिद्ध संत म्हणजे तायुमानवार. हा अद्वैतवादी आणि विश्वप्रेमाचा प्रचारक असा कवि होता. यानें अनेक स्तोत्रें रचून त्यांच्या द्वारें शैव सिद्धांतांचा प्रचार केला. याच शतकांतला पादरी बेस्की हा एक विदेशी आणि विधर्मी कवि. हा तमिळ भाषेचा प्रकांडपंडित होता. त्यानें ' तेंबावाणी ' नांवाचें काव्य रचून त्यांत येशूख्रिस्ताची जीवनकथा गायिली आहे. एकोणिसाव्या शतकांतला नांव घेण्याजोगा कवि म्हणजे रामलिंगस्वामीगळ् हा होय. ' तिरुअरुळ्पा ' म्हणजे कृपागीत, हा त्याचा काव्यसंग्रह. याच्या काव्याचा खूप बोलबाला झाला. तमिळ जनतेनें ' नवा वेद ' म्हणून त्याचा स्वीकार केला. आजहि तिकडच्या मंदिरांतून रामलिंगस्वामींचें काव्य भगवंताच्या आराधनेसाठीं गायिलें जातें. हा जरी शैव होता, तरी त्याचें मत आग्रही नव्हतें. खरें म्हणजे तो समन्वयवादी होता. तो ईश्वराला ज्योतिःस्वरूप मानून त्या रूपांतच त्याची उपासना करी. त्यानें जो नवा मार्ग प्रवर्तित केला तो ' समरस-सन्मार्गम् ' नावानें प्रसिद्ध आहे. याच शतकांतला आणखी एक महाविद्वान् कवि म्हणजे मीनाक्षीसुंदरम् पीळ्ळै हा होय. यानें विसांहून अधिक लघुकाव्यें रचलीं आणि तमिळ भाषेंत तोलामोलाचे शिष्य निर्माण केले.

याच सुमारास तमिळनाडमध्यें आणखी एक युगप्रवर्तक कवि गाजून गेला. त्याचें नांव गोपालकृष्ण भारती. ' नंदनचरित्रम् ' हें त्यानें निर्माण केलेलें काव्य

होय. नंदनार नांवाचा एक हरिजन संत तमिळनाडमध्यें झाला होता. जसा महाराष्ट्राचा चोखामेळा, तसाच हा तमिळनाडचा साधुपुरुष. याचें चरित्र अद्‌भुत घटना आणि अनेक समरप्रसंग यांनीं खच्चून भरलेलें आहे. गोपालकृष्ण भारतीनें तेंच काव्यबद्ध करून लोकप्रियता मिळवली. लोकगीतांची शैली आणि ग्रामीण बोलभाषा यांचा आश्रय केल्यामुळें, तो समस्त ग्रामजनतेचा कंठमणि बनला. घरोघरीं त्याचें काव्य गायिलें जाऊं लागलें. नंदनचरित्रम्‌मधल्या चार ओळी तरी ज्याला मुखोद्‌गत नाहींत, असा माणूस त्या भागांत मिळणें कठीण आहे. तमिळ काव्यसृष्टींत पुढें जें आधुनिक युग निर्माण झालें, त्या युगाचा गोपालकृष्ण भारती हा अरुणोदय होय.





# आळवार आणि नायन्मार

भागवत पुराणाच्या माहात्म्यांत स्कंदपुराणांतली एक कथा दिली असून त्या कथेंत भक्ति स्वमुखानें आपली जीवनकथा नारदाला सांगत आहे–

" उत्पन्ना द्रविडे साऽहं वृद्धिं कर्णाटके गता
स्थिता किंचिन्महाराष्ट्रे गुर्जरे जीर्णतां गता "

'माझा जन्म द्रविड देशांत झाला. कर्णाटकांत मी वाढलें. तिथून महाराष्ट्रांत येऊन मी कांही काल नांदलें. आणि पुढे गुजरातमध्यें मला म्हातारपण आलें.'

या श्लोकांतल्या पहिल्या चरणाशीं आपला संबंध आहे. सर्वांत जुनें आणि प्राचीन वाङ्मय म्हणजे आपला ऋग्वेद. ऋग्वेदांत इंद्र, वरुण यांच्या सूक्तांतून भक्तीचीं बीजें आढळतात, ही गोष्ट निःसंदिग्ध आहे. पण भक्ति ही तिच्या सांग आणि सपरिवार स्वरूपांत प्रकट झाली ती. तमिळनाडमध्येंच. तिथले 'आळवार' या नांवानें ओळखले जाणारे संत महात्मे हे या भक्तीचे जनक ठरतात. भक्ति हा भारताचा लोकधर्म होता आणि आहे. आर्यलोक वेदकाळांत यज्ञयागांचे दीक्षित आणि उपनिषत्कालांत तत्त्वज्ञानाचे उपासक होते. बौद्ध आचार्य हे यज्ञविरोध, अष्टांगिक धर्म आणि ध्यान-समाधि या गोष्टींत निमग्न होते. जैनांनीं अहिंसा आणि देहदंडना करणारें तप, यांच्यावर भर दिला होता. पण त्याच काळांत दक्षिणेंतल्या जाती-जमाती भक्तिधर्माला

अनुसरून पूजा प्रार्थना यांचें आचरण करीत होत्या. आळवार संतानीं याच भक्तीचा आश्रय केला. तिला वाढविली, मोठी केली आणि अखेर प्रपत्ति-मार्गापर्यंत आणून ठेवली. विष्णुभक्तीच्या रंगानें रंगलेलीं, करुणेनें आर्द्र झालेलीं आणि प्रेमानें ओथंबलेलीं हजारों गीतें रचून आणि गाऊन त्यांनीं तमिळनाडमधल्या जनतेला प्रेमधर्माची शिकवण दिली. याच प्रेमधर्मामुळें आळवार संत तिथल्या जनतेचे देव बनले आणि तिनें त्यांना आपले उद्धारकहि मानलें. त्यांची भावभक्तीची रसवंती जनतेच्या मनीं मुखीं रिगून सर्वांना प्रिय आणि संजीवक ठरली. त्या वाणीनें जनतेच्या जीवनाला माधुर्य प्राप्त करून दिलें आणि तिला भगवंताच्या कृपेचें आश्वासनहि मिळवून दिलें.

आळवारांचें आराध्य दैवत म्हणजे श्रीविष्णु. तमिळ भाषेंत त्याला 'पेरुमल' असें नांव आहे. आळवारांच्या भक्तीचें स्वरूप म्हणजे संपूर्ण शरणागति. 'भगवान् पेरुमल हा सर्वव्यापी आहे. तो मानवाच्या हृदयांतहि भरून राहिला आहे. म्हणून माणसानें आपलें शरीर हें देवाचें राऊळ आहे, असें समजून त्याला निजहृदयांत पुजावें, भजावें,' असें ते सांगतात. जो दीन आहे, निराधार आहे, त्यानें आत्मकल्याणासाठीं श्रीहरीचा आश्रय करावा, असा त्यांचा सिद्धांत आहे. पुढच्या काळांत रामानुजाचार्यांनीं याच शरणागतीच्या मार्गाला प्रपत्तिमार्ग अशी संज्ञा देऊन त्याचें प्रतिपादन केलें. प्रपत्तीचा हा राजमार्ग त्यांनीं मानवमात्राला खुला केला. ते जातपात, वर्णभेद कांहींच ओळखत नाहींत. कारण 'उंच निंच कांहीं नेणे भगवंत!'

आळवार म्हणजे भगवंताचा साक्षात्कार झालेले ज्ञानी संत. हे एकूण बारा आहेत. त्यांचे कालक्रमानुसार तीन गट पडतात. त्यांचीं नांवें पुढील-प्रमाणें आहेत–

पोयगै आळवार, भूतत्ताळवार, पेयाळवार, तिरूमळिशै आळवार, नम्माळवार, मधुर कवि आळवार, कुलशेखर आळवार, पेरिय आळवार, तिरुपानआळवार, तिरुमंगै आळवार, तोंडरडिपोडी आळवार आणि आंडाळ.

या आळवारांच्या जन्माबद्दल आख्यायिका सांगतात ती अशी—

पृथ्वीवर पापें माजलीं, अनाचार वाढले आणि लोक सन्मार्गापासून भ्रष्ट झाले, तेव्हां श्रीविष्णूनें पापी आणि अज्ञानी जीवांना सन्मार्ग

दाखविण्यासाठीं आपल्या आयुधांना आणि वाहनांना मानवरूप घेऊन भूतलावर जाण्याचा आदेश दिला. त्या आदेशानुसार भिन्न स्थळीं आणि भिन्न काळीं हीं आयुधें मानवरूपानें अवतरलीं. त्यांनाच पुढें लोक आळवार म्हणूं लागले. बहुतेक आळवारांच्या चरित्रांत ते बालरूपांत कोणाला ना कोणाला तरी सांपडल्याचे उल्लेख आहेत. यावरून असा तर्क निघतो, कीं हीं पुष्कळशीं आळवार मुलें मुळांत परित्यक्त असावीं. त्यांनीं आपल्या निराधार जीवनांत देवाचा आसरा शोधला असावा आणि आपल्या शरणभक्तीनें तसेंच कवित्व-शक्तीनें लोकांत प्रेमादराचें स्थान मिळवलें असावें. हे आळवार ब्राह्मणांत तसेच अनेक हीन यातींतहि जन्मले आहेत. जातीपातीचे निर्बंध झुगारून देण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे. भगवंताच्या चरणाजवळ सगळ्यांना हक्काचें स्थान आहे, असें जें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादिलें, त्याचें कारण हेंच असलें पाहिजे.

आळवारांचा पहिला गट पोयगै आळवार, भूत्तत्तार आळवार आणि पेयाळवार या तिघांचा आहे. हे तिघेहि संसारांतून मुक्त झालेले आणि केवळ भगवंताच्या सेवेकरितां उरलेले महाभाग होत. ते स्वतंत्रपणें हिंडत होते आणि देशपर्यटन करून लोकांना 'भक्तिमार्ग बहु सोपा' असें सांगत होते. एका रात्रीं तिरुकोवलूर येथें योगायोगानें या तिघांची गांठ पडली. प्रसंग घडला तो असा—

एका अंधाऱ्या रात्रीं मुसळधार पाऊस सुरू झाला. त्यांतच वादळानेंहि थैमान घातलें. पोयगै आळवार हा त्या वादळांत सांपडला आणि आश्रयासाठीं एका ब्राह्मणाच्या घरीं आला. यजमानानें पडवींतल्या एका लहानशा खोलींत त्याला जागा दिली. तो जरा तिथें लवंडतो, एवढ्यांत भूतत्तार आळ-वाराची स्वारी तिथें हजर झाली. त्यानेंहि त्याच खोलीचें दार ठोठावलें. पोयगै म्हणाला, 'बाबारे ! दुसऱ्या माणसाला जागा नाहीं. मीच इथें कसा बसा आडवा झालों आहें.' त्यावर भूतत्तार बोलला. 'जिथें एकटा झोपतो, तिथें दोघे बसूं शकतील.' त्यावर हा कुणीतरी ज्ञानी पुरुष आहे, असें समजून पोयगैनें त्याला दार उघडलें. ते दोघे खोलींत बसून राहिले. बाहेर — पाऊस पडतच होता. वादळ घोंघावतच होतें. केव्हां पाऊस थांबेल अन् रात्र कशी जाईल, याविषयीं ते बोलत असतां पुन्हां दार ठकठकलें. दोघे आंतूनच म्हणाले, 'तूं आणखी कशाला येतोस आंत ? आम्ही दोघे इथे

कष्टानें बसलों आहों.' बाहेरचा तो पेयाळवार त्यांना म्हणाला, 'जिथे दोघे बसतात, तिथे तिघे उभे राहूं शकतील.' तें ऐकून आंतल्या दोघांनीं त्यालाहि दार उघडलें. तिघे एकत्र झाले. तिथेंच त्यांचा परस्पर परिचय झाला. त्या परिचयांत आपण तिघेहि समानशील असल्याचें त्यांना कळलें. एवढ्यांत आणखी चौथा कोणीतरी खोलींत येतो आहे, असा त्यांना भास झाला. 'आतां आली पंचाईत' असें ते म्हणत असतांच ती खोली दिव्य प्रकाशानें उजळून निघाली. हा चौथा म्हणजे साक्षात् श्रीविष्णु होता. तो भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं तिथें आला होता. त्याच्या दर्शनानें ते तिघेहि कृतार्थ झाले आणि त्यांनीं भगवंताचे गुणानुवाद करणारीं प्रत्येकीं शंभर पद्यें रचून गायिलीं. अशा प्रकारें त्या अंधाऱ्या वादळी रात्रीं आळवारांच्या भक्तिरस-परिप्लुत साहित्याची गंगा तिरुकोवलूर गांवांतल्या त्या लहानशा खोलींत उगम पावली.

## नम्माळवार

नम्माळवार हा आळवारांच्या दुसऱ्या गटांत मोडतो. महाराष्ट्राच्या संतमंडळांत जसा ज्ञानेश्वर, तसाच आळवारांत नम्माळवार ! सर्वपूज्य अन् सर्वश्रेष्ठ ! याचा जन्म ताम्रपर्णी नदीच्या कांठीं तिरुनगरी नांवाच्या गांवांत झाला. हा जातीनें वेळ्ळाळर म्हणजे शूद्र किसान होता. त्याचें पहिलें नांव मारन्. याची कथा सांगतात ती अशी—

नम्माळवारानें जन्मल्यापासून दहा दिवस डोळेच उघडले नाहींत. कोणी म्हणतात, कीं त्याच्या आईबापानीं त्याला एका मंदिराजवळच्या चिंचेखालीं नेऊन ठेवलें, तर कोणी म्हणतात तोच रांगत रांगत तिथें गेला. त्या आंबट झाडाखालीं त्याची गोड समाधि लागली आणि त्याला दिव्य दर्शन झालें. पुढें तो त्या झाडाखालींच राहूं लागला. तो सदैव उन्मनी वृत्तींत असे. कधीं हसे, तर कधीं रडे. कधीं मूर्च्छित पडे, तर कधीं वेड्यासारखें बरळे. लोक त्याला वेडाच समजत. पण या वेड्यानें जें स्तोत्रकाव्य रचलें तें मात्र शहाण्या माणसांना गुंग करील असें आहे. त्याच्या कवित्वाची दिव्य प्रभा थोड्याच कालांत सर्वत्र पसरली. एक ब्राह्मण पंडित मधुर कवि त्याच्या प्रतिभेनें असा भारून गेला, कीं त्यानें नम्माळवाराचें शिष्यत्वच पत्करलें.

नम्माळवाराच्या पद्यांचे संग्रह तमिळजनतेनें चार वेदांइतके पूज्य आणि शिरोधार्य मानले. या संतश्रेष्ठानें एक महान् सिद्धांत जनतेला सांगून ठेवला आहे—“ जें आहे आणि जें नाहीं त्या सर्वांत श्रीहरीचा निवास आहे. मानवानें ‘अहम्’ला विसरून त्या दिव्य तत्त्वाचा साक्षात्कार घ्यावा.” नम्माळवारानें आपल्या वाङ्मयांत चारी वेदांचा मथितार्थच जणूं सांगून ठेवला आहे. ‘वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा’ असें निःसंदिग्धपणें घोषित करणाऱ्या तुकोबांच्याच जातीचा हा नम्माळवार ठरतो.

## तिरुमंगै आळवार

नम्माळवारापेक्षांहि ज्याची पदसंख्या मोठी आहे असा दुसरा तिरुमंगै-आळवार. हे दोघेहि समकालीन म्हणजे नवव्या शतकाच्या पूर्वार्धांतले आहेत. तिरुमंगैला शेवटचा आळवार मानतात. हा जातीनें कल्लार होता. तंजाऊर जिल्ह्यांतल्या कुरुगुर गांवीं त्याचा जन्म झाला. त्याचा बाप चोळ राजाचा सेनापति होता आणि त्याची एक लहानशी जहागीरहि होती. तिरुमंगै मोठा झाल्यावर त्यानेंहि बापाचाच व्यवसाय पत्करला. कांहीं काळ गेल्यानंतर त्याच्या जीवनांत एक मोठीच क्रांतिकारक घटना घडली.

एके दिवशीं एका वैष्णवाची एक रूपमती कन्या त्याच्या दृष्टीस पडली. तिरुमंगै तिच्यावर भाळला. काय वाटेल तें करीन, पण हिला आपली पत्नी बनवीन, असा त्यानें निर्धार केला. त्या मुलीचें नांव कुमुदवल्ली असें होतें. त्यानें तिच्या बापाजवळ जाऊन तिला मागणी घातली. बापानें त्याला अट घातली, कीं ‘तूं जर वैष्णव झालास, तर मी माझी मुलगी तुला देईन.’ तिरुमंगै त्या गोष्टीला तयार झाला. कुंभकोणमूला जाऊन त्यानें विधियुक्त वैष्णव धर्माची दीक्षा घेतली आणि तो परत आला. आतां बाप तयार झाला; पण ती मुलगीच बिथरली. तिची अट अशी होती, कीं ‘तिरुमंगैनें एक वर्षपर्यंत रोज एक हजार आठ वैष्णव ब्राह्मणांना भोजन घालावें आणि मग लग्नाची गोष्ट काढावी.’

तिरुमंगैनें तीहि अट मानली. पण ती पुरी करण्यासाठीं लागणारें द्रव्यबळ मात्र त्याच्यापाशीं नव्हतें. कल्लार जमात ही मुळापासूनच वाटमारीसाठीं प्रसिद्ध. तिरुमंगै हा त्याच जमातींत जन्मलेला. तेव्हां त्यानें आपल्या वाड-

वडिलांचा धंदा करूनच द्रव्य मिळवायचें ठरवलें. आदल्या रात्रीं वाटमारी करायची आणि दुसऱ्या दिवशीं ब्राह्मण भोजन घालायचें, अशा प्रकारें त्यानें त्या मुलीची अट पुरी केली. मग तिच्याशीं त्याचें लग्न झालें. पण कारणा-पुरता सुरू केलेला वाटमारीचा धंदा मनोवांच्छित पुरें झाल्यावरहि त्याला सोडावासा वाटेना. श्रीमंतांना लुटायचें आणि ती लूट गोरगरिबांना वैरून टाकायची, हा खाक्या त्यानें पुढें कितीतरी दिवस चालूच ठेवला.

पण कालांतरानें वाल्या कोळ्यासारखेंच त्याच्याहि बाबतींत घडलें. वाल्या कोळ्याला नारद भेटला, तर तिरुमंगैला साक्षात् श्रीविष्णु भेटून त्यानें त्याला त्या निंद्य कर्मांपासून परावृत्त केलें. तिरुमंगैला त्यामुळें धनाचीच नव्हे; तर संसाराचीहि उपरति झाली. तो घरदार सोडून तीर्थयात्रेसाठीं बाहेर पडला. वाटेंत एका ठिकाणीं त्याला एका गुरूनें मंत्रोपदेश दिला. तो मंत्र जपतां-क्षणींच त्याची प्रतिभा जागृत झाली. तो घडाघडा पद्यरचना करूं लागला. आपण रचलेलीं कवनें खड्या आवाजांत गात गात तो तिकडचीं सारीं वैष्णव क्षेत्रें हिंडला. पुढें वृद्धापकाळीं श्रीरंगम् येथें येऊन तिथेंच त्यानें आपलें उर्वरित आयुष्य घालविलें; श्रीरंगम्च्या मंदिराचा तिसरा प्राकार यानेंच बांधिलेला आहे. त्याच्या नांवावर सहा पद्य ग्रंथ आहेत. नम्माळवारांच्या पद्यांना वेद म्हणतात, तर तिरुमंगैच्या पद्यांना 'वेदांगें' म्हणून गौरवतात.

### तिरुमळिसै आळवार

याच्याच जोडीनें आणखी एका आळवाराचें चरित्र सांगितलेंच पाहिजे. त्याचें नांव 'तिरुमळिसै आळवार' हा भार्गव नांवाच्या ऋषीचा मुलगा. भार्गव ऋषि तोंडैनाडु प्रदेशांत राहत असे. बरेच दिवस मूल होईना, म्हणून त्यानें एक महायज्ञ केला. यज्ञभोक्ता नारायण त्याला प्रसन्न होऊन थोड्याच कालांत त्याच्या पत्नीला गर्भ राहिला. योग्य काळीं तिनें एका पुत्ररत्नाला जन्म दिला. हें पुत्ररत्नच पुढें तिरुमळिसै आळवार या नांवानें प्रसिद्ध झालें. नवससायासांनीं मुलगा झालेला; पण मुलाचें कौतुक करणें अन् लालनपालण करून त्याला वाढवणें हें भाग्य मात्र आईबापांच्या नशिबीं नव्हतें.

थोड्याच कालांत तिथें कसला तरी उत्पात घडला. लोकांना त्या प्रदेशां-तून परागंदा व्हावें लागलें. सगळीकडे भाऊगर्दी उसळली. काय झालें कोण

जाणें; पण त्यांत हें मूल आई-बापांना चुकलें. एका वेताच्या बेटांत तें पडलें होतें आणि तिथेंच आक्रंदत होतें. तिरुवालन् नांवाच्या एका इसमाला तें दिसलें आणि त्यानें त्याला उचलून आपल्या घरीं आणलें. हा माणूस वेताच्या टोपल्या विणून उपजीविका करणारा होता. तो योगायोग म्हणजे त्याला दैवी चमत्कार वाटला. त्याच्याहि घरीं पुत्रसंतान नव्हतें. नवरा-बायको दोघेंहि पुत्रसुखासाठीं आसुसलीं होतीं. तिरुवालन्नें जेव्हां तें मूल नेऊन आपल्या बायकोच्या स्वाधीन केलें, तेव्हां ती आनंदाच्या बहरानें चैत्र मोगरीसारखी फुलून गेली. आपलाच पुत्र मानून त्या दोघांनीं त्याचा प्रतिपाळ केला आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं हें मूल घरीं येतांच तिरुवालन्च्या बायकोचीहि कूस उजवली. एका वर्षाच्या आंत ती एका औरस पुत्राची माता झाली. या मुलाचें नांव त्या दंपतीनें कणिकण्णन् असें ठेवलें. तिरुमाळिसै आणि कणिकण्णन् या दोघांनीं त्या घरांत आई-बापांचा आनंद द्विगुणित केला.

तिरुमळिसैला लहानपणींच दिव्य प्रतिभा प्राप्त झाली. पाठशाळेंत त्याचा क्रमांक पहिला असे. हळूहळू त्याला ईश्वरभक्ति जडली. तो ऐहिक विषयांपासून दूर जाऊं लागला. त्याला ईश्वरदर्शनाची फार तळमळ लागली. त्यानें स्वतःच्या हृदयांत भगवंताचें ध्यान-चिंतन करीत असतांनाच भिन्न भिन्न संप्रदायांच्या तत्त्वज्ञानाचेंहि गंभीर अध्ययन केलें. शेवटीं जें समाधान तो वांछीत होता, तें त्याला शैव संप्रदायांत मिळालें.

तिरुमळिसै शैव बनला आणि शिवक्षेत्रांची यात्रा करूं लागला. प्रवासांत एकदा तिरुमयिलै या गांवीं पोंचला असतां त्याच वेळीं तिथें पेयाळवार हा योगायोगानें त्याला भेटला. तिरुमळिसैच्या भक्तीची आणि कवित्वाची कीर्ति पेयाळवारच्या कानीं पूर्वींच आली होती. पेयाळवाराला वाटलें, कीं या तरुणाला वैष्णवमार्गांत आणावें. म्हणून त्यानें तिरुमाळिसैला जवळ बसवून त्याच्याशीं धर्मचर्चा सुरू केली. पेयाळवार महान् सात्त्विक होता. त्याच्या सत्त्वगुणाचा प्रकाश तिरुमळिसैच्या हृदयांत पोंचायला वेळ लागला नाहीं. पेयाळवारनें त्याचे अनेक भ्रम दूर केले आणि त्याला वैष्णव मार्गावर आणलें. शेवटीं तिरुमळिसै त्याचा शिष्य बनला. गुरुकडून मंत्र मिळतांच त्यानें तपस्येला प्रारंभ केला. आतां श्रीहरिदर्शन झाल्याशिवाय तो आपलें

आसन सोडणार नव्हता. त्याचा हा निकराचा भक्तिभाव पाहून विष्णूनें त्याला दर्शन दिलें, इतकेंच नव्हे; तर 'भक्तिसार' असें त्याचें नवें नांवहि ठेवलें.

त्या दिवसापासून भक्तिसाराची कीर्ति चांफा फुलावा तशी सर्वत्र पसरली. त्या काळचे नाणावलेले आळवारसुद्धा त्याच्या दर्शनाला येऊं लागले.

कांहीं कालानें तो तिरुकाचिपदि या विष्णुक्षेत्रांत पोंचला. तें स्थान त्याच्या मनाला मानवलें आणि तिथेंच तो भगवंताची आराधना करीत राहिला. इतके दिवस कणिकण्णन्‌ला त्याचा वियोग झाला होता. भक्तिसार तिरुक-च्चिपदिला येऊन राहिला आहे, हें कळतांच तोहि तिथेच येऊन राहिला. आपलें टोपल्या विणायचें काम त्यानें तिथेंच सुरू केलें. तो भक्तिसाराचा शिष्य बनून, त्याची सेवाशुश्रूषा करूं लागला.

रोज कांही घरें भिक्षा मागायची, तें अन्न आणून गुरूला अर्पण करा-यचें, गुरूकडून त्यांतला थोडा प्रसाद मिळवायचा आणि आपल्या कामाला लागायचें, असा कणिकण्णन्‌नें नित्यनेम ठेवला. तोहि स्वतः कवि होता. भक्तिगीतें गात गात तो भिक्षा मागे. असाच एक दिवस तो भिक्षेसाठीं म्हणून राजवाड्याच्या दारांत पोंचला. त्याचें गाणें ऐकून राजानें त्याला जवळ हाक मारली आणि म्हटलें—

" राजा हा ईश्वराचा अंश असतो, हें तुला ठाऊक आहे ना ! "

" होय महाराज ! "

" मग माझ्यावर एखादं गाणं रचून म्हण. "

कणिकण्णन्‌ला राजाची ती आत्मप्रौढी आवडली नाहीं. त्याच्या जिभेला आजवर मानवाच्या स्तुतीचा विटाळ झाला नव्हता. त्यामुळें त्याला वाटलें, कीं या राजाची खोड मोडावी. त्यानें तावडतोब एक पद रचून म्हटलें. अर्थात् तें पद म्हणजे विष्णूचें निर्मळ स्तोत्र होतें. राजा तें ऐकून म्हणाला.

" मी तुला माझी प्रशंसा गायला सांगितली होती, विष्णूची नव्हे ! "

त्यावर कणिकण्णन् नम्रतापूर्वक बोलला.

“ महाराज, राजा हा विष्णूचा अंश आहे, हें तुम्हीं आत्तांच तर सांगितलंत. तेव्हां भगवंतांची प्रशंसा हें आपण आपलंच स्तुतिस्तोत्र समजावं.”

कणिकण्णन्‌नें अशा प्रकारें त्याचीं बोटें त्याच्याच डोळ्यांत घातलेलीं पाहून राजाच्या तिळीं थेंब पडला. तो संतापून बोलला.

“ बरं बरं ! गमजा नकोत तुझ्या ! तूं आणि तुझा गुरु बरेच मस्तवाल झालां आहां. याद राखा. तुम्ही माझ्या राज्यांत रहातां ! माझ्या आज्ञेचा उपमर्द केलात, तर तुम्हाला राज्यांतून हाकून देईन ! ”

कणिकण्णन्‌नें राजाचें हें उन्मत्त भाषण शांतपणें ऐकून घेतलें आणि तो आपल्या मठींत आला. त्यानें भक्तिसाराला हा सारा वृत्तांत निवेदिला. तो म्हणाला.

“ गुरुजी, आतां माझ्यामुळें तुम्हांला त्रास होणार. तेव्हां मी तुमच्या-पासून दूर होतों. या राज्यांतून बाहेर जातों. ”

त्यावर भक्तिसार बोलला.

“ माझ्या बंधो, जो तुझा अपमान तो माझा अपमान ! आपण दोघेहि या राज्यांतून निघून जाऊं. तुझ्या माझ्या सारख्याला इथें राहणं नाहीं परवडायचं. ”

हें बोलतांना भक्तिसाराचा कंठ दाटून आला. तसाच उठून तो मंदिरांत गेला. दाटल्या गळ्यानें त्यानें श्रीविष्णूला प्रार्थिलें.

“ हे भगवन्, माझा कणिकण्णन् इथून निघाला. मी पण चाललों. देवा, आतां तूं तरी इथं राहून काय करशील ? तुझी ही शेषशय्या ठेव गुंडाळून आणि चल आमच्याबरोबर. ”

आपल्या भक्ताची ही विनवणी देवानें मान्य केली. लक्ष्मीदेवीहि तिथून बाहेर पडायला तयार झाली. दोघे भक्त पुढें आणि लक्ष्मी–नारायण मागें, असें तें महाप्रस्थान नगराकडे पाठ करून परदेशीं निघालें. राज्याची सीमा ओलांडून ते आणखी पुढें गेले अन् रात्र पडली, तेव्हां एका गांवीं मुक्कामाला राहिले.

पण त्या घटनेनें राज्यांत अनर्थ ओढवला. लोकांनीं घरोघर दिवे लावले, तरी त्यांचा प्रकाशच पडेना. सगळीकडे अंधकाराचें साम्राज्य! हें अद्‌भुत, अघटित पाहून लोक राजवाड्याकडे धावले. राजवाड्यांतहि तीच अवस्था होती. सगळें राजकुल अंधारांत चांचपडत होतें. राजा अंधारांत त्याचबरोबर आश्चर्यांतहि पडला होता. एवढ्यांत मंदिरांतले पुजारीहि हाकाटी करीत आले.

" महाराज! घात झाला! देवळांत मूर्ति नाहीं. मंदिर ओस पडलं आहे. राज्यावर कांहीं तरी संकट ओढवणार खास...."

आणि मग राजाला दुपारचा तो प्रसंग आठवला. आपण एका गरीब विष्णुभक्ताचा अपमान केल्याचें त्याला स्मरलें. त्यानें आपल्या प्रधानांना ती हकीकत सांगून विचारलें. " आतां काय करायचं?" प्रधान म्हणाले, " जिथून दुःखाचा उगम झाला, तिथेंच त्याचा उपायहि सांपडेल."

राजाला त्याचा अर्थ कळला. तो आपल्या परिवारासह कणिकण्णन् आणि भक्तिसार यांचा शोध करीत निघाला. वाट विचारीत विचारीत, गुरु-शिष्य मुक्कामाला थांबले होते, तिथे आला. त्यानें कणिकण्णन्‌चे पाय धरून त्याची क्षमा मागितली. कणिकण्णन् दयेनें द्रवला. त्यानें आपल्या गुरूला म्हटलें.

" गुरुजी, या राजाला एकवार क्षमा करा."

भक्तिसार म्हणजेच तिरुमाळिसै आळवार. त्यानें आपल्या शिष्याची विनंती मान्य करून देवाला जागें केलें. तो पुनश्च पूर्वींच्याच कळवळ्यानें देवाला म्हणाला.

" भगवन्! कणिकण्णन् पुन्हा तिरुकांचिपदिला जायचं म्हणतो. त्याचं मन मोडवत नसल्यानें मीहि त्याच्याबरोबर जायचं ठरवलं आहे. तेव्हां तूं पण आमच्या बरोबर माघारा फिर आणि पुन्हा आपल्या मंदिरांत जाऊन प्रतिष्ठित हो!"

भक्तिसार आणि कणिकण्णन् पुढे, लक्ष्मीनारायण त्यांच्या मागें आणि राजा त्या सर्वांच्या मागें, अशी ती मिरवणूक पुन्हा नगराच्या दिशेनें वाट चालूं लागली. मंदिरांत जाऊन देव पुन्हा आपल्या शेषशय्येवर पहुडला. राज्याची गेलेली शोभाहि परत आली. अंधार नष्ट झाला. लोकांत चैतन्य निर्माण झालें. नगरजनांनीं राज्यावरचें संकट टळल्याचा महोत्सव साजरा केला.

त्यानंतर जीवनाचा बराच काल तिरुमळिसैनें त्या राज्यांत घालविला. त्यानें तिथें राहून विष्णुभक्तीचीं शेंकडों पद्यें रचलीं. कालाच्या प्रवाहांत त्याची बरीचशी कविता वाहून गेली असली, तरी दोनशें पद्यें शिल्लक राहिलीं आहेत.

### आण्डाळ

याच नवव्या शतकाच्या उत्तरार्धांत तमिळनाडमध्यें एक कन्यारत्न जन्माला आलें आणि त्यानें आळवारांच्या मालिकेंत स्वतःला मानाचें स्थान मिळवलें. त्या मुलीचें नांव 'आंडाळ' असें आहे. आळवारांच्या गुच्छांतलें हें एक टवटवीत सुगंधी फूल आहे. पेरिय आळवार या विष्णु-मंदिरांतल्या एका पुजाऱ्याला ही मुलगी देवाच्या पुष्पवाटिकेंत सांपडली. त्यानें तिला घरीं आणलें आणि 'कोदै' असें तिचें नांव ठेवलें. तिची काया दिशींमाशीं वाढूं लागली, तशीच तिच्या अंतरांत भक्तिहि वाढूं लागली. ती सदैव भगवत्प्रेमांत मस्त राहूं लागली.

पेरिय आळवाराचें दुसरें नांव विष्णुचित्त असें होतें. बागेंतून फुलें आणून देवासाठीं हार बनविण्याची कामगिरी त्यानें या मुलीवर सोंपविली. कोदै तें काम नित्य नेमानें करी; पण तिचा स्वतःचा निराळाच नेम होता. ती सुगंधी फुलांचा घवघवीत हार बनवी अन् देवाच्या आधीं आपल्याच गळ्यांत घालून देवापुढें उभी राही. कोदै स्वतःला श्रीरंगाची भार्या समजे आणि पतीसाठीं बनवलेला हार त्याच्या आधी स्वतःच्या गळ्यांत रुळविण्याचा आपल्याला अधिकारच आहे, असें मानी. असें कितीतरी दिवस चाललें होतें.

पण एक दिवस तिचें हें कृत्य बापाच्या निदर्शनास आलें. त्यानें त्याबद्दल तिची खूप निर्भर्त्सना केली. त्या तीक्ष्ण शब्दांनीं तिचें हृदय दुखावलें. ती खट्टू होऊन बसली. त्या रात्रीं श्रीरंग विष्णुचित्ताच्या स्वप्नांत येऊन त्याला म्हणाला. 'तूं कोदैला उगाच रागें भरलास. तिनें आधीं गळ्यांत घातलेला हारच मला अधिक गोड वाटतो. यापुढेंहि असेंच चालू राहूं दे. तुझी कोदै 'आंडाळ' आहे............'

आंडाळ म्हणजे भगवंताची आवडती. तिचें थोरपण त्या स्वप्नानें विष्णुचित्ताला कळलें. पुढें तिला आणखी एक नांव मिळालें. तें म्हणजे

'श्रीरंगनायकी.' विष्णुचित्ताच्या घरीं भावभक्तीच्या वातावरणांत वाढल्यामुळें तिच्या हृदयांत श्रीरंगाचें सर्वांगसुंदर रूप ठसावलें गेलें. श्रीरंगाच्या मनोहर लीला जणूं आपल्या डोळ्यांसमोर घडत आहेत, असें तिला भासूं लागलें. तिच्या कल्पनाशील मनाला तोच छंद लागला. हळूहळू तिच्या त्या मधुर कल्पना काव्यरूप घेऊन बाहेर पडूं लागल्या.

थोडी मोठी झाल्यावर बापानें तिच्या लग्नाचा विचार सुरू केला. तेव्हां एके दिवशीं तिनें बापाला स्वच्छ सांगितलें.

'श्रीरंग हा माझा पति. मी त्याची आवडती पट्टराणी. आमचं लग्न होऊन चुकलं आहे.' ती आपल्या जीवींच्या मैत्रिणीला आपला हा अनुभव सांगतांना म्हणाली—

**"मद्दळम् कोट्ट वरि शङ्कम् निन्रु ऊद
मुत्तु उडैत्तामम् निरै तालन्दु पन्दाल् कीळ्
मैत्तुनन् नम्बि मदुशूदन वन्दु अन्नैक्
कैत्तलम् पर्क् कनाक्कण्डेन् तोळी नान्"**

'सखे! मला असा साक्षात्कार घडला कीं, एक मोठा मंडप आहे. त्याला शुभ्र रेशमाच्या कमानी आहेत. शुभ्र पुष्पांनीं तो सुशोभित केलेला आहे. आणि अशा त्या मंडपांत माझा मधुसूदन, माझा प्रियकर माझं पाणि-ग्रहण करतो आहे.' आंडाळला 'दख्खनची मीरा' म्हणतात, ती याच कारणासाठीं. पुढें कांहीं काळानें ती श्रीरंगम् या क्षेत्रांत गेली आणि तिथेंच श्रीरंगस्वरूपीं विलीन झाली.

आंडाळनें अनेक पदें रचलीं आहेत आणि त्यांत तिच्या आणि श्रीरंगाच्या मधला मधुर मीलनभाव विविध प्रकारांनीं पुष्पित केला आहे. तिरुप्पावै या नांवानें तिच्या पदांचा संग्रह झालेला आहे. आजहि तामिळनाडमधल्या मुली इष्ट वर मिळावा म्हणून 'पावै' नांवाचें व्रत आचरतात आणि त्या प्रसंगीं आंडाळचीं पदें गातात.

आळवार संत अनेक विष्णुक्षेत्रांच्या यात्रा करीत. जिथें जातील, तिथें सामान्य जनांना भक्तिपंथाला लावीत. त्यांनीं अनेक ठिकाणीं विष्णुमंदिरें

११८२७

उभारलीं. श्रीरंगम् आणि तिरुपति हीं मंदिरें आळवारांनींच स्थापित केलीं आहेत. नाथमुनि नांवाचा एक वैष्णव आचार्य दहाव्या शतकांत तमिळनाड-मध्यें होऊन गेला. त्यानें आळवार संतांचें समग्र वाङ्मय एकत्र केलें आणि त्या संग्रहाला ' नालायिर दिव्यप्रबंधम् ' असें नांव दिलें. वैष्णव मंदिरांतून आळवारांच्या पदांनीं देवाला उपचार समर्पिण्याची पद्धत नाथमुनींनेंच चालू केली.

## रामानुजाचार्य

याच नाथमुनींचे पणतू म्हणजे रामानुजाचार्य. हे तमिळनाडमधल्या आचार्य परंपरेचे मुख्य आणि सर्वमान्य गुरु होत. यांनीं उपनिषदांतला वैष्णव धर्म आणि आळवारांचा भक्तिमार्ग यांचा समन्वय करून आपल्या ' विशिष्टाद्वैत ' मताची स्थापना केली. रामानुजांना ब्राह्मण धर्माबद्दल आदर होता, तशीच आळवारांची शरणागतिहि त्यांच्या मनांत ठसली होती. या दोहोंतलेंहि सार ग्रहण करून त्यांच्या एकीकरणानें त्यांनीं आपल्या नव्या संप्रदायाचें प्रवर्तन केलें. कर्म, ज्ञान आणि भक्ति हीं भगवद्गीतेंतलीं तीन मुख्य तत्त्वें होत. रामानुजांनीं या तिहींत भक्तीलाच खुल्या मनानें प्राधान्य दिलें.



रामानुजाचार्य

मद्रासपासून चौदा कोसांवर वसलेल्या पेरुंबुदुर या गांवीं त्यांचा जन्म झाला. केशवभट्ट सोमायजी हे त्यांचे वडील आणि कांतिमति ही माता. केशवभट्टाला बराच काल संतान नव्हतें. आपली

निपुत्रिकता नाहींशी व्हावी म्हणून त्यानें पार्थसारथीच्या मंदिरापुढें एक पुत्रकामिक यज्ञ केला. या यज्ञानें प्रसन्न झालेल्या नारायणानें केशवभट्टाला स्वप्नांत वरदान उच्चारलें, कीं 'मी स्वतः तुझ्या घरीं पुत्ररूपानें जन्म घेईन.'

शके ९३९ चैत्र शु. ५ मी या दिवशीं केशवभट्टाच्या घरीं नवजात पुत्राचा रुदनस्वर ऐकूं आला. आईबापांनीं त्याचें नांव रामानुज ठेवलें. त्याचें बाळपण संपतें तोंच केशवभट्टानें त्याचें उपनयन केलें. त्यानंतर तो तिथल्या पाठशाळेंत अध्ययन करूं लागला. तीक्ष्ण बुद्धिमत्तेबरोबरच धर्मश्रद्धाहि घेऊन तो जन्माला आला होता. विद्वानांचा सहवास आणि साधुसमागम या दोन्ही गोष्टी त्याला प्रिय होत्या. मानवमात्राच्या ठिकाणीं भगवंताचा निवास आहे आणि जातीपातींची उच्चनीचता निरर्थक आहे, हें त्याला लहानपणांतच उमगलें होतें.

सोळाव्या वर्षीं रामानुजाचें लग्न झालें. तंजामाम्बा नांवाची एक रूपमती कन्या भार्या म्हणून त्याच्या घरांत आली. लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं त्याच्या पित्यानें परलोकचा रस्ता सुधारला. रामानुजाला मग आपल्या जन्मग्रामीं सुख लागेना. तो आपल्या मातेला अन् पत्नीला घेऊन कांचीपुरीला आला. अजून त्याचें अध्ययन संपलें नव्हतें. तें पूर्ण करण्यासाठीं तो कांचीच्या पाठशाळेंत दाखल झाला. यादवप्रकाश नांवाचा एक मोठा वेदांती त्या पाठशाळेचा मुख्य आचार्य होता. रामानुजानें त्याच्याजवळ अध्ययन सुरू केलें. कांहीं दिवस ठीक गेले; पण पुढें गुरूनें सांगितलेल्या व्याख्या रामानुजाला पटेनात. गुरूचें मत खोडून शिष्य त्याजागीं आपलें विरुद्ध मत प्रस्थापित करूं लागला. असे प्रसंग वारंवार येऊं लागले. रामानुजाच्या बुद्धीची तीक्ष्ण धार गुरूला सहन झाली नाहीं. त्याला वाटलें, कीं शिष्य प्रकाशांत येईल आणि आपल्या विद्वत्तेचें तेज फिकें पडेल.

खरें म्हणजे, यादवप्रकाशानें शिष्यबुद्धीचें कौतुक करायचें. 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या भारतीय गुरुभावनेला जागायचें. पण तें सोडून त्यानें रामानुजाचा कांटाच काढून टाकायचें ठरवलें. कुठें तरी दूर देशीं नेऊन रामानुजाचा घात करावा, या उद्देशानें त्यानें काशीयात्रेचा बहाणा केला. रामानुजाला आवर्जून आपल्या बरोबर घेतलें. इतरहि शिष्य मंडळी

त्यांच्या समागमें निघाली. या यात्रामंडळींत गोविंद नांवाचा रामानुजाचा चुलत भाऊहि होता. यादवप्रकाशानें त्याच्याच करवीं रामानुजाचें काम तमाम करायचें ठरवलें. पण रामानुजाचें सुदैव हें, कीं मृत्यु पुढें उभा राहण्यापूर्वींच त्याला या कटाचा सुगावा लागला. तो एका रात्री गुपचुपपणें त्या यात्रामंडळींतून पसार झाला. सरळ दक्षिणापथाच्याच मार्गाला लागला. पण वाटेंत भेटलें एक घनदाट अरण्य. पुढें मार्ग दिसेना अन् रानांत राहण्याचाहि धीर होईना. अशा अवस्थेंत तो झाडाखालीं गळाठून बसला असतां समोरून एक शिकारी जोडपें तिथें आलें. कोणीतरी एक तरुण पांथस्थ वाट चुकला आहे, हें त्या व्याधाला कळलें. त्यानें त्याची चौकशी केली. नांव गांव विचारून घेतलें. मग व्याध त्याला म्हणाला.

" आम्ही सेतुबंध रामेश्वरीं निघालों आहों. कांचीनगरीहूनच पुढें जाणार आहों. तेव्हां तूं आमच्याबरोबर चल. "

रामानुजाला त्या व्याधाच्या रूपानें परमेश्वरच भेटल्यासारखें झालें. आणि खरोखरच तो साक्षात् श्रीहरिच होता. त्याची स्त्री ही साक्षात् लक्ष्मी होती. रामानुजाला कांची नगरीच्या सीमेंत पोंचवून तें दांपत्य जेव्हां एकाएकीं अदृश्य झालें, तेव्हां त्याला खऱ्या खऱ्या प्रकाराचा बोध झाला. रामानुज एकटाच घरीं आलेला पाहून त्याच्या पत्नीला आणि मातेला आश्चर्य वाटलें. रामानुजानें आपल्या गुरूचें छलकपट त्या दोघींना सांगितलें. मात्र एक अट घातली ती ही, कीं ' झाली गोष्ट षट्कर्णी करायची नाहीं. ' सारा वृत्तांत ऐकून रामानुजाचा जणूं पुनर्जन्मच झाला, असेंच त्या दोघींनाहि वाटलें.

यामुनाचार्य नांवाचे एक वैष्णव आचार्य ' श्रीरंगम् ' येथें रहात होते. त्यांना लोक ' आळवन्दार ' म्हणजे विजयी म्हणून गौरवीत. ते श्रीसंप्रदायाचे प्रवर्तक होते. आळवारांच्या ' प्रबन्धम् ' या काव्यसंग्रहावर त्यांचा मोठा अधिकार होता. रामानुजांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें. थोड्याच काळांत यामुनाचार्यांना ते प्रिय झाले. त्यांच्या शिष्यमंडळींत अग्रगण्य होऊन रामानुज हे रामानुजाचार्य झाले.

कालांतरानें यामुनाचार्यांचा मृत्युकाळ समीप आला आणि तो त्यांना कळला. त्यांनीं रामानुजांना बोलावणें धाडलें. ते घाईगर्दीनें निघाले खरे;

पण श्रीरंगमूला गेल्यावर त्यांना दिसला तो गुरूचा निष्प्राण देह ! त्यांनीं पाहिलें, तर गुरूच्या उजव्या हाताचीं तीन बोटें मुडपलेलीं आहेत. कारण काय असावें, अशी पृच्छा करतांच एका शिष्यानें सांगितलें, कीं ‘ जीवनांत गुरुजींच्या तीन इच्छा अपूर्ण राहिल्या आहेत. एक ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिणें, दुसरी दिल्लीपतीच्या राजवाड्यांत बंदिस्त असलेली राममूर्ति तिथून सोडवून आणणें आणि तिसरी भारतभर विशिष्टाद्वैत मताचा प्रचार करणें. हीं तीन मुडपलेलीं बोटें या तीन आकांक्षांचीं निदर्शक आहेत. ’

रामानुजांनीं तें ऐकलें आणि तात्काळ ‘ माझ्या गुरूच्या या तिन्ही इच्छा मी पूर्ण करीन ’ असें अभिवचन सर्वांसमक्ष उद्घोषित केलें. त्यासरशीं तीं मुडपलेलीं बोटें सरळ झालीं. रामानुजांना त्यामुळें समाधान वाटलें. पुढच्या आयुष्यांत त्यांनीं आपल्या गुरूच्या या तीन्ही इच्छा पूर्ण केल्या.

रामानुज विवाहित होते हें आपण पाहिलेंच आहे. पण त्यांचा गृहस्थाश्रम सुखासमाधानाचा नव्हता. त्यांची भार्या तंजामांबा त्यांना साध्यासुध्या गोष्टींतहि सतावीत होती. या रोजच्या कटकटींना ते त्रासले आणि एक दिवस संन्यास घेऊन सर्वसंगपरित्यागी बनले. कांहीं दिवसांनीं यामुनाचार्यांचा पुत्र वरदरंग हा त्यांच्याकडे येऊन त्यांना म्हणाला. ‘ तुम्ही माझ्या वडिलांचे पट्टशिष्य; तेव्हां यापुढें त्यांची गादी तुम्हींच चालवावी. ’

रामानुजांनीं ती गोष्ट मान्य केली. ते लगेच कांचीहून श्रीरंगमूला आले. तिथल्या गोष्ठीपूर्ण या वैष्णव साधूकडून त्यांनीं संप्रदायदीक्षा घेतली. त्या प्रसंगीं साधूनें त्यांना ‘ ॐ नमो नारायणाय ’ हा अष्टाक्षरी मंत्र दिला. त्यानें रामानुजांना बजावलें.

“ या मंत्रांत अद्‌भुत शक्ति आहे. याच्या केवळ श्रवणानें जीव मायाजालां-तून मुक्त होतात. तेव्हां तुम्ही हा मंत्र गुप्त ठेवा. कोणालाहि तो सांगूं नका. ”

रामानुज तिथून आपल्या मठाकडे निघाले. त्यांचें अंतःकरण परम कारुणिक होतें. समस्त जीवांच्या उद्धाराची त्या अंतःकरणाला तळमळ होती. त्यांनीं विचार केला कीं, गुरूच्या आज्ञेचा भंग झाला तरी चालेल; पण हा तारक मंत्र आपण सर्वांना ‘ मेघवृष्टी ’नें उपदेशावा. लगेच ते मंदिराच्या एका उंच भागीं उभे राहून ‘ यारे यारे सकळ जन ’ म्हणून सर्वांना उच्च स्वरानें

अनुक्रम 21305 दि: [illegible]
क्रमांक 292 नों दि: 25/[illegible]/60

वाहूं लागले. हां हां म्हणतां शेकडों लोक तिथें जमा होऊन रामानुजांच्या तोंडाकडे पाहूं लागले. रामानुज त्यांना म्हणाले—

" लोक हो ! आज मी तुम्हाला एक मंत्र सांगणार आहें. त्याच्या जपानं आणि चिंतनानं तुम्ही भवतापांतून मुक्त व्हाल. म्हणा, मोठ्यानें म्हणा ! ' ॐ नमो नारायणाय ! ' "

आणि दुसऱ्याच क्षणीं शतकंठांतून तो मंत्र उच्चारला गेला. सारें वातावरण दुमदुमून निघालें. ही वार्ता त्यांच्या दीक्षागुरूच्या कानीं जायलाहि वेळ लागला नाहीं. हातोहात आपल्या आज्ञेचा भंग करणाऱ्या या ' अविनीत ' शिष्यावर ते गरम झाले. रामानुजांना ताबडतोब बोलावून आणून ते संतप्त स्वरांत त्यांना बोलले.

" तूं माझ्या आज्ञेचा अवमान केलास. या कृत्यामुळें तूं नरकांत जाशील ! "

त्यावर रामानुज विनीत भावानें त्यांना म्हणाले.

" गुरुजी, मला क्षमा करा. मला माझ्या स्वर्ग-नरकाची चिंता नाहीं. या मंत्राच्या सामर्थ्यानें असंख्य भवतापतप्त जीवांचा उद्धार होणार असेल, तर मी ' यावच्चंद्रदिवाकरौ ' नरकांत खितपत पडलों, तरी मला त्याची पर्वा नाहीं. "

रामानुजांच्या अंतरांतली ही विश्वजनांविषयींची दया अन् करुणा पाहून त्याचा गुरु चकित झाला. रामानुजांचा दयार्द्रभाव त्यांच्या शब्दांतच नव्हे; तर त्यांच्या मुखावरहि त्याला दिसला. त्याला वाटलें कीं, हा पुरुष अलौकिक आहे. त्यामुळें त्याच्या क्रोधाची जागा प्रेमानें घेतली. शिष्याला आपल्या हृदयाशीं कवटाळून तो म्हणाला.

" शिष्योत्तमा ! मीच चुकत होतों. तूं केलंस तेंच योग्य केलंस. नारायण तुझ्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त करील ! "

याच काळांत कुलतुंग चोल हा राजा श्रीरंगम्च्या सिंहासनावर बसला. तो कट्टर शैव होता, इतकेंच नव्हे; तर अन्य मतांच्या संप्रदायांविषयीं त्याच्या मनांत दुराग्रही द्वेष होता. आपल्या कारकीर्दींत त्यानें अनेक वैष्णवांचा छळ केला. रामानुजाचार्यांवरहि त्यानें गदा आणली होती. पण त्याची कल्पना अगाऊच मिळाल्यामुळें रामानुज श्रीरंगम् सोडून द्वारसमुद्रम् येथें गेले. तिथे

बिट्टिदेव नांवाचा होयसळवंशी राजा राज्य करीत होता. त्यानें रामानुजांचें सादर स्वागत केलें. त्यांना आपल्या राज्यांत प्रेमानें ठेवून घेतलें. त्यांच्या उपदेशानें तो स्वतः वैष्णव बनला. त्याची अनुकूलता लाभल्यामुळें रामानुजांनीं दक्षिणेंत आपल्या मताचा बराच प्रचार केला. त्यानंतर आपल्या मताच्या स्थापनेसाठीं ते भारतभर हिंडले. भारतांत सर्वत्र त्यांना जाणती शिष्य मंडळी लाभली. त्यांच्या मदतीनें त्यांनीं भारतांत जागोजागीं आपल्या संप्रदायाचे मठ स्थापले.

कांहीं कालानें कुलतुंग राजा मरण पावला. त्याचें दमनसत्रहि त्याच्या-बरोबरच संपलें. मग रामानुज फिरून श्रीरंगम्‌ला आले. आळवार संतांवर रामानुजांची निस्सीम भक्ति होती. त्या संतांच्या मूर्ती बनवून त्यांनीं त्यांची तिथें स्थापना केली. तिथून ते तिरुपतीला आले. तिथली गोविंदराजाची मूर्ति कोण्यातरी दुष्टानें समुद्रांत फेंकून दिली होती. तिचा शोध करून त्यांनीं ती मूर्ति बाहेर काढली आणि पुनश्च तिची स्वस्थानीं प्रतिष्ठा केली. हळूहळू त्यांना वार्धक्यानें ग्रासलें. त्यामुळें त्यांनीं आपला संचार थांबवला. उर्वरित आयुष्य भजन-पूजनांत व्यतीत करायचें ठरवलें. त्यांना १२० वर्षांचें आयुष्य लाभलें. शके १०५९ मध्यें माघ शु. १० मीस श्रीरंगम् येथेंच त्यांनीं आपला देह ठेवला. रामानुज वैकुंठवासी झाले !

रामानुजांचे सुप्रसिद्ध ग्रंथ पुढीलप्रमाणें आहेत—(१) वेदार्थ संग्रह—या ग्रंथांत शांकरमताचें खंडन आहे. (२) वेदांतसार—ही ब्रह्मसूत्रांवरची लघ्वक्षर टीका आहे. (३) वेदांत दीप—ही ब्रह्मसूत्रांवरची विस्तृत टीका आहे. (४) गद्य त्रय—हा प्रपत्ति मार्गाचा मनोहर ग्रंथ आहे. (५) गीताभाष्य. (६) श्रीभाष्य—श्रीभाष्यांत रामानुजांच्या पांडित्याचा प्रकर्ष दिसून येतो. या ग्रंथांत विशिष्टाद्वैतमताच्या सिद्धांतांचें विस्तृत आणि सप्रमाण विवेचन आहे.

रामानुजाचार्यांच्या मतांत अद्वैतच आहे, पण तें जरा वेगळ्या प्रकारचें आहे. शंकराचार्य केवळ एका ब्रह्माचीच सत्ता मानतात, तर रामानुज चित् आणि अचित् यांनीं विशिष्ट अशा परमात्म्याची सत्ता मानतात. त्यांच्या मतें परमात्मा (ईश्वर) चित्त (जीव) आणि अचित्त (प्रकृति) हे तिन्ही नित्य पदार्थ आहेत. परमात्मा अंतर्यामी या रूपानें जीव आणि प्रकृति यांच्यांत

विद्यमान आहे. तो अंगी आहे, आणि जीव अन् प्रकृति हीं त्यांचीं अंगें आहेत. तो अंशी आहे, आणि जीव अन् प्रकृति हे त्याचे अंश आहेत. परमात्म्यापासून जीवाला किंवा प्रकृतीला वेगळें काढतां येत नाहीं. त्यांचें अनादि ऐक्य आहे. पण असें असूनहि जीव मुक्त झाला तरी, परमात्म्याशीं त्याचें संपूर्ण अद्वैत होऊं शकत नाहीं. कारण तो नित्य असला तरी अणुरूप आहे. आणि त्यामुळेंच कर्तृत्व आणि नियंतृत्व हे ईश्वराचे दोन गुण अद्वैतावस्थेंतहि त्याच्या ठिकाणीं येऊं शकत नाहींत. मात्र तेवढे दोन गुण वगळून अन्य सगळ्या गुणांनीं तो मुक्तावस्थेंत ईश्वराशीं अभिन्न होतो. म्हणजे कांहीं बाबतींत द्वैत आणि कांही बाबतींत अद्वैत, असा हा रामानुजांचा संप्रदाय आहे.

तमिळनाडमध्यें ज्या काळांत विष्णुभक्तीचा प्रवाह दुथडी भरून वाहत होता त्याच काळांत तिथले शिवभक्त आणि शैवाचार्य शिवाचा महिमा वाढवीत होते. या शिवभक्तांना ‘ नायन्मार ’ अशी संज्ञा आहे. आळवारांची संख्या बारा तर नायन्मारांची त्रेसष्ट आहे. या मोठ्या संख्येचें कारण म्हणजे तमिळनाडमधली बहुसंख्य जनता शिवोपासक होती अन् आहे हें होय. ही शिवभक्ति समाजाच्या सर्व थरांत पसरलेली आहे. शैव धर्म हा तमिळनाडमधला सर्वांत प्राचीन धर्म आहे. त्या भागांत लहान-मोठीं शेंकडों शिव-क्षेत्रें आहेत आणि त्या क्षेत्रांत भिन्न भिन्न नांवांनीं शिवाचीच पूजा केली जाते. तिथल्या मूर्तिकलेंतहि शिव आणि त्याचा परिवार यांचीच विपुलता दिसून येते. शिवाच्या भिन्न भिन्न रूपांच्या विविध मूर्ती दक्षिणेच्याच कलाकारांनीं निर्माण केल्या आहेत. कांहीं पाषाणांत घडविल्या आहेत; तर कांहीं पंचरसी धातूच्या ओतून तयार केल्या आहेत.

पण असें असलें, तरी इसवी सनाच्या पहिल्या पांच शतकांत तमिळनाडमध्यें जैन आणि बौद्ध यांचीच सरशी होती. या दोन्ही संप्रदायांच्या दडपणाखालीं शैव संप्रदाय बराच दबून गेला होता. मात्र सहाव्या शतकापासून ही परिस्थिति पालटली. पुढच्या दोन शतकांत तिथें अनेक शैव संत निर्माण झाले. ते भक्तीनें परिपुष्ट होते, तसेंच ज्ञानानें चोखाळ होते. त्यांनीं जैन व बौद्ध पंडितांशीं शास्त्रार्थ करण्यासाठीं आपले दंड थोपटले. अनेक राजदरबारांतून त्यांनीं धर्मचर्चा गाजविल्या आणि त्यांत जैन-बौद्धांना सर्वस्वीं पराभूत केलें.

तत्कालीन अनेक राजांना त्यानीं शिवाच्या सामर्थ्याची रोकडी प्रचीति दाखवली अन् त्यांनाहि जैन-बौद्धांच्या संप्रदायांतून परत शैव संप्रदायांत आणलें.

या नायन्मारांची परंपरा दुसऱ्या शतकापासून तों नवव्या शतकापर्यंत अविच्छिन्न चालू राहिलेली दिसते. या त्रेसष्ट शैव संतांच्या मालिकेंत अप्पर, सुंदरर, मणिक्कवाचकर आणि ज्ञानसंबंधर हे चौघे शैव संत प्राधान्यानें चमकतात. या चौघांची जीवनकथा थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे—

### अप्पर

अप्पर हा वेळ्ळाळर म्हणजे शूद्र जातीचा होता. तिरुवायूर हें याचें गांव. याचा बाप दिवसभर शेतांत काबाडकष्ट करून उरलेला वेळ भगवद्भजनांत घालवी. त्याच्या संचित पुण्याईनें त्याला दोन रत्नासारखीं मुलें झालीं. पहिली मुलगी झाली तिचें नांव तिलकवडियार आणि नंतर मुलगा झाला त्याचें नांव मरुणियार. हाच पुढें अप्पर या नांवानें लोकविश्रुत झाला. मुलगी मोठी झाली, तेव्हां तिची एका सेनापतीशीं सोयरीक ठरली. तिथिनिश्चयहि झाला. पण एवढ्यांत राज्यावर परचक्र आलें आणि राजानें या सेनापतीला तातडतोब त्या मोहिमेवर धाडलें. केवळ मुहूर्तच टळला असता, तर तो पुढें दुसरा धरतां आला असता. पण इथें वडियारचें संकल्पित सौभाग्यच टळलें. तिचा भावी पति त्या युद्धांत वीरगतीला गेला. त्यामुळें वडियारवर दुःखाचा डोंगरच कोसळला. त्या धसक्यानें तिच्या आई-वडिलांनीं अंथरूण धरलें आणि थोड्याच कालानें तींहि एका मागून एक परलोकीं निघून गेलीं. वडियारलाहि वाटलें, कीं आतां आपल्या जगण्यांत तरी काय राम आहे! ज्या मार्गानें आपला पति गेला, तोच मार्ग आपणहि धरावा.

पण अप्परला आपल्या बहिणीच्या या विचारांचा सुगावा लागला आणि त्यानें जाऊन तिचे पाय धरले. साश्रुनयनांनीं तो तिला म्हणाला.

"आक्का! माझ्या शिरावरचं आई-वडिलांचं छत्र फाटलं. तूंहि आतां मला सोडून चाललीस! मी आतां कोणाच्या आधारावर जगूं? तुझ्याविना मला मायेचं माणूस कोण आहे या जगांत? आक्का! आक्का!! मला उघडा टाकून नको ग जाऊं!"

त्या अश्रूंनीं तिलकवडियारचें मायाळू मन द्रवलें. भावासाठीं तिनें जिवंत राहायचें ठरवलें. सर्वसंगपरित्याग करून ती केवळ भावासाठीं राहिली आणि शिवाच्या आराधनेंत स्वतःची कालक्रमणा करूं लागली.

अप्पर हळू हळू मोठा झाला. त्याला विद्येची गोडी लागली. तो खूप शिकला. मोठा पंडित झाला. त्याबरोबरच त्याची ईश्वरविषयक जिज्ञासाहि वाढली. घरसंसारांत त्याचें मन रमेना. एक दिवस तो विरक्त होऊन परम-सत्याचा शोध करण्यासाठीं घरांतून बाहेर पडला. एकामागून एक अनेक धर्मक्षेत्रांच्या त्यानें यात्रा केल्या. साधु–संत, पंडित–संन्यासी, जो कोणी भेटेल त्याला तो मोक्षाविषयीं प्रश्न करूं लागला. याच भ्रमंतींत त्याची कांहीं जैन पंडितांशीं गांठ पडली. त्यांच्या ज्ञानाचा अप्परवर खूपच प्रभाव पडला. त्यांच्या संगतींत राहून त्यानें जैन धर्माचें अध्ययन सुरू केलें. थोड्याच काळांत तो जैन तत्त्वज्ञानाचा जणूं दुसरा बृहस्पतिच बनला. त्याला तो धर्म पटला आणि त्यानें त्याचा विधिपूर्वक स्वीकारहि केला. जैनांनीं त्याला ‘धर्मसेनर’ अशी प्रतिष्ठेची पदवी दिली. वाद-विवादांत तो इतर धर्मांतल्या पंडितांना लीलेनें आडवे उभे करूं लागला. जैन पंडित त्याच्या विद्येवर आणि वादनैपुण्यावर पराकाष्ठेचे खूष झाले. त्यांना वाटलें, कीं इतर धर्मांचीं रानेंवनें उध्वस्त करणारा एक मस्त आणि प्रचंड हत्तीच आपल्याला लाभला. त्यांनीं अप्परचा सर्वत्र उदोकार चालविला. त्या प्रशंसेचा कैफ अप्परच्या बुद्धीवर चढायला वेळ लागला नाहीं. तो मागचें सारें विसरला. घरदार विसरला. इतकेंच नव्हे; तर आपल्या जिवाआगळ्या बहिणालाहि विसरला.



अप्पर

तिलकवडियारला हा सारा वृत्तांत समजला. आपल्या भावाचा मृत्यु झाला या बातमीनें तिला जेवढें दुःख झालें नसतें, त्याहून अधिक दुःख तिला आपल्या भावाच्या धर्मांतरामुळें झालें. ती अहोरात्र शिवाला प्रार्थीत राहिली.

" प्रभो, माझ्या भावाला पुनश्च तुझ्या चरणाशीं आण. त्याचा भ्रम आणि गर्व दूर कर. महादेवा, एवढंच तुझ्याकडे मागणं."

असा कांहीं काळ गेला आणि एके दिवशीं अप्परला अचानक पोटशूळ उठला. दिवसेंदिवस त्याची व्यथा वाढूं लागली. राजवैद्यांनीं आपल्या बटव्यांतलीं खास औषधें बाहेर काढलीं; पण त्यांतलें एकहि कामीं येईना. दिवसरात्र गडबडा लोळणें आणि विव्हळणें, या पलीकडे अप्परला कांहींहि करतां येईना. मग त्याला बहिणीची आठवण झाली. त्यानें निरोप देऊन एक माणूस तिच्याकडे पाठविला—

" आक्का, असशील तशी निघून ये. तुझा भाऊ मरणाच्या दारीं पडला आहे."

पण तिलकवडियारनें त्याला साफ सांगितलें.

" मी अन्य धर्मीयांच्या मठांत, प्राण गेला तरी पाय ठेवणार नाहीं. तुला बहिण हवी असली, तर पडत झडत कसाहि इकडे निघून ये."

आणि अखेर निरुपाय होऊन अप्परला आपल्या बहिणीकडे यावें लागलें. तो तिचे पाय धरून म्हणाला, 'आक्का, नाहीं सहन होत मला. मी मरतों आतां.'

त्यावर बहिण त्याच्या पाठीवर हात फिरवून आत्मविश्वासानें म्हणाली.

" कांहीं मरत नाहींस. तुझ्यावर शिवाची अवकृपा झाली आहे. तूं शिव-मार्ग सोडून आडरानांत गेलास आणि तिथेंच रमलास, त्याचें हें तुला प्रायश्चित्त आहे. म्हण, 'नमः शिवाय !' शिवाला शरण जा."

अप्परनें हात जोडले. तो खरोखरीचा शिवाला शरण गेला. बहिणीनें त्याच्या जिभेवर शिवाची विभूति टाकली. उरलेली त्याच्या मस्तकीं लावली. अप्परला जरा आराम आटला. तो बहिणीबरोबर शिवमंदिरांत गेला. प्रदक्षिणा करून त्यानें शिवशंकराला दंडप्रणाम घातला. त्यानें शिवाची आर्त विनवणी केली, ती गद्यांत नव्हे; तर पद्यांत. त्या काव्यांतले ते शब्द प्रामाणिक होते आणि जिव्हाळ्याचे होते. शिवशंकर त्या पद्यांनीं प्रसन्न झाला. त्यानें आकाश-वाणीच्या द्वारें वरदान उच्चारलें.

" तुझा पोटशूळच काय, पण तुझा सगळा भवरोगच दूर होईल ! "

त्यानंतर अप्परचें संपूर्णतया परिवर्तन झालें. त्याची वादविवादाची खुमखुमी जिरली. तो केवल शब्दज्ञानी होता, तो आतां भक्त बनला. त्यानें अंतःकरणपूर्वक शैव धर्माची दीक्षा घेतली. तो शिवाराधनेंत निमग्न झाला.

ही बातमी जैनांच्या गोटांत वणव्यासारखी पसरली. जैन साधूंच्या पोटांत जणूं भाला घुसला. एक दिग्गज पंडित आपल्या गोटांतून पसार झाला, ही त्यांना आपली भयंकर हानि वाटली. पुढेंहि त्यांना वाटलें, कीं एक वेळ अप्पर गेल्याचें संकट सोसवेल; पण त्याच्या ज्ञानाच्या प्रभावानें राजानें जर जैन धर्माचा त्याग केला, तर ती हानि अपरंपार होईल. राजा गेला कीं प्रजा गेलीच आपल्या तावडींतून. तसें झालें तर, आपल्याला इथून चंबूगवाळें उचलायचीच पाळी येईल.

मग या जैन साधूंचें शिष्टमंडळ राजाकडे गेलें. त्यांनीं राजाच्या मनांत अप्परविषयीं तिरस्कार निर्माण केला. नसत्या लांड्या लबाड्या सांगून राजाच्या कानांत जणूं विषच ओतलें. ते राजाला म्हणाले.

" अप्परला जाब विचारला पाहिजे. त्याला कठोर शिक्षा दिली पाहिजे. त्यानें जैन धर्मावर कुऱ्हाड घातली, हा त्याचा अपराध अक्षम्य आहे."

त्यांच्या कानभरणीनें राजाहि भडकला. त्यानें अप्परला धरणें पाठवलें. शिपाई येऊन अप्परला म्हणाले.

" जसे असाल तसे उठा आणि चला आमच्याबरोबर. नाहींतर आम्हांला तुमच्या मुसक्या आंवळाव्या लागतील. "

ती धमकावणी ऐकतांच अप्परचें आत्मतेज एकाएकीं उफाळून वर आलें आणि पद्यरूपानेंच बाहेर पडलें—

" नाम् आक्कुंम् कुडि अल्लोम
नामाक्कुंम् कुडि अल्लोम्
नमनै अञ्जोम्
नरकातिल् इडर्प्पडोम्
नडलै इल्लोम् एमाप्पोम्

पिणि अरियोम् पणिवोम् अल्लोम्
इन्बे एन्नाळुम तुन्बम् इल्लै
तमार्क्कुम् कुडि अल्लात् तन्मेयान
शंकरन् नरचङ्गवेण्
  कुळै ओर् कादिल
कोमार्के नाम एनरुप् मीळा आलायक्
कोयम् मलर्च्च् चेवडिथिणैये कुरुहिनोपे "

'आमच्यावर कोणाहि राजाची सत्ता नाहीं. आम्हांला जुलमी राजाचेंच काय; पण नरकाचेंहि भय वाटत नाहीं. आमचा कधीं थरकांप होत नाहीं. आम्हांला दुःख ठाऊक नाहीं. आम्ही सदैव आनंदी. आपदा आणि संकटें आमच्याजवळ उभीं राहूं शकत नाहींत. जीवन म्हणजे आनंद! त्याला दुःखाची छाया नाहीं. कारण राजाधिराज शंकराचे आम्ही सेवक आहों. त्याच्यावर आमची पूर्ण निष्ठा आहे आणि आम्ही स्वतःला त्याच्या चरणांवर वाहून टाकलें आहे.....'

पण कांहीं लोकानीं त्यांना सांगितलें, कीं 'तुम्ही तुमच्यासाठीं नव्हे, तर संप्रदायाच्या हितासाठीं म्हणून राजाकडे चला. त्याच्या बोलावण्याला मान द्या.'

अप्पर पल्लव राजापुढें जाऊन उभा राहिला. राजा त्याला ताडताड दुरुत्तरें बोलून म्हणाला.

"पुन्हा जैनधर्माचा स्वीकार कर; नपेक्षां अंधारकोठडींत कुजून मरायला तयार हो."

अप्परनें दुसरी गोष्ट पसंत केली. तो अंधारकोठडींत बंदिस्त होऊन पडला. राजानें त्याचे खूप हाल केले. त्याला नानापरींच्या असह्य यातना दिल्या. पण त्याची शिवभक्ति दृढ होती. निर्धार 'वज्रादपि कठोर' होता. अखेर देवानें भक्ताची बाजू घेतली. एक बलशाली राजा आणि एक अकिंचन भक्त या दोघांच्या संघर्षांत भक्त विजयी ठरला. राजानें त्याची बंदिवासांतून मुक्तता करून वर क्षमाहि मागितली. अखेर राजा त्याला म्हणाला.

"अप्पर गुरुस्वामी, तुम्ही मला शैव धर्माची दीक्षा द्या."

जैन साधूंना जें घडूं नयेसें वाटत होतें, तेंच अखेर घडलें. राजा शैव होतांच सगळी प्रजा 'जय शिवशंकर' म्हणून उठली. सारे जैन मठ लगेच शिवमंदिरांत परिवर्तित झाले. अप्पर नायन्मारांच्या मालिकेंत अग्रगण्य बनला. त्यानें पुढें तमिळनाडमध्यें सर्वत्र संचार करून शैव धर्माचा प्रसार केला. अप्परच्या वाणींत विलक्षण सामर्थ्य होतें. त्यानें शेंकडों गीतें रचलीं आणि त्यांच्या द्वारें जनतेच्या हृदयावर करुण रसाची वृष्टी केली. तो लौकिक विषयांपासून नेहमींच चार हात दूर राहिला. पुढें कांहीं काल त्यानें आपलें परंपरागत कृषिकर्म सुरू केलें. पोटापुरेसें पिकवावें आणि येतांजातां, बसतां-उठतां शिवस्तोत्र गावें, याच छंदांत तो आयुष्यभर रमला. अखेर तेंहि सोडून तो पुपुहलर या गांवीं दाखल झाला. आता त्याचें वार्धक्यहि पक्व झालें होतें. देहाचें पिकलें पान केव्हां गळून पडेल, त्याचा नेम नव्हता. ती शुभ घडी शिवाच्या सान्निध्यांत साधावी, म्हणून तो त्या क्षेत्रांत आला आणि तिथेंच शिवरूपीं लीन झाला.

### मणिक्कवाचकर

दुसरा संत मणिक्कवाचकर. याचा जन्म चौथ्या शतकांत झाला. हा तमिळ आणि संस्कृत या दोन्ही भाषांचा प्रकांडपंडित होता. त्याचें अंतःकरण मात्र भक्ताचें होतें. त्यानेंहि विरोधी मतवाद्यांशीं शास्त्रार्थ करून त्यांना हरविलें. पण त्याहिपेक्षां शिवाच्या भक्तिप्रेमाची अवीट मधुर अशी जी रसधारा त्यानें वाहविली, तिचेंच महत्त्व तमिळनाडमधल्या लोकांना विशेष आहे. त्याची भाषा सुगम, तशीच रसाळ आहे. तिला आध्यात्मिक अनुभूतीचें वजनहि आहे. तमिळनाडमध्यें अशी म्हणच पडली आहे, कीं 'मणिक्कवाचरच्या काव्यानें ज्याचें हृदय रसार्द्र होत नाहीं, तो शुद्ध दगड समजावा.'

तिरुवादऊर हें याचें जन्मगांव. मणिक्कवाचकरचें चातुर्य आणि पांडित्य पाहून मदुरेचा राजा अरिमर्दन पांड्य यानें त्याला आपला प्रधान नेमलें.

पण त्या अधिकारांत त्याचें मन रमेना. शिवभक्ति हा त्याचा जीवनधर्म होता आणि त्यामुळें भक्तीची तंद्री लागली, कीं तो राजकारण सहजपणें विसरून जाई. एक दिवस जवळच्या शहरांत अरब व्यापाऱ्यांनीं उत्तम घोडे

विकायला आणले आहेत, असें राजाला कळलें. राजानें त्या घोड्यांची खरेदी करण्यासाठीं पुष्कळसें धन देऊन मणिक्कवाचकरला रवाना केलें. पण वाटेंत


मणिक्कवाचकर

त्याची एका शिवभक्ताशीं गांठ पडली आणि शिवमंदिर बांधायची त्याची आकांक्षा पूर्ण करण्यासाठीं मणिक्कवाचकरनें घोड्यांच्या खरेदीसाठीं आणलेलें सारें द्रव्य त्याला देऊन टाकलें. ही वार्ता समजतांच राजा त्याच्यावर खूप रागावला. त्यानें मणिक्कवाचकरला पकडून आणून तुरुंगांत टाकलें. पण शिवाला आपल्या भक्ताची चिंता होतीच. त्यानें राजाला कांहीं चमत्कार दाखवून मणिक्कवाचकरची मुक्तता करविली. बंदिवासांतून सुटल्यावर त्यानें ताबडतोब राजाच्या नोकरीला रामराम ठोकला आणि तीर्थयात्रेचा मार्ग धरला.


## सुंदरर

तिसरा प्रमुख नायन्मार म्हणजे सुंदरर्. हा जातीनें ब्राह्मण होता आणि तिरुनावलूर या गांवांत रहात होता. त्याला बालपणींच प्रतिभेचें देणें लाभलें होतें. तिथला एक जहागिरदार त्याच्या काव्यावर भाळला आणि त्यानें सुंदररला आपल्या घरीं आणून त्याचें पुत्रवत् पालन केलें. वयांत येतांच पालकानें त्याचें लग्न करायचें ठरविलें. पण एवढ्यांत एक म्हातारा गृहस्थ तिथें आला आणि त्या पालकाला म्हणाला.

" हा मुलगा माझा दास आहे. त्याच्या आज्यानें याला मला विकलें आहे. आणि म्हणून मी याला आतां घेऊन जाणार आहें. "

पालक आणि त्याचे आईवडील म्हाताऱ्याची ती मागणी मानीनात. त्यामुळें हें प्रकरण पंचांपुढें गेलें. म्हाताऱ्याजवळ सुंदररच्या खरेदीचें पत्र

होतें. त्या पुराव्याच्या आधारें पंचांनीं निकाल दिला, कीं सुंदररवर या म्हाताऱ्याचाच अधिकार आहे. असा न्याय निवाडा होतांच म्हातारा सुंदररला घेऊन एका शिव मंदिरांत गेला आणि तिथेंच अंतर्धान पावला. मग लोकांना कळलें, कीं हा वृद्ध गृहस्थ दुसरा कोणी नसून साक्षात् शिवच होता. या अद्‌भुत प्रचीतीनें सुंदररचें मन शिवभक्तीकडे आकर्षित झालें. त्यानेंहि अनेक पद्यें रचून शिवाचे गुणानुवाद गायिले.



सुंदरर

आतां चौथा राहिला ज्ञानसंबंधर. शैव संतांत याचें स्थान सर्वोच्च आहे. तमिळनाडमध्यें या महाभागाला जेवढी मान्यता मिळाली, तेवढी दुसऱ्या कोणालाहि मिळाली नाहीं. जैन आणि बौद्ध पंडितांना वादांत जिंकून तमिळनाडमधून त्या दोन्ही संप्रदायांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचें श्रेय मुख्यत्वें ज्ञानसंबंधरलाच आहे.

## ज्ञानसंबंधर

हा सातव्या शतकाच्या मध्यावर जन्मला. त्याचे आईवडील तंजाऊर जिल्ह्यांतल्या शियाळी या शिवक्षेत्रांत रहात होते. आपल्याला एक कुलदीपक पुत्र व्हावा, तो ज्ञानी अन् भक्त निपजावा आणि त्यानें शैव धर्म सुप्रतिष्ठित करावा, म्हणून त्यांनीं शिवाची उग्र आराधना केली. योग्य काळीं शिवानें प्रसन्न होऊन त्यांच्या पोटीं जो पुत्र जन्माला घातला, तोच हा ज्ञानसंबंधर होय. तो नुकताच चालूं बोलूं लागला होता. अशा अवस्थेंत एक दिवस त्याचा बाप त्याला घेऊन तलावावर स्नान करायला गेला. मुलाला तळ्याच्या पाळीला ठेवून तो पाण्यांत उतरला. त्याची स्नानसंध्या चालू असतांना इकडे मुलगा भुकेसाठीं रडूं लागला आहे, हें त्याच्या कानावरच जाईना. बापाचें लक्ष मुलाकडे जात नाहीं अन् मुलगा रडायचा थांबत नाहीं, असें पाहून

अशाप्रकारें शैव-वैष्णव भक्तीच्या या गंगा-यमुना तमिळनाडमध्यें समांतर वाहिल्या आणि त्या दोन्ही भावधारांनीं तमिळ जनतेचें हृदय रसार्द्र आणि भक्तिप्रवण बनविलें. आळवार आणि नायन्मार या दोन्ही पंथांचे भक्त-कवी तमिळनाडला सारखेच पूज्य आहेत. दक्षिणेंतल्या गोपुरांवर त्यांच्या आकृती कोरलेल्या आढळतील. त्यांच्या मूर्तिहि देवस्थानांतून मांडून ठेवलेल्या दिसतील. देवाप्रमाणेंच त्यांच्यावरहि गंधफूल वाहिलें गेलेलें दिसेल.





# दैव-धर्म

प्राचीन द्रविड लोकांचा धर्म कोणता होता, ते कोणत्या देवांना पूजीत होते, कोणते आचार पाळीत होते, या गोष्टींविषयीं निश्चित असें कांहीं सांगणें अवघड आहे. आर्यांचा धर्म कोणता होता तें त्यांच्या वाङ्मयावरून म्हणजेच वैदिक साहित्यावरून कळून येतें. पण तमिळ साहित्यांत द्राविड धर्माची फारशी माहिती मिळत नाहीं. कांही फुटकळ उल्लेख हातीं लागतात, त्यांवरून त्यांच्या देवा-धर्मांविषयीं कल्पना करावी लागते. ‘संघम्’ साहित्याचें परिशीलन केल्याअंतीं तमिळनाडच्या देवदेवतांची थोडीबहुत माहिती हातीं लागते. त्यावरून द्रविड लोक मुळांत निसर्गपूजक होते आणि त्याशिवाय त्यांचीं कांहीं ग्रामदैवतेंहि होतीं, असें दिसून येतें. नागपूजा त्यांच्यामध्यें प्रामुख्यानें होती. ते भूतप्रेतांना बळी देत आणि वृक्ष-देवतांनाहि भजत. ‘चरु’ म्हणजे भाताचा ढीग आणि पशुबलि हीं त्यांच्या देवतोपासनेचीं प्रमुख अंगें होतीं. तमिळ महाकाव्यांवरून तिथल्या जनतेच्या मनावर लोकभ्रम आणि अंधश्रद्धा यांचा किती प्रभाव होता तें कळून येतें. स्वप्नें आणि शकुन यांच्या हिंदोळ्यावर त्यांचें जीवन झोके घेत होतें. पुष्करिणी, तळीं, झरे, यांच्या ठिकाणीं दैवी सामर्थ्य वसतें, असा त्यांचा दृढ विश्वास होता. आपल्या जशा ‘आसऱ्या’ तशा त्यांच्या ‘आकासकन्निगे’ नांवाच्या जलदेवता होत्या. त्या जळांत राहात. अधूनमधून तळ्याच्या बांधावरून फिरत आणि पाणवठ्यावर आल्या-गेलेल्याला झपाटीत. त्यांच्या ग्रामदेवता या ‘मारी देवता’ असत. एखाद्या गडग्यांत, झाडाखालीं किंवा

जगन्माता पार्वतीला त्याची करुणा आली. ती त्या ठिकाणीं प्रगट झाली आणि तिनें त्या बालकाला पदराखालीं घेऊन स्तनपान दिलें. उमेचें केवळ दूधच त्याच्या पोटांत गेलें असें नाहीं, तर तिची ज्ञानशक्तिहि त्याच क्षणीं त्याच्या हृदयांत संचरली. शिवभक्तीचीं रसरशीत आणि भावमधुर काव्यें तेव्हांपासूनच त्याच्या मुखांतून स्रवूं लागलीं आणि त्यामुळेंच लोक त्याला ज्ञानसंबंधर म्हणूं लागले.

ऐन तारुण्यांतच तो विद्वान् आणि शैव मताचा कट्टा प्रचारक बनला. त्यानें अनेक शैव क्षेत्रांची यात्रा केली. जागोजागच्या शिवदैवतांवर जातां जातां शेंकडों पद्यें लिहिलीं. जनतेचे भावभक्तीचे प्रणाम घेत घेत तो सर्वत्र हिंडला. या प्रवासांत असतांनाच त्याच्या व्यक्तिमत्वाची कीर्ति मदुरेच्या पांड्य राजाच्या कानापर्यंत पोंचली. तो राजा जैन बनला होता; पण राणीला मात्र त्या धर्माची गोडी नव्हती. त्यामुळें राजाराणींत एक मानसिक विरोध उत्पन्न झाला होता. पण राणीच्या आग्रहावरून त्यानें संबंधरला बोलावणें धाडलें. त्याची शिवनिष्ठा पाहून राजा चकित झाला. त्यानें दरबारांतल्या जैन पंडितांना सांगितलें, कीं तुमचें मत श्रेष्ठ आहे, हें या पुरुषाला पटवून द्या. त्यावर जैन पंडित प्रतिपादनाला सरसावले. पण ज्ञानसंबंधरच्या तीक्ष्ण बुद्धीपुढें आणि त्याच्या अकाट्य कोटिक्रमापुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. संबंधरच्या शब्दांमागें त्याचें उज्ज्वल चारित्र्य उभें होतें. त्यामुळें ते सगळे विरोधी पंडित मावळूनच गेले. राजावर त्या प्रसंगाचा एवढा परिणाम झाला, कीं त्यानें तात्काळ जैन मताचा त्याग करून संबंधरच्या हस्तें शैव दीक्षा घेतली.



ज्ञानसंबंधर

असें सांगतात, कीं पुढें ज्ञानसंबंधरचा विवाह झाला आणि तीं

वधू-वरें शिवदर्शनाला म्हणून गेलीं, त्याच क्षणीं शिवाच्या परमज्योतींत विलीन झालीं.

यीं चौघांहि शैव संतांचीं पदें 'तेवारम्' या नांवानें संग्रहीत झालेलीं आहेत. दहा दहा कवितांचा एक स्तबक, अशा रचनेंत गुंफलेली ती काव्यमाला आहे. तमिळनाडमधल्या शैवांचा तेवारम् हा वेद आहे. त्याचें अध्ययन–अध्यापन आणि पठण-पाठण हें त्या प्रदेशांत एक पुनीत कर्म मानलें जातें. रामेश्वरसारख्या शैव देवस्थानांत जेव्हां देवाची मिरवणूक निघते, तेव्हां कित्येक ब्राह्मण तालसुरावर तेवारम् गात गात त्या मिरवणुकीच्या मागें जातात. तेवारम् गाणाऱ्या गायकांना 'ओदुवार' अशी संज्ञा आहे. तिकडचीं शिवमंदिरें आणि शैव मठ यांतून तेवारम् शिकवण्याच्या पाठशाळाहि आहेत.

तेवारम्च्या द्वारें शिवभक्तीचा महिमा वाढला हें खरें; पण शैव सिद्धांताचें प्रामाणिक विवेचन करणारा एखादा ग्रंथ अजून निर्माण व्हायचा होता. बाराव्या शतकांत जन्मलेल्या मेयकंडदेव या आचार्यानें तसा एक ग्रंथ निर्माण केला. 'शिवज्ञानबोधम्' हें या ग्रंथाचें नांव. शैव मताला दार्शनिक स्वरूप पहिल्या प्रथम यानेंच दिलें. म्हणूनच याला गौरवानें 'तामिळ व्यास' असें म्हणतात. शैव सिद्धांतांत शिव हा सृष्टि, स्थिति, प्रलय, दया आणि मोक्ष या पंचकडीचा स्वामी आहे. तो परम अध्यक्ष, चेतनेचें आगर, विश्वव्यापक आणि अनादि सत्य आहे. सती ही या शिवाची शक्ति. सूर्यमंडलांतून निघणाऱ्या प्रकाशानें सकल सृष्टीला जशी प्रभा आणि उष्णता द्यावी, त्याप्रमाणें समस्त चराचराला जीवनदान देऊन तीं क्रियाशील बनवीत आहे. पौराणिक सृष्टिप्रक्रियेंत शिवाला केवळ संहारक किंवा प्रलयंकर मानलेलें आहे. पण त्याला करुणासागर आणि मोक्षदानी मानणें हा दक्षिणेंतल्या शैव सिद्धांताचा विशेष आहे. त्यांच्या मताप्रमाणें सृष्टींतलीं तत्त्वें तीन—पति, पशु आणि पाश. तीन्ही पकारात्मक आहेत. समस्त अज्ञानी जीव हे पशु. त्यांचा स्वामी म्हणून शिव हा पशुपति. आणि जीवाला जन्म–मरणाचा बंध हा पाश. जीव त्या पाशांत अडकला म्हणजे तो शिवापासून वेगळा पडतो. या पाशांतून मुक्त होण्याचें साधन म्हणजे शिवभक्ति आणि अखेरीस शिव–स्वरूपाचें ज्ञान.

अशाप्रकारें शैव-वैष्णव भक्तीच्या या गंगा-यमुना तमिळनाडमध्ये समांतर वाहिल्या आणि त्या दोन्ही भावधारांनीं तमिळ जनतेचें हृदय रसार्द्र आणि भक्तिप्रवण बनविलें. आळवार आणि नायन्मार या दोन्ही पंथांचे भक्त-कवी तमिळनाडला सारखेच पूज्य आहेत. दाक्षिणेंतल्या गोपुरांवर त्यांच्या आकृती कोरलेल्या आढळतील. त्यांच्या मूर्तिहि देवस्थानांतून मांडून ठेवलेल्या दिसतील. देवाप्रमाणेंच त्यांच्यावरहि गंधफूल वाहिलें गेलेलें दिसेल.






# देव-धर्म

प्राचीन द्रविड लोकांचा धर्म कोणता होता, ते कोणत्या देवांना पूजीत होते, कोणते आचार पाळीत होते, या गोष्टींविषयीं निश्चित असें कांहीं सांगणें अवघड आहे. आर्यांचा धर्म कोणता होता तें त्यांच्या वाङ्मयावरून म्हणजेच वैदिक साहित्यावरून कळून येतें. पण तमिळ साहित्यांत द्राविड धर्माची फारशी माहिती मिळत नाहीं. कांही फुटकळ उल्लेख हातीं लागतात, त्यांवरून त्यांच्या देवा-धर्माविषयीं कल्पना करावी लागते. 'संघम्' साहित्याचें परिशीलन केल्याअंतीं तमिळनाडच्या देवदेवतांची थोडीबहुत माहिती हातीं लागते. त्यावरून द्रविड लोक मुळांत निसर्गपूजक होते आणि त्याशिवाय त्यांचीं कांहीं ग्रामदैवतेंहि होतीं, असें दिसून येतें. नागपूजा त्यांच्यामध्यें प्रामुख्यानें होती. ते भूतप्रेतांना बळी देत आणि वृक्षदेवतांनाहि भजत. 'चरु' म्हणजे भाताचा ढीग आणि पशुबलि हीं त्यांच्या देवतोपासनेचीं प्रमुख अंगें होतीं. तमिळ महाकाव्यांवरून तिथल्या जनतेच्या मनावर लोकभ्रम आणि अंधश्रद्धा यांचा किती प्रभाव होता तें कळून येतें. स्वप्नें आणि शकुन यांच्या हिंदोळ्यावर त्यांचें जीवन झोके घेत होतें. पुष्करिणी, तळीं, झरे, यांच्या ठिकाणीं दैवी सामर्थ्य वसतें, असा त्यांचा दृढ विश्वास होता. आपल्या जशा 'आसऱ्या' तशा त्यांच्या 'आकासकन्निगे' नांवाच्या जलदेवता होत्या. त्या जळांत राहात. अधूनमधून तळ्याच्या बांधावरून फिरत आणि पाणवठ्यावर आल्या-गेलेल्याला झपाटीत. त्यांच्या ग्रामदेवता या 'मारी देवता' असत. एखाद्या गडग्यांत, झाडाखालीं किंवा

लहानशा खोपटांत; पण गांवाबाहेर त्यांचें वास्तव्य असे. या ग्रामदेवतांचें पुजारीपण बायकांच्याकडे असे. गांवांत जरीमरी उत्पन्न करून लोकांना उपद्रव करणें, संहारलीला मांडणें, हें त्या ‘ मारी ’ देवतांचें कार्य असे. त्यांचा क्रोध शमावा आणि त्यांनीं गांवांतल्या बाळगोपाळांकडे वांकड्या नजरेनें पाहूं नये, म्हणून द्रविड लोक वर्षांतून एकदा त्यांची जत्रा करीत आणि त्या जत्रेंत त्यांना पशुबलि आणि अन्नबलि समर्पीत. एवढें केल्यानें त्या देवता शांत राहातील, अशी त्यांची खात्री असे.

तमिळमहाकाव्यांत आर्य आणि द्राविड अशीं दोन्हीं प्रकारचीं दैवतें आपल्याला दर्शन देतात. त्यांत स्वर्गींचा राजा देवेंद्र आपल्याला भेटतो, तशीं धुरपतीसारखीं क्षुद्र दैवतेंहि आपलें अस्तित्व दाखवतात. इसवी सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकांत तमिळनाडमध्यें मंदिरसंस्था निर्माण झाल्याचे पुरावे मिळतात. पुहार नगरींत इंद्र, बलदेव, सूर्य, सुब्रह्मण्य, शास्ता इत्यादि देवतांचीं मंदिरें होतीं. तिथें त्यांच्या नित्य पूजाअर्चा चालत. यमाचें मंदिर नगराच्या बाहेर स्मशानभूमींत होतें. कारण ती मृत्यूची देवता होती. वैदिकांचा यम हा एक सामान्य देव आहे. तो पितरांचा अधिपति असला तरी भयानक नाहीं. वैदिक लोक खुशाल त्याला आपल्या यज्ञमंडपांत बोलावीत आणि त्याच्यासाठीं सोमरस गाळीत. यमाला आजचें क्रूर आणि उग्र स्वरूप दक्षिणेंतच मिळालें असावें आणि तिथून तें पुराणवाङ्मयांत आलें असावें असें वाटतें.



इंद्र

वैदिकांच्या इंद्रानें तमिळनाडमध्यें प्रवेश केला तो अगस्त्याचा हात धरून यांत शंका नाहीं. पुहार नगरींत इंद्राचा अठ्ठावीस दिवसांचा ‘ इंद्रमहोत्सव ’ अगस्त्यानेंच चोळराजाला करायला लावला आणि त्याचें पौरोहित्यहि

अगस्त्यानेंच केलें, असें शिलप्पधिकारम् मध्यें सांगितलें आहे. इंद्र हा पर्जन्याचा देव. सारीं मेघकुळें आणि दिव्य जळें त्याच्या स्वाधीन. हा इंद्र आर्यांप्रमाणेंच तमिळनाडच्या जनतेनेंहि आपला म्हटला, याला तसेंच एक कारण आहे. द्रविडांचाहि एक पर्जन्यदेव होताच आणि त्याचे गुणधर्महि इंद्रासारखेच होते. फक्त तो सोमरसाऐवजीं तांदुळाची खीर खात होता एवढेंच. 'अहम्' या काव्य संग्रहांत त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आढळतें–

'तो मेघांचा राजा आहे. त्याचें शस्त्र म्हणजे वज्र. जेव्हां ग्रीष्म ऋतूंत भूमि तापते, भेगाळते, तेव्हां तो मेघांना धाडून तिच्यावर जलधारा बरसतो. शेंकडो रूपगार्विता अप्सरा त्याला सदैव घेरून असतात. त्याची परिचर्या करणें हें त्या अप्सरांचें नेमलेलें काम. त्याचा खाद्य पदार्थ म्हणजे पोंगळ आणि पोंगळ म्हणजे तांदुळांची खीर.......'

या देवाचें नांव जरी इंद्र नसलें तरी इंद्राचे बरेचसे गुणधर्म त्याच्या ठिकाणीं निश्चित होते. त्यामुळें इंद्राच्या संपन्न व्यक्तिमत्त्वांत स्वतःचा प्रवेश करून घ्यायला त्याला फारशी अडचण पडली नसावी.

पण कांहीं झालें तरी इंद्र हा तमिळनाडनें मागाहून स्वीकारलेला देव आहे. तिथल्या आम जनतेचा श्रद्धापात्र आणि भवभयहर्ता 'एको देवः' म्हणजे शिव हाच होय. प्रागैतिहासिक कालापासून तिथें या देवाची लिंग-स्वरूपांत पूजा-अर्चा चालत आली आहे. तमिळनाडमध्यें मंदिरसंस्था निर्माण होण्याच्या पूर्वींहि शिवाचीं लांकडी वा मातीचीं घरकुलवजा मंदिरें गांवो-गांवीं सर्वत्र होतीं असें संशोधकांचें मत आहे. आज तीं नामशेष झालीं असलीं तरी क्वचित् एखाद्या ठिकाणीं त्यांची खूणहि कळूं शकते. कुरिंजि प्रदेशांतल्या पहाडी लोकांचा तर तोच एक सर्वेश्वर होता. ते लोक महेंद्रगिरि हें त्यांचें निवासस्थान मानीत. उत्तरेच्या शिवाचा जसा कैलास, तसा दक्षिणेच्या शिवाचा हा महेंद्रगिरि. तिथें वास्तव्य करून तो मानवांच्या जीवन-मरणावर प्रभुत्व करतो असें तें समजत. आर्यांचा रुद्र आणि द्रविडांचा शिव हे दोन भिन्न देव पुढें संस्कृतिप्रक्रियेंत एकरूप झाले. वेदांतला रुद्र हा रडवणारा अतएव भयावह होता. पण द्रविडांचा शिव हा करुणासागर आणि कल्याणमूर्ति आहे. अगस्त्यानंतरच्या काळांत हे दोन्ही स्वभावधर्म एक-

वटलेला आजचा भोळा शंकर निर्माण झाला. याच संयुक्त शिवस्वरूपाला धरून पुढें दक्षिणेंत शैव पंथ स्थापन झाला आणि त्यानें शिवभक्ति सार्वभौम करण्याचा मान मिळवला.

## मायोन-श्यामसुंदर

मुल्लै प्रदेशाची देवता मायोन ही होती. हा प्रदेश म्हणजे तमिळनाडची वनभूमि होय. पशुपालन हा तिथल्या लोकांचा मुख्य व्यवसाय. त्यांचे गोधनाचे कळप दिवसभर रानांत चरत आणि संध्याकाळीं घरीं परत येत. या वनीं विजनीं चरणाऱ्या फिरणाऱ्या गोधनाचें रक्षण करणारा कोणी तरी एक देव त्यांना हवाच होता. वैदिक आर्यांचा पूषा नांवाचा असा एक पशुरक्षक देव होताच. तमिळनाडमधल्या लोकांनीं त्या कामीं मायोन या देवाची कल्पना केली. हा देव तरुण किंवा पोक्त नाहीं. तो बालरूप आहे. वर्णानें निळासांवळा आहे. त्याला गायीवासरांचें अपार प्रेम आहे. गोधनालाहि तो जिवाआगळा आवडतो. तो मुरली वाजवून सगळा वनप्रांत नादमय, स्वरमय करून सोडतो. गायीवासरें शेपट्या उंचावून त्या मुरलीवाल्याच्या अनुरोधानें धावूं लागतात. त्याच्याच सारखे त्याचे सवंगडी असतात. तो त्या बाळगोपाळांत रमतो आणि त्यांनाहि रमवतो. गवळणींनाहि त्याचाच छंद. त्याच्यावर प्रेम करतांना आणि त्याला दहीं, दूध अर्पण करतांना त्या जीवभाव विसरतात. दुधाची त्याला फार आवड. खीर म्हणजे त्याचें आवडतें मिष्टान्न.

कोणाला वाटेल कीं, हें गोकुळांतल्या श्यामसुंदराचें वर्णन चाललें आहे. पण नाहीं. हें मायोनचें, तमिळनाडच्या वाङ्मयांतलें वर्णन आहे. गोकुळांतल्या बाळकृष्णाशीं तें तंतोतंत जमतें हें महदाश्चर्य ! पण इथेंच पुराणसंशोधकांना एक नवा धागा सांपडला आहे. महाभारत आणि भागवतपुराण हे कृष्णचरित्र विशद करणारे दोन महान् ग्रंथ. पण महाभारताच्या रंगभूमीवर श्रीकृष्णाचा प्रवेश होतो तो पांडवांचा सहकारी, यादवांचा राणा आणि द्वारकेचा अधिपति या नात्यानें. श्रीकृष्णाच्या बाळपणाच्या चरित्राला महाभारतानें स्पर्श केलेला नाहीं. तो वसुदेव–देवकीचा पुत्र एवढें सांगितलें आहे; पण गोकुळांतल्या रसिक मनाला मुग्ध करणाऱ्या त्याच्या बाललीला

महाभारताला अपरिचित आहेत. तें काम भागवतानें केलें आहे. भागवताच्या दशम स्कंधाचा फार मोठा भाग गोकुळ-वृंदावनांतल्या कृष्णचरित्रानें बहरलेला आहे. तिथें दह्यादुधाची चोरी आहे. गवळणींच्या खोड्या आहेत. छद्मी दैत्यांचें मर्दन आहे. आणि अशाच कितीतरी अनेक गोष्टी आहेत. महाभारतकाराला न गवसलेला हा बाळकृष्ण भागवतकाराला कुठून सांपडला, हा प्रश्न पुढे येतो. भागवत हें भक्तीला प्राधान्य देणारें पुराण आहे. आणि भक्तीचा जन्म द्रविड देशांत म्हणजे तमिळनाडमध्यें झालेला आहे. भागवताची रचना महाभारतानंतर कांहीं शतकांनीं झालेली आहे. भक्ति जशी द्रविड देशांतून वर आली, तसा तिच्याबरोबर तिथल्या जनतेचा लाडका देवहि भागवतांत शिरला, असा संशोधकांचा तर्क आहे. भागवतकारानें त्यालाच शब्दांचीं लेणीं चढवलीं, भावफुलांच्या माळा घातल्या आणि महाभारतांत अर्जुनाला गीतेचा उपदेश करणाऱ्या आणि राजकारणाची धुरा वाहणाऱ्या योगेश्वर श्रीकृष्णाचें पूर्वरूप किंवा बालरूप म्हणून त्याच्या चरित्राला जोडून दिलें; असें त्यांचें म्हणणें आहे.



बाळकृष्ण

### शेयोन-स्कंद

जसा मायोन तसाच दुसरा शेयोन. हा कुरिंजि प्रदेशाचा देव होय. त्याचें दुसरें नांव मुरुगन आणि तिसरें सुब्रह्मण्य. आपला गणपति जसा सिंदूरवर्णी तसाच हाहि रंगानें लाल आहे. लाल रंगाला प्रेमाचें प्रतीक

मानणें, हा कांहीं आधुनिक कविसंकेतच नव्हे. रक्तवर्ण शेयोन हा पूर्वापार प्रेमाचा देव मानला गेला आहे. तिकडच्या उपवर कन्या आपल्याला इष्ट वर मिळावा म्हणून याची पूजा करतात. हा देव वृत्तीनें शिकारी बाण्याचा आहे. त्याच्या हातीं सदैव भाला असतो, तो याचसाठीं. भाताची रास अन् त्याच्यावर बकऱ्याचें ऊन ऊन रक्त हें त्याचें आवडतें भोजन आहे. हा मोरावर बसून संचाराला निघतो. द्रविड लोक याला कोर्रवाईचा मुलगा समजतात. हा समरविजयी सेनापति आहे.


मुरुगाचीं स्थानें बहुधा डोंगरपठारावर असतात. वर्षांतून एक दिवस म्हणजे स्कंदषष्ठीच्या दिवशीं त्याची जत्रा भरते. मुरुगाचे हजारों भक्त त्या भूमींत आहेत. जत्रेच्या दिवशीं ते दूधदुभत्याच्या कावडी खांद्यावर घेऊन त्याच्या दर्शनासाठीं डोंगर चढूं लागतात. त्या कावडी नाचवीत नाचवीत वर नेणें, असाहि प्रकार असतो. हें ‘ कावडी नृत्य ’ प्रेक्षणीय असतें. त्याला बृंदवादनाची साथ असते. नृत्य चालू असतां मुरुगाचे पराक्रम वर्णन करणारीं गीतें गायिलीं जातात. या गीतांना ‘ कावडी चुंडु ’ असें नांव आहे. हीं गीतें रोमहर्षक असतात आणि श्रोत्यांच्या मनावर गंभीर परिणाम घडवतात.

आतां याची कार्तिकेयाशीं तुलना करा. तोहि पार्वतीचा पुत्र आणि देवांचा सेनापति म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानेंच तर स्वर्गातल्या समस्त देवांना अनाटोप ठरलेल्या तारकासुराला कंठस्नान घातलें. स्कंद आणि मुरुगन हे अगदीं समस्वभावी आणि समानधर्मे असल्यामुळें संस्कृति-संगमाच्या प्रक्रियेंत त्या दोहोंचें तादात्म्य घडवून त्याला शिवपरिवारांत दाखल केलें गेलें. अंतर इतकेंच, कीं कार्तिकेय ब्रह्मचारी आहे आणि मुरुगन विवाहित असून दोन बायकांचा दादला आहे. वल्ली आणि देवायनी हीं त्याच्या कलत्रांचीं नांवें होत. त्यांपैकीं वल्ली ही किरात-कन्या आहे. मुरुगन तिच्यावर मोहित झाला आणि मोठ्या प्रयासानें त्यानें तिची प्राप्ति करून घेतली. तमिळनाडमध्यें वल्लीच्या प्रेमांत सांपडलेल्या मुरुगनची ही प्रणयकथा अत्यंत लोकप्रिय आहे. तत्त्वज्ञांनीं तिच्यांतून कांहीं आध्यात्मिक अर्थहि निष्पन्न केले आहेत. ती कथा ऐकली, कीं जेजुरीच्या खंडोबाची याच जातीची प्रेमकथा स्मरणांत येते. बाणाई या

एका धनगराच्या मुलीवर खंडोबा असाच अनुरक्त झाला होता आणि त्यापायीं त्यानें त्या धनगराची मेंढरेंहि वळलीं होतीं.

## कोर्रवाई

तमिळनाडची प्राचीन स्त्री देवता म्हणजे कोर्रवाई. पालै प्रदेशांतल्या मरवर आणि कल्लर या जमातींची ती कुलदेवता. जशीं माणसें तसेंच



काली


त्यांचे देव ! मरवर आणि कल्लर हे लोक वाल्ह्या कोळ्याच्या वृत्तीचे होते. दरोडे, लुटालूट, वाटमारी, हा त्यांचा जीवनव्यवसाय होता. अर्थात्, कोर्रवाई देवीहि त्यांच्या त्या धंद्याला साजेशीच होती. वृत्तीनें क्रूर, रक्तपिपासु आणि मद्यमांसाची भोक्ती. हे लोक लूटमारींत घबाड सांपडावें म्हणून तिला गाऱ्हाणें घालीत आणि मनाजोगती शिकार साधली, कीं तिला पशुबलि

आणि शक्य झाल्यास, नरबलिहि समर्पीत. पुढें हीच कोर्रवाई कालीच्या रूपानें पुराणवाङ्मयांत दाखल झाली. नांव बदललें, वेष बदलला, तरी तिचा स्वभाव बदलला नाहीं. तुम्ही कलकत्त्याला जाऊन बघा. तिथें तिला रोज बोकडांचा उपाहार लागतो आणि त्याच्या रक्तानें न्हाल्याशिवाय तिचें पुढचें आह्निक सुरूच होत नाहीं. तमिळनाडमधल्या वर उल्लेखिलेल्या सर्व मारीदेवता आतां कालीचींच भिन्न भिन्न रूपें म्हणून ओळखल्या जातात.

' संघम् 'कालीन साहित्यांत अनेक देवदेवतांची नांवनिशी मिळते; तसेंच तत्कालीन धर्मसंप्रदायहि कळून येतात. दुसरी आणखीहि एक गोष्ट कळते, ती म्हणजे त्या लोकांच्या धार्मिक सहिष्णुतेची. तमिळनाडमध्यें त्या प्राचीन काळांतहि हिंदु-धर्माच्या विविध संप्रदायांबरोबरच बौद्ध-जैन हे पंथहि गुण्या-गोविंदानें नांदत होते. प्रत्येक धर्माला किंवा पंथाला आपापला मतप्रचार करायला तिथें पूर्ण वाव होता. बौद्ध व जैन हे निरीश्वरवादी, तर शैव आणि वैष्णव हे कट्टे ईश्वरवादी. त्यामुळें खरें म्हणजे तिथें धार्मिक रणकंदन माजा-यला हवें होतें. पण तसें घडलें नाहीं. त्या काळच्या राजांनींहि सर्व धर्मपंथांना समानतेनें वागविलें. त्यांनीं सर्वांचा योगक्षेम तर चालवलाच; शिवाय त्या त्या पंथांच्या शिष्यांना आणि जिज्ञासूंना पंथीय धर्म आणि तत्त्वज्ञान शिकवि-ण्याचीहि सोय करून दिली. जैन-बौद्ध आपसांत लढल्याचे दाखले मिळतात. शैव-वैष्णवांनींहि त्यांच्याशीं दोन हात केल्याचे पुरावे आढळतात, पण हे लढे आणि संघर्ष गंभीर स्वरूपाचे कधींच झाले नाहींत. ' पुरम् ' नांवाच्या काव्यसंग्रहांत तत्कालीन धार्मिक वादविवादांचें चित्रण आलेलें आहे. पण असें असूनहि त्या संघर्षांना ' क्रुसेडस् 'ची किंवा ' जिहाद 'ची धार कधींच चढली नाहीं आणि तसलें अमानुष क्रौर्यहि त्या भूमीवर कधीं नंगें नाचलें नाहीं. ' शिलप्पधिकारम् 'मधलें एक उदाहरण इथें सांगण्यासारखें आहे. तत्कालीन चेर राजा शेंगट्टुवान हा जेव्हां दिग्विजय करीत हिमालयावर जाऊन धडकतो, तेव्हां तो आपला मुकुट शिवाच्या पायावर ठेवतो आणि नंतर विष्णूचा कृपाप्रसाद आपल्या बाहूवर धारण करतो. हें दुहेरी कृत्य त्यांच्या सर्वधर्मी समानत्वाचें ठळक असें उदाहरणच म्हणायला हवें. दोन भाऊ असले तर त्यांतला एक शैव आणि दुसरा जैन; पतिपत्नींमध्यें पति

जैन तर पत्नी शैव, अशीं एकाच कुटुंबांत भिन्न भिन्न संप्रदाय चालत असल्याचीं उदाहरणेंहि तमिळ साहित्यांत आढळतात. या धार्मिक सहिष्णुतेचा तमिळनाडमधल्या लोकांना चांगलाच फायदा झाला. आवतींभोंवतीं कार्य करणाऱ्या विविध धर्मपंथांतून त्यांनीं आपल्याला चांगलें वाटेल आणि अनुकूल ठरेल तेंच नेमकें उचललें. उत्तर-दक्षिणेंतल्या धर्मपंथांची समोरासमोर भेट प्रथम तमिळनाडमध्येंच झाली. त्यामुळें दोन्ही धर्मांचा एकमेकांवर प्रभाव पडला आणि परस्परांच्या अनेक अंगांनीं विकासहि झाला.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि: ...





# मंदिरें - गोपुरें

दक्षिण भारतांत मंदिर—निर्मीतीचा पाया कोणी आणि केव्हां घातला, तें सांगणें कठिण आहे. सामान्य कल्पना ही कीं, आर्यांचें दक्षिणेंत दळणवळण वाढल्यानंतर हें कार्य सुरू झालें आणि पुढें द्रविड जातीनें त्या कलेंत आपल्या प्रतिभेनें कल्पनातीत आणि गौरवास्पद यश संपादिलें. आर्यपूर्व काळांत द्रविड लोक मृतांना पुरीत व त्या जागीं एखादा मोठा दगड स्थापीत. मग त्याच्या भोंवतीं आणखी कांहीं लहान—मोठ्या दगडांची रास रचीत. पुढें त्या दगडांच्या रूपानें पितरांची पूजा सुरू झाली. त्या दगडांना हळूहळू समाधीचें रूप प्राप्त झालें. नंतर स्तूपाच्या आकारांत अशा समाधिस्थानांची उभारणी होऊं लागली. कालांतरानें त्या स्तूपाच्या भोंवतीं भिंती उभ्या झाल्या. लोकांना एकत्र बसण्यासाठीं पुढें लहानसे सभामंडपहि निर्माण होऊं लागले. आर्यांच्या प्रभावानंतर पुढें याच पद्धतीवर तिकडचे लोक देवळें बांधूं लागले आणि मृतात्म्याच्या दगडांऐवजीं त्या मंदिरांतून ओबड-धोबड अशा उपास्य मूर्ति येऊन बसल्या.

तमिळनाडूमधलीं अतिप्राचीन मंदिरें लांकूड आणि विटा यांचीं होतीं. इसवी सनाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकांत अशीं मंदिरें त्या भागांत सर्वत्र असल्याचें कळतें. पण विटा आणि दगड हा मालमसाला कांहीं झालें तरी कच्चाच. त्यामुळें कालांतरानें तीं मंदिरें नष्टच नव्हेत; तर नामशेषहि झालीं. त्यानंतर खडक पोखरून त्याच्या पोटांत मंदिरें बनविण्याचा अभिनव

उपक्रम पहिल्या प्रथम पल्लव राजांनीं सुरू केला. या राजांना मंदिर निर्मितीची आणि कलाकौशल्याची विलक्षण हौस होती. या वंशांत दोन मोठे कलाप्रेमी राजे झाले. एक महेंद्रवर्मन् आणि दुसरा नरसिंहवर्मन्. हे दोघे पिता–पुत्र होते. सातवें शतक हा त्यांचा काळ होय. भारतीय वास्तु–शिल्प कलेंत पल्लवांच्या नांवाचें एक युग मानतात. या युगाचे धुरंधर निर्मिते हेच पिता–पुत्र होत.

## महाबलिपुरम्


महेंद्रवर्मन्नें अनेक पहाड खोदून गुहामंदिरें आणि मंडप बनवले. अशा प्रकारचे मंडप आजहि तिरुच्चि आणि पदुक्कोटा या भागांतल्या पहाडी प्रदेशांत पाहायला सांपडतात. मंदिरनिर्मितीच्या प्रक्रियेंत विटा आणि चिखल यांचा त्याग करून त्या जागीं दगडांचा उपयोग करणारा महेंद्रवर्मन् हा पहिला वास्तुविशारद राजा होय. याच नव्या पद्धतीचा उत्कर्ष करून त्याच्या पुत्रानें म्हणजेच नरसिंहवर्मन्नें एक अजरामर कलाक्षेत्र निर्माण करून ठेवलें, त्याचें नांव 'महाबलिपुरम्.' नरसिंहवर्मन्चें दुसरें नांव मामल्ल असें होतें. त्यामुळें त्याची ही निर्मिति 'मामल्लपुरम्' अशाहि नांवानें ओळखली जाते.

हें ठिकाण मद्रासपासून ३२ मैलांवर समुद्रकिनारीं आहे. त्याच्या आस-पास काळ्या कातळाच्या छोट्या छोट्या टेकड्या आहेत. प्राचीनकाळीं इथें मोठें बंदर होतें आणि त्याला लागूनच हें शहर वसलें होतें. दक्षिण भारताचा इथून जलमार्गें परदेशाशीं व्यापार चालत होता. पेरिप्लस व टॉलेमी यांनीं या गोष्टीचा उल्लेख करून ठेवला आहे. पल्लवयुगाच्या वास्तु-कलेचा अप्रतिम सुंदर नमुना आजहि पाहायला सांपडतो तो या ठिकाणींच.

इथल्या मंदिरांचा विशेष हा कीं, तीं मोठा एकसंध खडक आंतून आणि बाहेरून खोदून केलेलीं आहेत. हीं मंदिरें 'पांडवांचे रथ' या नावांनें ओळखलीं जातात. सर्वांत मोठा रथ ४२ फूट लांब, ३५ फूट रुंद आणि ४० फूट उंच आहे. द्रौपदीचा रथ सर्वांत छोटा. तो एखाद्या बंगाली झोपडीसारखा दिसतो. बहुतेक सर्व रथांच्या आंत गाभारा आहे; पण तो अपुऱ्या अवस्थेंत आणि ओबडधोबड दिसतो. प्रत्येक रथाला सभोंवतीं

प्रदक्षिणेचा मार्ग आहे अन् प्राकारहि आहे. आणि हा सारा एकसंध कारभार आहे.

पांडवरथांपासून थोड्या अंतरावर एक खडक उभा आहे. जणूं युग-युगांतरें उन्हा–पावसांत तपस्या करणारा एखादा महामुनीच. कलाकाराला त्या खडकाचें आकर्षण वाटलें, यांत कांहीं नवल नाहीं. त्यानें त्याची पाठ



महाबलिपुरम्

कोरली ती अर्जुनाच्या तपस्येच्या दृश्यानें. पांडव वनवासांत असतांना व्यासांनीं अर्जुनाला हिमालयाच्या एका शिखरावर पाशुपतास्त्रप्राप्तीसाठीं तपाला धाडलें होतें. त्याच घटनेचें हें दृश्य आहे. त्याच्या शेजारींच कालीचें महिषासुराशीं युद्ध आणि गोपाल-कृष्णाचें गोवर्धनोद्धारण हीं दृश्येंहि आकाराला आणलेलीं आहेत.

इथेंच समुद्रतीरावर साठ फूट उंचीचें आणखी एक मंदिर स्वतंत्रपणें उभें दिसतें. त्याला दोन गोपुरें आहेत. तिथें जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूची दृष्टि हें मंदिर वेधून घेतें आणि मग नकळतच त्याचे पाय तिकडे वळतात. सागराच्या लाटांनीं धडका मारून मारून त्याचा प्राकार जमीनदोस्त केला आहे; पण तरीहि अजून मुख्य मंदिराला धक्का लागलेला नाहीं हें विशेष!


महाबलिपुरम् हें एक कलेचें द्वीप आहे. तें कलाप्रेमी जनांचें यात्रास्थान आहे. तें भारताच्या गतकालीन गौरवाचें साक्षी आहे. दक्षिणेंतलें हें सर्वांत प्राचीन कलावैभव होय. १४०० वर्षे उलटून गेलीं, तरी अजून इथली कलाकुसर झिजली नाहीं आणि मूर्तीहि अस्पष्ट झाल्या नाहींत. पल्लवांच्या या अभिजात स्थापत्यकलेचें पुढें दक्षिणापथांत सर्वत्र अनुकरण झालें. भारताच्या बाहेर जावा, सुमात्रा, कंबोडिया, हिंदचीन इत्यादि पूर्वेकडच्या देशांत आणि द्वीपांतहि या कलेचा प्रकाश पसरला. त्या देशांत पल्लवांच्या पद्धतीवर एवढीं प्रचंड मंदिरें तिथल्या स्थपतींनीं उभारलीं, कीं त्यांच्यापुढें दक्षिणेंतल्या उत्तुंग मंदिरांनींहि आपल्या माना झुकवाव्या.

भारताच्या कलाक्षेत्रांत अशाप्रकारें एक नवें दालन निर्मून पल्लवांची सत्ता समाप्त झाली. पल्लवांना मागें लोटून त्या जागीं चोळ आले. नवव्या शतकांत दक्षिणेंत त्यांनीं एक बलाढ्य साम्राज्य स्थापित केलें. दहाव्या शतकांत या चोळांचा प्रतापसूर्य इतका तळपला, कीं लंकेपासून तों गंगातटाकपर्यंत आणि पूर्वेला ब्रह्मदेशापर्यंत अनेक राज्यें त्यांनीं आपल्या अंकित करून घेतलीं. महाप्रतापी राजराज चोळानें हा सगळा राज्यविस्तार केला. पल्लवांची कलाप्रेरणा चोळांनींहि उचलली. इतकेंच नव्हे; तर आपल्या प्रतिभेनें तिचा अनेक अंगांनीं विकासहि केला. पल्लवांनीं एकाच दगडांत खोदकाम करून मंदिरें निर्माण करण्यांत कुशलता दाखविली, तर चोळांनीं लहान मोठे दगड मनाप्रमाणें घडवून इष्ट स्थळीं आपलीं मंदिरें उभारलीं. प्रारंभींचीं हीं मंदिरें आकारानें छोटीं होतीं, पण पुढच्या भव्य निर्मितीचीं बीजें त्यांतच दडलेलीं होतीं.

## तंजाऊर

चोळकालांतल्या विशाल–सुंदर कलानिर्मितीचें प्रतीक कोणतें म्हणून विचारल्यास 'बृहदीश्वरमंदिर' हें त्याचें एकमेव उत्तर आहे. अकराव्या शतकाच्या प्रारंभीं राजराज चोळानें हें मंदिर उभारलें. तंजाऊरच्या कोटांत दक्षिण अंगाला याची उभारणी झाली आहे. मंदिराचें प्रांगण ५०० फूट लांब आणि २५० फूट रुंद आहे. मंदिराची विमान धरून उंची २१६ फूट

भरते. या ‘ विमानाला ’ म्हणजेच गाभाऱ्यावरच्या शिखराला चौदा मजले आहेत. सर्वांत वरचा महाकाय कळस एकाच दगडाचा आणि एकसंध



बृहदीश्वर मंदिर

आहे. सुमारें वीस टन वजनाचा हा पाषाणराज त्या काळच्या लोकांनीं इतक्या उंचीवर कसा नेऊन बसविला असेल, असा प्रश्न सहाजिकच उत्पन्न होतो. त्या काळीं कांहीं आजच्या युगांतलीं ‘ बगळा यंत्रें ’ नव्हतीं, कीं उचललें अवजड कीं ठेवलें नेऊन हवें तिथें !

असें सांगतात, कीं हा कळस जिथें बसला आहे, तिथवर त्या लोकांनीं संथ चढावाचा एक कच्चा रस्ता बांधून काढला आणि त्यावरून हा प्रचंड कळस ढकलीत ढकलीत शिखराच्या डोक्यावर नेऊन बसवला. मग तो रस्ता खणून टाकून देऊळ मोकळें केलें. आहे कीं नाहीं कल्पना ! या मंदिराच्या भव्यपणाला अनुलक्षूनच याचें ‘ बृहदीश्वर ’ असें नामकरण झालेलें आहे.

आख्यायिका अशी सांगतात, कीं इथलें शिवलिंग चोळ राजानें नर्मदेच्या प्रवाहांतून बाहेर काढून तें इथें आणलें. इथला नंदीहि शिवाबरोबर आणि

नर्मदेंतूनच आला. हा पाषाणनंदी हेंहि एक स्वयमेव कलाशिल्प आहे. हा इतका प्रचंड आहे, कीं उभ्या भारतांत याचा क्रमांक दुसरा लागतो. पहिला क्रमांक आहे लेपाक्षीच्या नंदीचा. हा म्हणे तिळातिळानें रोज वाढत चालला होता. त्याची ही वाढ अव्याहत चालली असती, तर अनवस्था प्रसंग गुदरला असता. पण जेव्हां त्याच्या पाठींत एक खिळा ठोकला गेला, तेव्हां त्याचें वाढणें आपोआप थांबलें.

तंजाऊर आणखी एका गोष्टीसाठीं प्रसिद्ध आहे अन् ती गोष्ट म्हणजे 'सरस्वती महाल' नांवाचें इथलें ग्रंथालय. अखिल भारतांत अद्वितीय ठरलेल्या या ग्रंथालयाची स्थापना महाराजा सरफोजीनें केली. याची ख्याति विशेषतः भूर्जपत्रांवर लिहिलेल्या प्राचीन ग्रंथांसाठीं आहे. असे ग्रंथ इथें २३००० आहेत. त्यांतले बरेचसे संस्कृत आहेत आणि थोडे प्राकृतहि आहेत. याशिवाय, छापलेले पण दुर्मिळ असलेले ग्रंथ सुमारें सात हजार आहेत. इथल्या ग्रंथांची सूचि डॉ. बर्नोल या पंडितानें करून ठेवली आहे. त्याच्या मतें इथलें पुष्कळसे ग्रंथ नायक अन् मराठे यांच्या तीनशें वर्षांच्या कारकिर्दींत संग्रहित झालेले आहेत. मोडी लिपींतलींहि बरीच पुस्तकें इथें आहेत. हें सरस्वतीचें विशाल मंदिर पाहिल्यावांचून तंजाऊरला गेलेल्या कोण्याहि माणसानें तिथून परत फिरूं नये.

## चिदम्बरम्

चिदंबरम् या क्षेत्राशींहि चोळांचा संबंध आहेच. इथलें मंदिरहि भव्यतेंत उणें नाहीं; पण 'शून्य जैसें वासगृह' तशी त्याची अवस्था आहे. मंदिर शिवाचें; पण गाभाऱ्यांत शिवलिंग पाहायचें तें मात्र कल्पनेनें. दक्षिणेंत पंचमहाभूतांच्या तत्त्वावर पांच शिवलिंगांची कल्पना बसवलेली आहे. त्यांतलें आकाशलिंग हें चिदंबरमूमध्यें येतें. आकाश म्हणजे अव्यक्त, निराकार! अतएव तिथलें शिवलिंगहि तसेंच! मंदिर आणि त्याचा प्राकार मिळून त्या वास्तूनें ३९ एकर जमीन व्यापलेली आहे. मुख्य मंदिराइतकींच प्राकारांतलीं इतर मंदिरेंहि दर्शनीय आहेत. ही सर्व वास्तुच स्थापत्यकलेचा एक मनोवेधी नमुना आहे.

सहस्रस्तंभ मंडप ही इथली आणखी एक स्थापत्यरचना होय. या मंडपावर छत नाहीं. उत्सवाच्या वेळीं फक्त तें चढवतात. इथल्या दुसऱ्या एका मंदिराला ' नाट्यशाळा ' असें नांव आहे. हिला ५६ कोरीव खांब आहेत. त्यावरच्चीं तीं कोरलेलीं चित्रें एकदां पाहिलीं तरी मनांत ठसतील. मंदिराच्या पूर्व-पश्चिम गोपुरांवर 'भरतनाट्यम्' मधल्या १०८ मुद्रांचें प्रदर्शन करणाऱ्या ज्या मूर्ति कोरलेल्या आहेत, त्या तर डोळे मिटून घेतले तरी पुढें नाचूं लागतील.

भगवान् शिवशंकर इथें नटराजाच्या रूपांत आणि नृत्याच्या पवित्र्यांत आपल्याला दर्शन देतो. इथल्या नटराजमूर्तींत शोभा, शक्ति आणि कला



**नटराज**

यांचा त्रिवेणीसंगम झालेला दिसतो. नटराजाला चार भुजा आहेत. पुढच्या डाव्या हाताला गजहस्त म्हणणात. कारण तो हत्तीच्या किंचित् उभारलेल्या

सोंडेप्रमाणें दिसतो. मागच्या डाव्या हातांत ज्वालायुक्त अग्नि आहे. पुढचा उजवा हात अभयमुद्रेंत असून मागच्यांत डमरू आहे. डावा पाय वर उचललेला आणि डाव्या हाताशीं समांतर उजवा पाय गुडघ्यांत वांकलेला. त्याच्याखालीं पालथा पडलेला अपस्मार पुरुष. नटराज त्याला दाबून टाकीत आहे. कारण तो दारुकावनांतल्या मुनींच्या अभिचार कृत्यांतून निर्माण झालेला कृष्णपुरुष आहे. नटराजाच्या उदराला भुजंग वेष्टन आहे. त्याच्या या नृत्यांत विश्वव्यापी ताल, लय आणि संगीत भरून राहिलेलें आहे. विश्वाच्या सृष्टि, स्थिति, संहार, तिरोभाव आणि अनुग्रह या पांचहि क्रिया या नृत्यांतून व्यक्त होतात, असें मूर्तिविज्ञानांतले पंडित सांगतात.

नटराजमूर्ति म्हणजे मूर्तिकलेला आलेलें एक अद्‌भुत पुष्प होय. तमिळनाडनें जगाला दिलेली ही एक अमोलिक देणगी आहे. चोळ युगांत दक्षिणेंतल्या मूर्तिकलेला जणूं पानोपानीं बहर आला. पाषाणांतून मूर्ति तर घडल्याच, शिवाय अष्ट धातूंच्या ओतीव मूर्तीहि घडूं लागल्या. आणि अशा अनेक मूर्ति घडतां, ओततां, कोणत्या तरी दिव्य क्षणीं कोण्यातरी कलाकाराला एक अलौकिक ‘ दर्शन ’ झालें आणि त्या दर्शनांतून नटराज निर्माण झाला. या नटराजाला आकृतिबद्ध करून तो कलाकारच नव्हे, तर साक्षात् मूर्तिकलेची कूसहि धन्य झाली !

## कांचीपुरी

कांची नगरी तर मोक्षदानी अशा सात पुऱ्यांमध्यें गणली गेली आहे. ‘ काशी कांची अवंतिका ’ अशा क्रमानें ती काशीच्या मांडीला मांडी लावून बसली आहे. पद्मपुराण, देवीभागवत, इत्यादि अनेक पुराणांतून कांचीचे उल्लेख येतात. त्यावरून आपल्याला कळतें कीं, पुराणें निर्माण होण्याच्या पूर्वीहि या क्षेत्राचा महिमा गाजत होता. काशी-कांची हे शिवाचे दोन नेत्र होत, असें ब्रह्मांडपुराणांत म्हटलें आहे. आजचें त्या स्थळाचें महत्त्व एक तीर्थ एवढेंच असलें, तरी इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकांत त्याला पल्लवांची राजधानी होण्याचा मान मिळाला होता. शिवाय तें एक महान् विद्यापीठहि होतें. साऱ्या भारतांतून शेंकडों विद्यार्थी तिथें अध्ययनासाठीं येत असत. तिथली विविध दर्शनांतली गुरुपरंपराहि पारंगत होती. तिथें ज्याच्या त्याच्या रुची-


प्रमाणें आस्तिक, नास्तिक सर्वप्रकारचीं दर्शनें पढवीत. पल्लव राजे जसे विद्येचे भोक्ते होते, तसेच अनाग्रहीहि होते. नास्तिक, जैन, बौद्ध, सनातन-धर्मी, कोणीहि असो; तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्यांच्याकडे पक्षपात नव्हता. त्यामुळें एकाच नगरींत सर्व धर्मांचीं विद्यापीठें नांदतांना दिसत. दक्षिण भारताच्या इतिहासाला अभिमानास्पद अशी ही गोष्ट आहे. पुढें तमिळनाड-मधले शैव संत आणि रामानुजांसारखे दार्शनिक आचार्य, यांच्या प्रभावानें कांचींतूनच नव्हे; तर साऱ्या दक्षिण भारतांतूनच जैन, बौद्धांचा उठावा झाला, ही गोष्ट अलाहिदा !

कांचीचे दोन भाग पडतात. शिवकांची आणि विष्णुकांची. शिवकांचींतलें प्रसिद्ध मंदिर कामाक्षीचें. या देवीची स्थापना आद्य शंकराचार्यांच्या हस्तें झालेली आहे. त्याआधीं कांचींत तांत्रिकांचा फार मोठा अड्डा होता. ते सगळे वाममार्गी होते. शंकराचार्यांनीं या शाक्त तांत्रिकांना तिथून पिटाळून लावलें आणि कामाक्षीची स्थापना करून श्रुतिस्मृति-प्रतिपादित अशी तिची पूजा-अर्चा चालू केली. याच कामाक्षीमुळें कांची हें एक शक्तिपीठ बनलें. कामाक्षी आणि शंकराचार्य यांच्याविषयीं इथें एक मजेदार आख्यायिका सांगतात—

कामाक्षी ही वायुरूपिणी रुद्र शक्ति होती. ती रोज रात्रौ कराल रूप धारण करून नगरसंचाराला निघे. ती ज्याच्या नजरेस पडे तो तिथेंच जीव घालवी. नुसत्या तिच्या छायेनें नायकामुळें अर्धमेलीं होत. त्यामुळें नगरजन भयभीत झाले. कांची ओस पडण्याची वेळ आली. कांहीं कालानें हें वर्तमान शंकराचार्यांना समजलें. मग जनतेच्या परित्राणासाठीं ते पुढें झाले. त्यांनीं कामाक्षीचें करुणस्तोत्र केलें. तें ऐकून ती प्रसन्न झाली आणि आचार्यांना 'वर माग' म्हणाली. आचार्यांनीं वर मागितला. 'देवि ! या उप्पर तूं माझ्या आज्ञेवांचून मंदिरांतून बाहेर निघतां कामा नये.' कामाक्षीनें तें मान्य केलें. तिचा संचार बंद झाला. त्यामुळें उपद्रवहि शमला. हे शंकराचार्यांचे कांचीवरचे उपकार आहेत. आजहि वार्षिक उत्सवाच्या वेळीं जेव्हां तिची नगरांत मिरवणूक निघायची असते, तेव्हां मंदिराचे महाजन तिथल्या शंकराचार्यांच्या मूर्तीपुढें उभे राहून आचार्यांची त्याविषयीं अनुज्ञा घेतात.

इथल्या एका शिवलिंगाचें नांव आहे, एकांबरनाथ. हें शिवलिंग पृथ्वी-तत्त्वाचें मानतात. इथल्या प्राकारांतच एक जुनाट आम्रवृक्ष आहे. असें सांगतात कीं, भगवती उमेनें या वृक्षाखालीं आसन घालून दीर्घकाल तपस्या केली होती. गोष्ट घडली ती अशी—

शिव-पार्वतींचा आवडता छंद म्हणजे सारीपाट खेळण्याचा. या खेळांत बहुधा भोळा सांब हरायचा आणि पार्वतीची जीत व्हायची. मग एखादे वेळीं त्या विजयोद्रेकांत पार्वतीला भान न राहून तिनें शिवाचा अपमान करायचा. अशा गोष्टी अनेक वेळां घडल्या असतील. पण एकदा मात्र



एकांबरनाथ – कांची

मस्करीची कुस्करी झाली. उमागौरी शंकराला कांहींतरी लागून बोलली आणि शंकरानें तिला शाप दिला, कीं ‘ तुझें सुंदर रूप काळें कुरूप होईल.’ रूप म्हणजे स्त्रीजातीचें मर्म ! त्यावरच घाव बसला, तेव्हां पार्वतीला परम दुःख झालें. शिवाय शंकर तिला सोडून गेला, ही आणखी दुःखावर डागणी !

या दुःखाच्या भरांत पार्वती तिथून निघाली ती सरळ कांचीला आली. शापमुक्त होऊन पुनश्च शिवाच्या अर्धांगीं विराजमान व्हायचें, तर त्यासाठीं

तप हाच एकमेव उपाय होता. या आम्रवृक्षाखालीं बसून तोच तिनें अवलंबिला. पार्वती दीर्घकाल तप करीत आहे, या घटनेनें शिवहि थोडासा डळमळलाच; पण तिची सत्त्वपरीक्षा घेतल्यावांचून तिच्यावर प्रसन्न व्हायचें नाहीं, असें त्यानें ठरविलें. त्यानें परीक्षेची म्हणून जी तऱ्हा शोधून काढली ती मात्र जीवघेणीच होती.

आपल्या जटेंतील गंगा काढून त्यानें ती कांचीवर लोटून दिली. तात्काळ त्या प्रदेशावर महापूर आला. पार्वती त्या पुराच्या वेढ्यांत सांपडली. तिच्या उपासनेचें शिवलिंगहि बुडण्याच्या बेतांत आलें. पण स्वतःच्या प्राणांची पर्वा न करतां तिनें तें शिवलिंग आपल्या हृदयाशीं घट्ट कवटाळून धरलें आणि ती तो महापूर आपल्या मस्तकीं घ्यायला सिद्ध झाली.

आणि त्याच क्षणीं तिची परीक्षा पूर्ण झाली. तो महापूर कुठल्या कुठें अदृश्य झाला आणि साक्षात् सदाशिव सुहास्य वदनानें तिच्यापुढें उभा राहिला. शिव-पार्वती दोघें उराउरीं भेटलीं. मग तिथें महापूर लोटला तो सुखाचा, आनंदाचा ! समस्त भक्तांनीं तिथें जमून शिवाची प्रार्थना केली, कीं 'तुम्हीं या ठिकाणीं आम्रवृक्षाच्या छायेंत कायमचें वास्तव्य करावें.' आणि त्या क्षणापासून शंकर तिथें 'एकांबरनाथ' या नांवानें सुप्रतिष्ठित झाला.

कांचीच्या विष्णुकांची या विभागांत अनेक विष्णुमंदिरें आहेत. त्या सर्वांत प्राचीन मंदिर वरदराजाचें आहे. हें मंदिर एका लहानशा टेकडीवर उभें आहे. मंदिराच्या भिंतीवर जसे अनेक लेख कोरलेले आहेत, तशींच श्रीविष्णूचीं अनेक रूपेंहि चित्रित केलेलीं आहेत. विजयनगरचे वैष्णवराजे या वरद-राजाचेच उपासक होते. त्यांनीं या देवाच्या पूजेअर्चेसाठीं अनेक गांवें दान दिलीं आहेत. वस्त्रभूषणें व इतर साहित्य दिलें आहे तें वेगळेंच. विष्णुकांचीला ब्रह्मदेवाचें तपःस्थान मानतात. रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाचें उगमस्थानहि हेंच होय.

## मदुरै

तमिळनाडमध्यें जो महिमा कांचीचा तोच मदुरेचाहि. मदुरा म्हणजे मीनाक्षीचें निवासस्थान.)दाक्षिणेंतलें हें एक मोठें शहर आहे आणि धर्मक्षेत्रहि आहे. रामकाळांत इथें राक्षसांची वस्ती होती, असें वाल्मीकीनें सांगितलें आहे.

हें नगर वैगाई नदीच्या तीरावर वसलें आहे. दक्षिण रेल्वेच्या मुख्य मार्गावर आणि मद्रासपासून सुमारें २५० मैलांवर तें आहे. मध्यभागीं मीनाक्षीचें मंदिर आणि त्याच्या चारी बाजूंना वस्ती, अशी त्या नगराची रचना आहे. मंदिराचा प्राकार विस्तृत असून चारी दारांवर चार गोपुरें आहेत. अनेक देवदेवता आणि संत-भक्त यांच्या सुंदर मूर्तींनीं हीं गोपुरें नखशिखांत अलंकृत झालेलीं आहेत.

देवस्थानाचे दोन भाग पडतात. एका भागांत मीनाक्षीनें आपला संसार थाटला आहे. तर दुसऱ्या भागांत तिचा प्रिय पति भगवान् सुंदरेश्वरम् उभा आहे. मीनाक्षीची मूर्ति भव्य आहे. तिच्या अंगावर जेव्हां बहुमूल्य वस्त्रालंकार चढवतात तेव्हां तिचें रूप झळाळून दिसतें. मंदिरापुढें महामंडप आहे आणि त्याच्या दक्षिण अंगाला तिचें शयनमंदिर आहे. मंदिराचें शिखर सुवर्णखचित असून समोर एक सुवर्णस्तंभहि आहे. मीनाक्षीच्या प्रदक्षिणेला निघालें, कीं त्या मार्गांत ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति, बलशक्ति, सुब्रह्मण्य, इत्यादि देवमूर्तींचें अधिक दर्शन घडतें.

मदुरा ही प्राचीन काळची पांड्यांची वैभवशाली राजधानी होय. त्यापूर्वीं हें ठिकाण कदंबवन म्हणून प्रसिद्ध होतें. तिथें सुंदरेश्वरमूचें स्वयंभू शिवलिंग होतें. स्वर्गसम्राट् इंद्र नित्य तिथें उतरून त्याची पूजा करी, असें सांगतात. ही घटना वनांतल्या वाटेनें जात असतां एका श्रेष्ठीनें पाहिली आणि कुल-शेखर पांड्य राजाला तिची खबर दिली. राजानें त्या कदंबवनांत सुंदरेश्वरमूचें मंदिर बनवण्याचा संकल्प केला आणि त्याच रात्रीं सुंदरेश्वरमूनें त्याला दर्शन दिलें. तो म्हणाला—

"माझं मंदिर तर तूं निर्माण करच; शिवाय तुझी राजधानीहि याच ठिकाणीं उभार. मी सर्परूपानं तुझ्यापुढें सीमा दाखवीत जाईन. माझ्या फिरण्यांत जेवढा भाग अंतर्भूत होईल, तेवढा तुझ्या राजधानीचा विस्तार समज."

सुंदरेश्वरमूनें स्वप्नांत सांगितलें तें प्रत्यक्षांतहि खरें करून दाखवलें. कुलशेखरानें मग तें कदंबवन तोडून तिथें आपल्या नव्या नगराचा पाया घातला.

मीनाक्षी ही मलयध्वज पांड्याची कन्या. साक्षात् उमा हैमवतीनें त्याच्या घरीं कन्यारूपानें अवतार घेतला. तिचे मासोळ्यांसारखे सुंदर नेत्र पाहून राजानें तिचें ' मीनाक्षी ' असें नांव ठेवलें. पुढें थोड्याच काळांत मलयध्वज स्वर्गवासी झाला. राज्याची धुरा त्याची राणी कांचनमाला हिच्यावर येऊन पडली. तिनें ती चांगल्या प्रकारें संभाळलीहि. पुढें मीनाक्षी वयांत आल्यावर राणीनें तिच्या लग्नाचे विचार सुरू केले. पण मीनाक्षी तिला म्हणाली—

" आई, लग्नाचं पुढें पाहूं. त्या आधीं मला दिग्विजय करायचा आहे. माझ्या वडिलांचं राज्य वाढवायचं आहें. मीं त्याबद्दल निर्धार केला आहे. या कार्यासाठीं तूं मला आशीर्वाद दे. "

कांचनमालेनें नाखुषीनेंच मीनाक्षीच्या महत्त्वाकांक्षेला संमति दिली. तिनें लगेच विजयप्रस्थान ठेवलें. अनेक देश पादाक्रांत करीत ती हिमालयापर्यंत जाऊन थडकली. तिथें तिला शिवदर्शन झालें. शिव म्हणजे तिचा पूर्वजन्मींचा प्राणेश्वर. त्याच्या दर्शनानें तिच्या अंतरांतल्या प्रणयभावांचे निर्झर उचंबळले. तिनें याहि जन्मीं शिवाचीच अर्धांगी होण्याचा निश्चय केला. शिवानें तिचें प्राणिग्रहण करण्याचें कबूल केलें. तो सुंदरेश्वरम्च्या रूपांत मदुरेला आला आणि पुढें एका सुमुहूर्तावर त्या दोघांचें लग्न झालें.

या मीनाक्षी–सुंदरेश्वरम् पाणिग्रहणाचें शिल्प दक्षिणेंत अनेक ठिकाणीं पाहायला सांपडतें. मदुरा हें मूर्तिकलेचें स्वयमेव प्रदर्शनच आहे. तिथले कलाकुसरीचे भव्य स्तंभ हें तर शिल्पकलेंतलें एक आश्चर्यच मानतात. मीनाक्षी ही मदुरेची स्वामिनी. आणि सुंदरेश्वरम् हा तिचा स्वामी. त्यामुळें या कलाक्षेत्रांत दोघांनाहि समान महत्त्व आहे. इथला तिरुमल नायकाचा राजवाडा हें मदुरेंतलें आणखी एक खास आकर्षण आहे.

मदुरेंत देवीचे अनेक उत्सव होतात; पण त्यांतल्या एका उत्सवाची कथा आवर्जून सांगितली पाहिजे. या उत्सवाचें नांव ' अवनिमूलम्. ' भाद्रपद मासांत मूळनक्षत्र येईल, त्यादिवशीं हा उत्सव होतो. उत्सवाची देवता निर्ऋति. हा एक लोकपाल असुर आहे. त्यामुळें त्या संपूर्ण महिन्यांत माणसें आसुरी वृत्तीनें पछाडलेलीं असतात; अशी समजूत. ही आसुरी वृत्ति नष्ट होऊन माणसांनीं धार्मिक बनावें, या हेतूनें या दिवशीं धर्मकृत्यें

करण्याची योजना केलेली आहे. या उत्सवाच्या उत्पत्तीची कथा सांगतात ती अशी—

प्राचीन काळीं अरिमर्दन पांड्य नांवाचा राजा मदुरेवर राज्य करीत होता. त्याच्या कारकिर्दींत एकदा अवर्षण पडलें अन् जवळची वैगाई नदी आटून गेली. लोकांना वाटलें, कीं राजानेंच कांहींतरी पाप केलें आणि त्यामुळें वृष्टिकर्ता इंद्र कोपला. पण पुढें एके दिवशीं अचानक मुसळधार वृष्टि होऊन वैगाईला महापूर लोटला. राजाला वाटलें, कीं याचवेळीं नदीला धरण बांधून सगळें पाणी त्यांत सांठवून ठेवावें म्हणजे पुढच्या अवर्षणांत माणसांची गैरसोय होणार नाहीं. त्यानें तशी दवंडी पिटली. 'घरटी एक माणूस धरणाच्या कामावर आला पाहिजे' असें फर्मान काढलें.

राज्यांत एक गरीब म्हातारी होती. ती पिठाचे पानगे विकून पोट भरी. आपल्या वांट्याचा मजूर कामावर पाठवायला तिच्या गांठीं दिडकीसुद्धा नव्हती. अशा वेळीं एक मजूर तिच्याकडे आला अन् म्हणाला, 'तुझे पानगे मला दे. मी ते खातों अन् तुझ्या वांटचें धरणाचें काम करतों!' म्हातारी कबूल झाली. मजूर तिचे पानगे घेऊन कामावर गेला. डोक्यावर टोपली अन् खांद्यावर खोरें अशा थाटांत स्वारी कामाला लागली. पण सूर्यास्तापर्यंत त्याला नेमून दिलेलें काम त्याच्या हातून पुरें झालें नाहीं. राजाकडे त्याबद्दल तक्रार गेली. राजानें त्याला पुढें बोलावून त्याच्या पाटीवर सपासप आसूड ओढले. पण परिणाम मात्र भलताच झाला. त्या फटक्यांचे वळ उठले ते सुंदरेश्वरम्‌च्या पाठीवर! सुंदरेश्वरम्‌चे पुजारी त्याबद्दल आक्रोश करीत राजाकडे आले. राजाला समजेना, कीं 'मार एका ठिकाणीं अन् वळ दुसऱ्या ठिकाणीं' असें अघटित कां व्हावें? त्यानें लगेच हात थांबविला. त्या मजुरानें लगेच मूठभर माती उचलून धरणावर टाकली आणि त्याच क्षणीं धरण पूर्ण झालें. तो मजूर अदृश्य झाला आणि पाठोपाठ आकाशवाणी घुमली—'राजा! ज्या मजुराला तूं फटकावलेंस तो साक्षात् सुंदरेश्वरम् होता. एका म्हातारीसाठीं तोच दिवसभर खोरें-पाटी घेऊन कामावर राबला होता!'

हा प्रसंग ज्या दिवशीं घडला, तो दिवस 'अवनिमूलम्'चा होता. त्या दिवसापासून मदुरेंत हा सण वैभवानें साजरा केला जातो. या दिवशीं

सोन्याची पाटी अन् सोन्याचें खोरें सुंदरेश्वरमूला समर्पून नंदीपासून मंदिरापर्यंत त्याची मिरवणूक काढतात आणि दिवसभर आनंदोत्सव करतात.

## श्रीरंगम्

दक्षिण भारतांतलें सर्वांत मोठें वैष्णव क्षेत्र म्हणजे श्रीरंगम्. हें तिरुचिरापल्लीच्या जवळ कावेरी नदीच्या दुबेळक्यांत एखाद्या बेटाप्रमाणें वसलें आहे. कावेरी जणूं दोन्ही भुजांनीं या क्षेत्राला कव घालून बसली आहे. इथलें श्रीरंगमंदिर दोन हजार वर्षांपूर्वीचें आहे. असें सांगतात. प्रथम तें केवळ मूर्तीपुरेसेंच होतें. पुढें वेळोवेळीं पांड्य, चोळ आणि नायक या राजांनीं या मंदिराचा चहूंबाजूंनीं विस्तार केला. आणि त्याला आजची विशालता प्राप्त झाली. या मंदिरानें एकूण २६६ बिघे जमीन व्यापली आहे. श्रीरंगम् हें सारें शहरच मंदिराच्या प्राकारांत वसलें आहे असें म्हटलें, तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. एकाच्या आंत दुसरा असे सात प्राकार मूळ मंदिराला वेढून राहिले आहेत. श्रीरंगाचें दर्शन घ्यायचें, तर हे सातहि प्राकार ओलांडावे लागतात. इथला देव श्रीरंगनाथ शेषशय्येवर पहुडला आहे. त्या श्यामवर्ण चतुर्भुज मूर्तीच्या नाभिकमलांतून ब्रह्मदेव वर आला आहे. मस्तकावर शेषानें आपलें पांच फणांचें छत्र धरलें आहे. पायालगत लक्ष्मी सेवाधर्म आचरीत आहे. तिथेंच जवळ बिभीषणाची मूर्ति आहे. शिवाय ' गरुड-हनुमंत पुढें उभे ' आहेतच. सारें शिल्प कसें भव्य गंभीर आणि टक लावणारें आहे. दक्षिण भारतांत श्रीविष्णूचें शेषशयनच विशेष लोकप्रिय दिसतें. इतरत्रहि अनेक ठिकाणीं याच प्रकारचीं शिल्पें पहायला मिळतात. हा श्रीरंगनाथ या ठिकाणीं कसा आला, कां वसला, यांविषयीं एक मनोवेधक आख्यायिका आहे—

श्रीरंगनाथाचा हा विग्रह प्रथम अयोध्येंत होता. इक्ष्वाकु या रामप्रभूच्या पूर्वजाला ब्रह्मदेवानें दिलेली ती देणगी होती. त्यामुळें तें त्या कुलाचें आराध्य दैवत बनलें होतें. रामचंद्रहि त्याची उपासना करी. लंकाविजय करून परत अयोध्येला आल्यानंतर रामप्रभूला राज्याभिषेक झाला. या मंगलप्रसंगीं बिभीषणहि तिथें आला होता. त्याची दृष्टि या मूर्तिविग्रहावर पडली आणि त्याचें मन वेधलें. त्यानें रामाकडे त्या मूर्तीची मागणी केली आणि

भक्तकामकल्पद्रुम अशा रामप्रभूनें ती त्यांला देऊन टाकली. विभीषण ती मूर्ति घेऊन लंकेला यायला निघाला; पण स्वर्गातल्या देवांना वाटलें, कीं ही मूर्ति लंकेंत म्हणजे राक्षसांच्या राज्यांत जातां कामा नये. देवांनीं तशी कारवाई केली आणि ती यशस्वीहि झाली. विभीषण कावेरीच्या तीरावर आला आणि मूर्ति भूमीवर ठेवून स्नानसंध्येला लागला. पण आपलें सगळें आन्हिक उरकून तो परत येतो, तों श्रीरंग जागच्या जागीं स्थिर ! विभीषण त्याला उचलूं शकला नाहीं. अशा प्रकारें श्रीरंग हा लंकावासी होण्याऐवजीं कावेरी-तीरनिवासी बनला. कायमचा तिथेंच राहिला.

इथें लक्ष्मीदेवीच्या समोर एक मंडप आहे. त्याचें नांव कंबमंडप. तमिळ महाकवि कंबन् यानें आपलें रामायण या मंडपांत बसून पंडितांना आणि रसिकांना ऐकवलें. इथूनच त्याचा तमिळनाडभर प्रसार झाला. या मंडपाला त्याचें नांव देऊन ती रामायणस्मृति इथें अजरामर केली गेली आहे. उत्तरेस जो महिमा काशीच्या विश्वेश्वराचा तोच दक्षिणेंत रामेश्वराचा. दोहोंमध्यें शतशत योजनांचें अंतर असलें तरी हीं दोन नांवें भारतीयांच्या अंतरांत जोडून जुळूनच येतात. यात्रा हा शब्द उच्चारला कीं, कोणीहि माणूस चटकन् म्हणतो, ‘ काशी-रामेश्वर ! ’ या दोन्ही यात्रांतला एक पूर्वापार संकेत आहे. रामेश्वराहून सेतु ( समुद्राची वाळू ) नेऊन काशींतल्या विश्वेश्वराला वहायचा अन् काशीची गंगा आणून तिनें रामेश्वराला स्नान घालायचें.

## रामेश्वरम्

रामेश्वर या सामासिक शब्दांतला ‘ ईश्वर ’ म्हणजे शिव हा समस्त द्राविड जातींचा सर्वश्रेष्ठ देव होय. रामप्रभूनें म्हणजेच एका आर्य पुरुषो-त्तमानें त्याला आपलाहि देव मानून स्वहस्तें त्याची इथें स्थापना केली. अगस्त्य आणि परशुराम हे दक्षिणेंत आर्यसंस्कृतीची पताका घेऊन जाणारे अग्रदूत होत. त्यांनीं जो पाया घातला, त्यावर रामप्रभूनें ऐक्याचा कळस चढविला. रामाच्या ‘ अयना ’नें आर्य-द्रविड यांचा सांस्कृतिक एकात्मभाव पक्का झाला. रामानें भारत ‘ आसेतुहिमाचल ’ करून टाकला.

रामेश्वर म्हणजे रामानें स्थापलेलें शिवलिंग. रामानें लंकेवर विजय मिळवला खरा; पण त्या आनंदापेक्षां आपण रावणाला म्हणजेच एका ब्राह्मणाला मारलें आणि 'ब्रह्महत्या' या महापातकाचे धनी झालों, हें दुःखच रामाच्या अंतराला जाळूं लागलें. समुद्रतीरावर ऋषि-मुनि जेव्हां त्याच्या दर्शनाला गेले, तेव्हां त्यांना रामप्रभूचें मुखमंडल खिन्न आणि उदासच दिसलें. ऋषींनीं विचारलें, कीं 'प्रभो, दुःख कशाचें?' रामानें त्यावर आपली मनोव्यथा त्यांना निवेदिली. ऋषींनीं त्याला ब्रह्महत्यानिरसनाचा हमखास उपाय सांगितला.

"रघुकुलभूषणा! तूं इथें या सागरतीरावर लिंगस्थापना करून त्याची पूजा कर. ब्रह्महत्या नक्की दूर होईल!"

रामानें तें मान्य केलें. ऋषींनीं शुभ मुहूर्त काढून दिला. हनुमान् कैलासावरचें लिंग आणण्यासाठीं गगनमंडलांत झेंपावला. पण मार्गांत कांहीं विघ्न आल्यामुळें तो मुहूर्ताच्या वेळीं लिंग घेऊन येऊं शकला नाहीं अन् त्यामुळें रामप्रभु हिंपुटी होऊन बसला. त्यावेळीं नेमकी सीतामाई पुढें आली. तिच्या हातीं एक घाटदार वालुकालिंग होतें. तें पुढें करून ती रामाला म्हणाली.

"आर्यपुत्र, हें घ्या! याची स्थापना करून मुहूर्त साधा!"

आणि मग समस्त जनतेच्या जयघोषांत आणि ब्राह्मणांच्या मंत्रघोषांत रामेश्वराची स्थापना झाली.

रामेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक अन् चार धामांतलें 'दक्षिण धाम' आहे. काशीप्रमाणेंच रामेश्वरालाहि बारा महिने यात्रिकांचा प्रवाह चालू असतो.

रामेश्वर हें बंगालच्या उपसागरांतलें एक बेट आहे. ११ मैल लांब आणि ७ मैल रुंद. इथलें मूळचें मंदिर लहानसें आणि सामान्यच आहे; पण पुढें अनेक राजांच्या भक्ति-प्रेमानें त्या मंदिराची अवस्था 'वाढतां वाढतां वाढे' अशी झाली. काशीचें विश्वेश्वर मंदिर रामेश्वराशीं तुळूं जातां अगदींच लघु अन् नगण्य वाटतें. रामेश्वराला सभोंवतीं २० फूट उंचीचा कोट आहे. चार सिंहद्वारें आहेत. त्यावर मूर्तिखचित गोपुरें आहेत. शेजारचे उंच उंच माडहि या गोपुरांपुढें थिटे वाटतात. मंदिराच्या महाद्वारांतून आंत शिरल्या-

वर दहा–बारा मिनिटें चालत राहावें, तेव्हां कुठें मुख्य मंदिराच्या पायरीला पाय लागतो. कोरीव खांबांच्या कमानींतून हा मार्ग जातो. दुतर्फा भिंतीला लागून मूर्तींच्या पंगती बसवलेल्या आहेत. त्या मूर्ती कशा अन् कोणकोणत्या देवांच्या, हा एक अभ्यासाचा स्वतंत्र विषय होऊं शकेल. असें वाटतें, कीं या देवस्थानांत माणसांपेक्षां मूर्तींचाच भरणा अधिक आहे.

रामेश्वरासमोर एक सुवर्णस्तंभ आहे. त्याच्या शेजारींच शिवाचा नंदी ठाण मांडून बसला आहे. हें प्रस्थहि कांहीं सामान्य नाहीं. तें चांगलें १३ फूट उंच अन् ९ फूट लांब रुंद आहे.

हें देवस्थान ‘ बडा घर ’ तर आहेच; पण ‘ पोकळ वांसा ’ मात्र नाहीं. हा रामेश्वर इथें कौपीनवंत नसून श्रीमंत आहे. उत्सवांतल्या मिरवणुकीच्या वेळीं जेव्हां मणावारी सोन्याचा पिवळा झळाळता नंदी रथावर उभा राहून शिवपार्वतींच्या हिरेजडित सुवर्णमूर्ति आपल्या पाठीवर वाहातो, तेव्हां तिथल्या श्रीमंतीची कल्पना येते. कोणत्या ना कोणत्या उत्सवाशिवाय इथें एकहि आठवडा सुना जात नाहीं. कुठें रामेश्वर अन् कुठें महाराष्ट्र ! पण इथें रामेश्वराचे पुजारी महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत, हें समजून आश्चर्य वाटतें.

## कुंभकोणम्

तामिळनाडमधलें कुंभकोणम् हें नगर दक्षिणेंतल्या प्राचीन नगरांतलें एक आहे. विशाल मंदिरें आणि महामखम् सरोवर यासाठीं त्याची प्रसिद्धि आहे. हें तंजाऊर जिल्ह्यांत कावेरीच्या तीरावर वसलें आहे. सातव्या शतकांत या ठिकाणीं चोळांची राजधानी होती. दक्षिणेंतल्या ब्राह्मणी संस्कृतीचें हें माहेरघर होतें. याला तमिळनाडचें बौद्धिक केंद्र समजत. इथें शंकराचार्यांच्या कामकोटि पीठाचा मठ आहे. या मठांत अमूल्य अशा हस्तलिखित संस्कृत ग्रंथांचा फार मोठा संग्रह आहे. इथें शिवाचीं बारा आणि विष्णूचीं चार मंदिरें आहेत. भारतांत ब्रह्मदेवाचीं मंदिरें हाताच्या बोटावर मोजण्याइतकींच जेमतेम सांपडतात. त्यांतलें एक कुंभकोणमूला पाहायला मिळतें.

इथलें सुप्रसिद्ध मंदिर सारंगपाणींचें. याचा आकार आणि ढंग दोन्ही दर्शनीय आहेत. याचें गोपुर एकशें सत्तेचाळीस फूट उंच असून त्याला बारा

मजले आहेत. छतावर मनोरम मूर्ती कोरलेल्या आहेत. सारंगपाणीच्या उत्सवाचा लांकडी रथ आहे, तो जणूं लहानशी टेकडीच वाटतो. त्यावरचें नक्षीकाम पाहात राहावें असें आहे. मदुरेच्या नायक राजानें हें मंदिर निर्माण करून ठेवलें. या मंदिरांत लक्ष्मी-सहित श्रीविष्णूचा निवास आहे. हें वैकुंठींचें दांपत्य इथें कां आलें, याविषयीं एक दंतकथा सांगतात—

हेम नांवाचा एक ऋषि श्रीविष्णूच्या कृपेसाठीं इथें अखंड तप आचरीत बसला होता. विष्णूला वाटलें, कीं हा प्राणी आपल्यासाठीं देह कष्टवीत नसून लक्ष्मीसाठीं हें सारें करतो आहे. म्हणून त्यानें लक्ष्मीला म्हटलें, कीं 'तूं जा खालीं आणि बघ काय त्याला हवें तें!' लक्ष्मीनें ती आज्ञा मानली. जवळच्च महामखम् सरोवर होतें. त्यांतून ती एका बालिकेच्या रूपानें वर आली. रांगत रांगत हेम ऋषीला येऊन बिलगली. त्या दिव्य कन्येला पाहून हेम ऋषीला वाटलें, कीं आपल्या तपाला मिळालेलें हें नाजुक गोंडस आणि सुंदर असें फळच आहे. त्यानें तिला आपल्या आश्रमांत आणून वाढवलें. तिचे खूप लाडहि केले. लक्ष्मीलाहि आपल्या धर्मपित्याचा लळा लागला. लक्ष्मी तिथेंच रमली. पण इकडे तिच्या विरहाच्या झळांनीं विष्णु मात्र वैकुंठांत कासावीस होऊं लागला. वरींच वर्षें त्यानें तिच्या परतीची वाट पाहिली आणि ती परत येत नाहीं अशी खात्री झाल्यावर विष्णुच स्वतः खालीं उतरून आला. मग इथें लक्ष्मीशीं त्याचें दुसऱ्यांदा लग्न लागलें. पहिलें समुद्रमंथनाच्या नंतरचें आणि दुसरें हें हेमऋषीच्या आश्रमांतलें. त्या दिवसापासून त्या लक्ष्मी-नारायणांनी तिकडच्या भक्तांसाठीं इथेंच कायमचें वास्तव्य केलें.

इथलीं शिवमंदिरें वैष्णवांच्याहि आधीचीं आहेत. त्यांतलें कुंभेश्वराचें मंदिर तर सर्वांत प्राचीन आहे. हा कुंभेश्वर या ठिकाणीं कसा आला आणि त्याला हें नांव कां मिळालें, याविषयींची कथा पेरियपुराणांत दिलेली आहे—

जेव्हां सृष्टीचा प्रलयकाल ओढवला, तेव्हां ब्रह्मदेवाला चिंता उत्पन्न झाली. त्याला वाटलें कीं, प्रलय जळांत सर्व वस्तूंचा बीजासहित विनाश झाल्यावर पुनश्च कशाच्या आधारावर सृष्टि निर्माण करायची? ही शंका त्यानें शिवापुढें जाऊन मांडली. शिवानें त्याला उपाय सांगितला.

"मातींत अमृत मिसळून तूं तिचा एक घडा बनव. त्या घड्यांत सृष्टींतलीं सर्व बीजें घालून ठेव. घड्याच्या मुखावर आंब्याचा टाळा आणि नारळ ठेव. हा घडा मेरुपर्वतावर उंच जागीं टांगून ठेव. पुढचं सर्व आपोआप ठीक होईल."

ब्रह्मदेवानें तसें केलें. हळू हळू चहूंबाजूंनीं सप्त सागर खवळले. हां हां म्हणतां जगबूड झाली. मेरुपर्वतहि त्या महाप्रलयांत गडप झाला आणि त्यावरचा बीजघट जळावर तरंगत, तरंगत वाहूं लागला. वाहात वाहात तो इथवर आला. मग शंकर भिल्लवेषानें इथें प्रकट झाला. त्यानें बाण मारून तो घडा फोडला. त्यांतून अमृत वाहूं लागलें आणि तिथें एक मोठा तलाव बनला. या प्रसंगाची आठवण म्हणून शिवानें इथें स्वहस्तें एक लिंग स्थापलें आणि त्याला 'कुंभेश्वर' असें नांव दिलें. त्या दिवसापासून या क्षेत्राला महत्त्व प्राप्त झालें.

कुंभकोणमूचें हें महामखम् सरोवर वीस बिघे जमीन व्यापून राहिलें आहे. या सरोवराच्या चारी अंगीं विशाल आणि सुंदर मंडप उभारलेले आहेत. दरवर्षी माघ महिन्यांत इथें उत्सव होतो आणि त्यावेळीं कुंभेश्वराची स्वारी मंदिरांतून बाहेर निघून जलाशयांत स्नानाला येते. देवाबरोबरच शेकडों, हजारों भक्तहि या प्रसंगीं इथें डुबकी मारतात. दर बारा वर्षांनीं गुरु सिंह राशीला आणि मघा नक्षत्रांत येतो, तेव्हां या सरोवराचा महोत्सव साजरा केला जातो. तामिळ लोक या उत्सवाला 'मामांकम्' असें म्हणतात. हरिद्वारच्या कुंभमेळ्याच्या खालोखाल हा महामखम्चा मेळा असतो. त्या अवसरीं गंगा नदी आणि इतर पवित्र नद्या या सरोवराच्या पाण्यांत येऊन मिसळतात, अशी लोकांची धारणा आहे.

## कन्याकुमारी

तामिळनाडमधलें अगदीं दक्षिण टोकाचें महातीर्थ म्हणजे कन्याकुमारी. जिथें नदीला नदी भेटते तिथें तो संगम पुनीत वाटतो. जिथें नदी सागराच्या कुशींत शिरते, तिथें तें दृश्य गंभीर बनतें. पण जिथें समुद्रच समुद्राला खेंव देतो, तिथें तर सारें अद्भुताचेंच साम्राज्य! इथें दोन नव्हे;

तर तीन सागर ब्रह्मा-विष्णु-महेशांप्रमाणें एकमेकांना उराउरीं भेटले आहेत. बंगालचा उपसागर, अरबी समुद्र आणि हिंदी महासागर अशा तिन्ही सागरांचें खारें पाणी इथें एकत्र मिळतें अन् एकमेकांत कालवतें. इथल्या लाटा तिन्ही घरचें पाणी पोटांत घेऊन उठतात आणि किनाऱ्याच्या अंगानें पाठशिवणीचा खेळ खेळतात.



कन्याकुमारीचें विहंगम दृश्य

पौर्णिमेच्या प्रदोषकाळीं मावळतें सूर्यबिंब पश्चिमसागरांत बुडत आहे अन् त्याच वेळीं पूर्व सागरांतून पूर्ण चंद्र सुख्या अंगानें वर येत आहे, हें दुर्मिळ अन् तितकेंच शोभन दृश्य भारतांत फक्त याच ठिकाणीं पाहायला सांपडतें.


अशा जागीं भारताच्या ऋषिमुनींनीं एखादें क्षेत्र निर्माण केलें नसतें, तरच नवल !

देवांना संकटमुक्त करण्यासाठीं साक्षात् पार्वतीला कन्या बनून इथें यावें लागलें. कारण बाणासुराला शिवाचें वरदान होतें, कीं ‘कुमारी कन्येव्यतिरिक्त तुला दुसऱ्या कोणाच्याहि हातून मृत्यु येणार नाहीं!’ त्यामुळें बाणासुर माजला. देवराज्यालाहि पीडा देऊं लागला. मग देवांनीं इथें यज्ञ केला. त्या यज्ञांतून कुमारी प्रगटली. पण तिला ओढ होती ती शिवाची. आपल्या पाठोपाठ शिवानेंहि इथें येऊन आपल्याशीं लग्न करावें अन् दोघांनीं इथें सागर-

संगमावर संसार थाटावा, यासाठीं ती आतुर झाली होती. शिव या गोष्टीला कबूलहि झाला होता. पण आपल्या स्वार्थासाठीं देवानीं त्या कार्यांत बिब्बा घातला. शिव निघाला; पण तिच्यापर्यंत पोंचूं शकला नाहीं. अद्यापहि तो 'शुचिंद्रम्' इथेंच तळ देऊन आहे, पण पुढें मात्र येत नाहीं. आणि त्यामुळें ही कन्या अजून कुमारीच राहिली आहे. असें आहे हे या कुमारीचें दैव !

इथलें तिचें मंदिर अन्य देवस्थानांप्रमाणेंच भव्य अन् प्रशस्त आहे. कमानी, खांब, तुळया, गवाक्षें, सगळीकडे शिल्पकलेची नाजुक खुलावट आहे. तिच्या सभोंवतीं दीपज्योती सदैव तेवत असतात अन् त्यामुळें तिच्या सौंदर्याला, स्निग्ध प्रकाशाची तुकतुकी येते. तें सगळेंच दृश्य नयनमनोहर वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 26305 वि: ...
क्रमांक 2-92 नों दि 15/991





# नाट्य-नृत्य-उत्सव

महाराष्ट्रानें नाट्यसंस्थेची शंभरी कांहीं वर्षांपूर्वींच साजरी केली. पण तमिळनाडूला आपल्या नाट्यसंस्थेचा तो सोहळा करायला अजून पंचवीस वर्षांचा अवधि आहे. तमिळ रंगभूमि ही आजामितीस सुस्थिर अशी कला-संस्था बनली आहे. तिचा आंतर्बाह्य विकासहि होत आहे. पण गेल्या साठ वर्षांपूर्वी ती अगदींच प्रथमावस्थेंत होती. तिथून तिला आजचा प्रगतीचा टप्पा गांठायला पुरीं पांच तपें लागलीं. तमिळ देशांत प्राचीन काळीं नाटक नांवाची चीज होती कीं नाहीं, याचा शोध अजून लागलेला नाहीं. प्राचीन नाटकांचा लहानसा तुकडाहि तमिळ भाषेंत आढळत नाहीं.

गेल्या शतकाच्या अखेरीस तमिळनाडमध्यें नाटकाची पहिली नांदी म्हटली गेली. पण या नवजात नाट्यकलेला बाळसें यायला बराच काळ लागला. नाटक आणि नाटकमंडळ्या यांच्याविषयीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत जी मनोवृत्ति होती, तीच तमिळनाडमध्येंहि होती. नाटक ही कला खरी; पण तिचा दर्जा निकृष्ट समजला जाई. नाटकी लोकांकडे पाहाण्याची दृष्टिहि तिरस्काराची असे. प्रतिष्ठित समाजांतले नीतीचे मक्तेदार आपल्या मुलांना नाट्यकलेच्या वाऱ्यालाहि उभें राहूं देत नसत. गांवांत नाटक व्हायचेंच; तर तें महारवाड्यासारखें गांवाबाहेर.

हीं पहिलीं नाटकें आपल्याकडच्या दशावतारी पद्धतीचीं असत. चार फळ्या फळकुट्या टाकून वीत दोन विती उंचीचा रंगमंच उभा करीत.

उजेडासाठीं मोठ्या परातींत तेल-वात करून त्या दोन बाजूंना दोन ठेवीत. नाटक आभाळाच्या मांडवाखालींच चाले. प्रेक्षक एकमेकांना खेटून असत. प्रेक्षकांचे वर्ग असे नव्हतेच. त्यामुळें उच्चभ्रू लोक अशीं नाटकें बघण्याचें टाळीत. ही झाली खेड्यापाड्यांतली गोष्ट. पण शहरांत म्हणून कांहीं निराळी व्यवस्था होती असें मुळींच नाहीं. एखाद्या रिकाम्या बखळींत त्यांचा संसार उभा राहायचा. वर छप्पर असलें तर असलें ! नाटक प्रहर रात्रीनंतर सुरू व्हायचें, तें उजाडेपर्यंत चालायचें.

या नाटकाच्या दर्जाचा विचार न केलेलाच बरा ! ज्याला कोणाला हातवारे करायची लकब आणि आरडाओरडा करण्याची ताकद असेल, तो अभिजात नट. नाटक मुळीं लिहिलेलें नसेच. त्यामुळें पाठांतराचा प्रश्नच नव्हता. पात्र प्रसंगानुरूप अस्खलित बोललें, कीं काम फत्ते ! वेषभूषा नित्याचीच. खालच्या थरांतला हा गरीब नटवर्ग कौरव-पांडवांच्या दरबारांतले भरजरी पोषाख आणील कुठून ! जेमतेम राजा-राणीचे कपडे तेवढे जरीचे मिळाले, कीं डोक्यावरून पाणी ! पुष्कळदा त्या भरजरी वस्त्रांचींहि लक्तरें लोंबतांना दिसायचीं. रंगभूषा सगळ्या नटांची सारखी. तोंड रंगवायचें म्हणजे हळद आणि इतर कांहीं उटणें यांचें मिश्रण करून तें तोंडाला फासायचें. दाढी मिशांसाठीं तेलांत लावलेली कोळशाची भुकटी. पात्रें फक्त आपला चेहरा तेवढाच रंगवीत. त्यामुळें चेहरा तेवढा गोरा. आणि बाकीच्या शरीराचा वर्ण जन्मजात जो असेल तो !

नाटकाचे विषय पौराणिक असत. हरिश्चन्द्र, कोवलन, सावित्री, राम-रावणयुद्ध, द्रौपदी-वस्त्रहरण या आख्यानांवर नाटकांची उभारणी करीत. ‘ दंभाचारी विलासम् ’ अशासारखें एखादें सामाजिक नाटक क्वचितच पाहायला मिळे. सगळीं नाटकें संगीत असायचीं. साध्या सेवकानेंसुद्धा पद हें म्हणायलाच हवें. रावण पद म्हणूं लागला कीं, त्याच्या शेजारीं उभा असलेला कुंभकर्ण खुशाल रंगपटांत निघून जाई आणि ‘ विडी पान ’ ओढून पद संपायच्या वेळीं परत रंगभूमीवर येई. पद संपलें कीं, भाषण आणि भाषण संपलें कीं पद, अशी ही चक्री चालायची. बहुतेक सगळे नट अशिक्षित. त्यामुळें त्यांचे संवादहि ग्राम्य आणि अशुद्ध असत. आपल्या इकडचे

तमासगीर ज्या दर्जाची मराठी भाषा बोलतात, तोच दर्जा त्यांच्या भाषेचा. त्याकाळचा नाट्यव्यवसायच मुळीं खालच्या थरांतल्या लोकांच्या हातीं होता. रंगभूमीचा विकास व्हावा, असें कोणाहि सुशिक्षित व्यक्तीला वाटत नव्हतें. आणि वाटलें तरी त्या बाबतींत पाऊल पुढें टाकण्याचा धीर होत नव्हता.

पण गेल्या शतकाच्या अखेरीस असा एक नाट्यवीर त्या भूमींत जन्माला आला. त्या रसिक आणि शिक्षित गृहस्थानें नाट्यकलेच्या उत्कर्षासाठीं कंबर कसली आणि 'निंदा-स्तुतिवर लावुनी काठी' निर्भय-पणें पुढें पाऊल टाकलें. पी. संबंध मुदालियार हें या गृहस्थांचें नांव. यांना पुढें रावबहादुर असा किताबहि मिळाला आहे. त्यांनीं 'सगुण विलास सभा' नांवाची नाट्यसंस्था स्थापन केली आणि तमिळनाडमध्यें नव्या नाटकाचा पाया घातला. श्री. मुदालियार हे नट आणि नाटककार अशा दोन्ही अधिकारांनीं गाजले. कुशल दिग्दर्शक म्हणूनहि त्यांनीं कीर्ति मिळवली. नाट्याची आवड असलेले कैक सुसंस्कृत तरुण त्यांनीं आपल्या भोंवतीं गोळा केले, त्यांना आधुनिक नाट्यकलेचें योग्य शिक्षण दिलें आणि त्यांच्याकरवीं अखंड लोकरंजन केलें. सगुण विलास सभेच्या पहिल्या पंचविशींतच तिनें कीर्तीचा जयस्तंभ रोवला. तमिळनाडमध्येंच नव्हे; तर केरळ आणि लंका या देशांतहि तिनें दौरे काढले. तिचें अनुकरण मग आणखी बऱ्याच नाट्यसंस्थांनीं केलें. जुन्या धंदेवाईक नटांनींहि त्यांच्या देखरेखीनें आपला विकास घडवून आणला.

पण महाराष्ट्रांत पंधरा वीस वर्षांपूर्वीं नाटकमंडळ्यांच्या बाबतींत जें घडलें त्याचीच आवृत्ति तमिळनाडमध्येंहि निघाली. दोन्हीं ठिकाणीं बोलपटसंस्था ही नाट्यकलेची वैरी आणि विघातक ठरली. प्रेक्षक जसे चित्रपटगृहाकडे धावूं लागले, तसेंच नाटकांतले नटहि रंगभूमिला लाथ मारून सिनेमा स्टूडिओच्या भोंवतीं आशाळभूतपणें घिरट्या घालूं लागले. तमिळ रंगभूमि ओसाड, भकास तर झालीच; पण ती कायमचीच निजधामाला जाते कीं काय, अशीहि भीति उत्पन्न झाली.

दहा बारा वर्षें तिचा हा अज्ञातवास चालू होता. पण १९४७ सालीं भारताचें स्वातंत्र्य दुमदुमत आलें आणि मग सगळ्याच कळा पालटल्या.

त्यानंतर नाट्यसंस्थेच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न जारीनें सुरू झाले. चित्रपटहि प्रेक्षकांना कलेचा समग्र आनंद देण्याच्या कामीं अपुरे ठरले. रंगभूमीचा त्याग करून सिनेमाच्या दारीं मुरकुंड घालणाऱ्या नाटकी नटांचाहि भ्रम-निरास झाला. ते परत आपल्या जुन्या वटवृक्षाच्या सावलीला आले. जागो-जागीं नाट्यसंस्था निर्माण होऊं लागल्या. कांहीं वजनदार नाट्यप्रेमी गृहस्थांनीं मद्रास सरकारला नाटकावरचा कर रद्द करायला भाग पाडलें. त्यामुळें तमिळ रंगभूमीवर आजमितीस होतकरू आणि जिद्दीचे तरुण लोकाराधना करतांना दिसत आहेत. तमिळरंगभूमि त्यांच्या आधारें आज आपलें क्षेत्र वाढवीत आहे. सरकारचाहि तिला पाठिंबा लाभला आहे. पुढचें तिचें भविष्य आज कोण सांगणार !

तमिळ नाट्याची गंगोत्री कुठें आहे तिचा शोध घेऊं गेल्यास एका प्राचीन नृत्य-नाट्याचें नांव घ्यावें लागतें. या नृत्याचें नांव आहे 'कुरवंजी.' या नांवांतला 'कुरव' शब्द एका जमातीचें नांव दर्शवितो. कुरव किंवा कुरवर ही तमिळनाडमधली एक प्राचीन जमात आहे. हे लोक प्राचीन काळापासून नृत्याचे छंदी–फंदी ! तो त्यांचा जोडधंदा होता म्हटलें तरी चालेल. जिथें जिथें जत्रा भरेल, तिथें तिथें हे लोक न चुकतां हजर होत. जत्रेंतल्या लोकांना आपलें मुक्त बेहोष नृत्य दाखवून ते चांगली कमाई करीत.

'कुरवंजी' हें एकट्याचें 'एकाकी' नृत्य असे. पावलांची करामत आणि अंगविक्षेप हा त्यांतला महत्त्वाचा भाग. पुढें हळू हळू त्यांत प्रगति होऊं लागली. एकाऐवजीं दोघे चौघे समूहानें तें नृत्य करूं लागले. नाचायचें तर सोंग सजवून नाचलेलें अधिक बरें, अशीहि त्यांत पुढें सुधारणा झाली. हळू हळू पात्रानुरूप अभिनयहि आला. त्यांतच पुढें संगीताचाहि शिरकाव झाला. अशाप्रकारें त्याला साग्रसंगीत नाट्याचें स्वरूप प्राप्त झालें. कुरवंजीचे पद्धतशीर प्रयोग होऊं लागले. संस्कृत नाट्याप्रमाणें त्यांनीं सूत्रधार आणि नटी यांचाहि स्वीकार केला. त्यांचें तमिळ नांव 'सिंगड्ड' आणि 'सिंगी.' हीं दोघें प्रथम रंगभूमीवर प्रवेश करीत. पद्यें गाऊन पुढील नृत्य–नाट्य प्रसंगाचा उपक्रम करणें हें यांचें काम असे. संस्कृतांतला विदूषकहि 'कोणंगी'

या नांवानें त्या नाट्यांत दाखल झाला. अरबट चरबट बोलून आणि वेड्या वांकड्या उड्या मारून प्रेक्षकांत हास्याचा खळाळ उत्पन्न करणें हें या कोणंगीचें काम !

हेंच नृत्य–नाट्य पुढें तमिळनाडमधल्या देवदासींनीं उचललें. त्यांनीं संवादात्मक नाट्य तेवढें बाजूला ठेवून बाकी सर्व गोष्टींचा स्वीकार केला. त्यांतूनच पुढें एका महनीय नृत्यकलेनें जन्म घेतला तिचें नांव आहे 'भरतनाट्यम् !'

## भरतनाट्यम्

भारतांतल्या कोणत्याहि रसिकाला भरतनाट्यम् हा शब्द आतां अपरिचित नाहीं. भारतांत जे चार, पांच विदग्ध असे नृत्यसंप्रदाय आहेत, त्यांत भरतनाट्यमूची प्रामुख्यानें गणना होते. कलामहर्षि भरतमुनि याच्या नाट्यनियमांना अनुसरून याची बांधणी अन् उभारणी झालेली असल्यामुळें या नृत्याला 'भरतनाट्यम्' हें नांव दिलें गेलें. कोण्यातरी प्राचीन काळीं भारतांत सर्वत्र या नृत्याचा प्रसार असावा, असें अनुमान करतां येतें.

मात्र आजमितीच्या भरतनाट्यमूवर दक्षिण भारताची, विशेषतः तमिळ-नाडचीच अव्यक्त नामसुद्रा कोरलेली आढळते. आजची ही कला म्हणजे तमिळनाडनें भारताला समर्पिलेली मनोहारी अशी देणगी आहे. तंजाऊर जिल्ह्यांत भरतनाट्यमूनें मूळ धरलें. तिथें त्या संप्रदायाची स्थापना झाली. तिथल्या राजसत्तेकडून त्याला आधार आणि पोषण मिळालें. आणि मग तिथून सगळ्या तमिळनाडमध्यें त्याचे शाखापल्लव विस्तारले. दक्षिणेंत ही नृत्यकला देव आणि धर्म यांच्या अंगानें निर्माण झाली आणि मंदिर-संस्थेच्या आश्रयानें वाढली. हें नृत्य तिथल्या देवांच्या राजोपचारांचा एक भाग म्हणूनच सुरू झालें.

पूजा आणि महोत्सव यांच्या प्रसंगीं दक्षिणेंतल्या देवदासी हें नृत्य करून देव आणि भक्त यांना रिझवीत. दक्षिणेंत दोन हजार वर्षांपासून 'देवदासी' या नांवानें नर्तकींची एक जात तिकडच्या मंदिरसंस्थेशीं संबद्ध आहे किंवा

त्या संस्थेची एक घटकच आहे. शिलप्पधिकारम् या महाकाव्यांतली माधवी ही पुहार नगरींतली देवदासीच होती. देवस्थानांत जसा पुजारी, अभिषेकी, पुराणिक, चौघडेवाला, तशीच देवदासी. इतरांप्रमाणेंच तिलाहि देवस्थानांतून ठराविक उत्पन्न मिळायचें हा पूर्वापार शिरस्ता ठरलेला आहे. या देवदासींचा पुढें विशिष्ट वर्ग निर्माण झाला. त्यांनीं पोटाची चिंता न करतां कलेची साधना करावी आणि देवापुढें नृत्य करून भक्तांचें, रसिकांचें रंजन करावें, हें या देवदासीवर्गाचें नियत कर्म ठरलें.



देवदासी

त्या काळच्या देवदासी आपली कला सर्वांगपरिपूर्ण व्हावी, रोमरोमांतून ती प्रकटावी म्हणून अविश्रांत परिश्रम करित. त्या जणूं देहासह आपला आत्माच कलेला आणि देवाला वाहून टाकीत. त्या फक्त देवासमोरच गात आणि नाचत. आपल्या कलेचें पावित्र्य अबाधित राहावें, याबद्दल त्यांचा कटाक्ष असे. ज्या कोण्या रसिकाला नृत्य पाहायचें असेल, त्यानें देवालयांत देवापुढें बसूनच निर्मळ मनानें तें पाहावें. अशा कांहीं असामान्य गुणवती नर्तिका तामिळ महाकाव्यांतून आपल्याला भेटतात.

पण कालांतरानें या नृत्यांतली ही परिशुद्ध भावना हळूहळू झिरपून गेली. त्याच्यावरचें धार्मिक कवच फुटलें आणि त्याचें मूळ आध्यात्मिक अंतरंग गढूळ झालें. विश्वांतले अव्यक्त असे दिव्य भाव हस्तमुद्रांच्या द्वारें

खेंचून आणून रसिकांच्या हृदयांत त्यांना 'पैठे' करणें हा त्या कलेचा प्रधान आशय. रसिकाला भिन्न भिन्न रसांचा निर्मळ, निकोप आस्वाद देऊन त्यांचा आत्मा विशद करणें हें मूळ उदिष्ट! पण या आशयांची अन् उद्दिष्टांची गफलत झाली. सगळ्याच देवदासी त्या उच्च भूमिकेवर राहूं शकल्या नाहींत. विषयभोगाच्या लालसेनें त्यांना तिथून खालीं ढकललें. आपली कला म्हणजे लुब्ध लंपट पुरुषांना आकृष्ट करण्याचें आणि धनाढ्य रंगेलांना नादीं लावण्याचें एक अमोघ अस्त्र आहे, असें त्या मानूं लागल्या. पूर्वीं ज्या देवदासी होत्या त्या आतां भोगदासी बनून रुमझुम् करूं लागल्या. त्या राजेमहाराजे आणि सामंत सरदार यांच्या शृंगार महालांत नाचूं लागल्या.

कलेचा देव बदलला तसा तिचा भावहि बदलला. भक्तीची जागा शृंगारानें घेतली. सेवाभावाच्या माथां पाय देऊन भोगभाव उंच झाला. यजमान खूष होईल, जीव कुर्बान करील असेंच गायचें, तसेंच नाचायचें आणि कोणीकडून तरी आपले भोगविलास समृद्ध करायचे याच एका महत्वाकांक्षेनें त्यांना पछाडलें. त्यांच्या नृत्याचा बाजार झाला. त्यामुळें त्यांतली कला निमाली आणि कलेवर तेवढें शिल्लक राहिलें. अहोरात्र विलासांत डुंबत रहाण्याची चटक लागल्यामुळें त्या सुखासीन बनल्या आणि आपल्या कलेच्या साधनेलाहि पारख्या झाल्या. आपल्या नृत्याचें पावित्र्य त्यांनीं आपल्याच हातांनीं शबल करून टाकलें. अशाहि परिस्थितींत भरतनाट्यम्‌ची मूळ अभिजात कला महत्प्रयासानें जोपासून ठेवणारीं देवदासींची काहीं घराणीं तमिळनाडमध्यें राहिलीं होतीं, पण राजनर्तकींच्या या दिमाखांत आणि झगमगाटांत त्यांना कोणी विचारीनासें झालें. तीं घराणीं राजाश्रयाला तर वंचित झालींच; शिवाय त्यांना मानहि उरला नाहीं. दक्षिणेंत 'भरतनाट्यम्' ही कला केवळ नांवापुरती शिल्लक उरली. मृत्यूच्या सावलींत जातील तेवढे दिवस ढकलूं लागली.

पण याच विसाव्या शतकांत भरतनाट्यम्‌चे ग्रह मृत्युस्थानांतून लाभस्थानांत आले. पुन्हां पारडें फिरलें. ती कला मृत्युग्रस्त होण्यापूर्वीं नेमक्यावेळीं तिचा उद्धारकर्ता जन्माला आला. या गृहस्थांचें नांव इ. कृष्ण

अय्यर. ही कला म्हणजे भारताचा एक बहुमोल ठेवा आहे आणि तो आपण जतन केला पाहिजे, वाढवला पाहिजे, असें त्यांच्या मनांत ठाम ठसलें. हे प्रथम सगुणविलाससभेत अेक नट होते. त्यामुळें त्यांचा त्या कलेशीं जवळून परिचय होता. तिचें शास्त्रहि त्यांना अवगत होतें. १९२६ सालीं भरतनाट्यम्‌च्या उद्धारासाठीं त्यांनीं एक संस्था उभी केली. भरतनाट्यम् हें नृत्य शतकानुशतकें देवदासींची मक्तेदारी होतें. श्री. अय्यरनीं तें त्यांच्या घरांतून काढून घरंदाज लोकांच्या आंगणांत आणून उभें केलें. अनेक कलाप्रेमी स्त्री-पुरुषांना ते स्वतः शिक्षण देऊं लागले.

आणि याच वेळीं नेमकें एक नवें विघ्न त्यांच्यापुढे येऊन उभें ठाकलें. ‘संस्कृति-संरक्षक’ केवळ महाराष्ट्रांतच होते अन् आहेत असें नाहीं. तमिळनाडमध्येंहि ते होतेच. भरतनाट्यम् ही समाजांत अनीतीचा अन् छाकटेपणाचा फैलाव करणारी अेक हीन, अपवित्र कला आहे; अतएव कोणीं तिच्या वाऱ्यालाहि उभें राहूं नये, असा तिथल्या समाजसुधारकांनीं डांगोरा पिटला. त्यांनीं भरतनाट्यम्‌विरुद्ध अपप्रचाराची आघाडीच उघडली. वृत्तपत्रांतून या कलेला झोडपणारे मोठमोठे लेख प्रसिद्ध होऊं लागले. श्री. अय्यर यांना हें अेक प्रकारचें आव्हानच होतें; पण त्यांनीं तें धैर्यानें स्वीकारलें. विरोधकांच्या आक्षेपांचें रान तोडण्यासाठीं त्यांनीहि लेखणीची कुऱ्हाड उचलली. हा वाद तिकडील वृत्तपत्रांतून खूपच गाजला. लोकहि उभयपक्षांचीं खंडन-मंडनें आस्थेनें वाचूं लागले. मग साहजिकच लोकांच्या मनांत उत्सुकता बळावली, कीं ज्याच्याविरुद्ध इतका गदारोळ उठतो, तें ‘भरतनाट्यम्’ ही चीज आहे तरी काय? म्हणून मग ते अशा नृत्याच्या कार्यक्रमांना केवळ जिज्ञासा म्हणून गर्दी करूं लागले. पुढें या जिज्ञासेचें आवडींत रूपांतर झालें. समाजसुधारक आक्रोश करतात, तसलें कांहीं लोकांना त्यांत आढळलें नाहीं. ते तशा प्रयोगांत मुक्तपणें रस घेऊं लागले. त्यामुळें विरोधकांच्या शिडांतला वारा आपोआप निघून गेला. श्री. अय्यर हे त्या सामाजिक युद्धांत विजयी ठरले.

१९३४ सालीं वाराणशीला अखिल भारतीय संगीत परिषदेचें अधिवेशन भरलें. नामांकित गायक-वादक त्या परिषदेस जमले होते. विशेष

म्हणजे विश्वकवि रवींद्रनाथ ठाकूरहि उपस्थित राहिले होते. श्री. अय्यर हे बालसरस्वती नांवाच्या एका मुलीसह त्या अधिवेशनास गेले. तिथें तिनें भरतनाट्यम्‌चा प्रयोग सादर केला आणि रवींद्रबाबूसह सर्व रसिकांची आणि कलाकोविदांची वाहवा मिळवली. लोकांना कांहींतरी नवें अन् विस्मयजनक पाहिल्यासारखें वाटलें. पुढें ही बालसरस्वती उत्तरभारतांत सर्वत्र हिंडून नाचली आणि अत्यंत लोकप्रिय झाली. ‘ भरतनाट्यम्‌च्या ’ पुनरुद्धारांत या कलावतीचा फार मोठा वांटा आहे, असें श्री. अय्यर यांनींच म्हटलें आहे.

१९३७ सालीं घरंदाज कुटुंबांतल्या आणखी दोन सुविद्य मुलींनीं भरतनाट्यम्‌च्या कलाक्षेत्रांत पदार्पण केलें. एकीचें नांव कलानिधि अन् दुसरीचें रुक्मिणीदेवी. या दोघींनीं भरतनाट्यम्‌चें उद्यान बहराला आणलें म्हटलें तरी चालेल. या दोन्ही मुलींनीं यशोमंदिराचा कळस उभवलेला पाहून इतरहि अनेक कलाप्रेमी कन्यकांना प्रेरणा मिळाली. दक्षिणेंत भरतनाट्यम्‌च्या अनेक नृत्यशाळा निर्माण होऊन विद्यार्थ्यांना त्या नृत्याचें शास्त्रोक्त शिक्षण देऊं लागल्या. गेल्या वीस वर्षांत भरतनाट्यम्‌नें दक्षिण भारताच्या सांस्कृतिक जीवनांत आदराचें स्थान मिळविलें आहे. आजमितीस तिकडचा कोणताहि उत्सवसमारंभ भरतनाट्यम्‌च्या प्रयोगा-वांचून पुरा होऊंच शकत नाहीं.

या कलेला मानमान्यता मिळवून देणाऱ्या आणखी एका महान् कला-वंताचें नांव उच्चारल्याशिवाय भरतनट्यम्‌चा इतिहास पुरा होणार नाहीं. हे गृहस्थ म्हणजे श्री. उदय शंकर ! यांनीं या नृत्यकलेंत खूप बारकावे आणले. अनेक जटिल, सूक्ष्म आशय मूर्तिमंत करण्याचें सामर्थ्य त्यांनीं या कलेंत आणून ओतलें. त्यांनीं आपलें कलापथक घेऊन भारताचेंच नव्हे; तर परदेशाचेहि दौरे केले. भारताबाहेर या कलेला प्रशस्ति आणि लोकमान्यता मिळवून देण्याचें श्रेय मुख्यत्वें श्री. उदय शंकर यांनाच आहे.

भरतनाट्यम्‌चा रंगदार नृत्यप्रयोग पहाण्याचा सुयोग अनेकांना लाभला असेल. ज्यांना तो लाभला नसेल, त्यांनीं कल्पनेला शरण जाऊन तो आंतल्या डोळ्यांनीं पहावा.

रंगमंचावर प्रकाशाची पखरण झालेली.आहे. सहा पुरुष तिथें उभे दिसतात. दोन गायक, तीन वादक मिळून पांच अन् सहावा तो नट्टुवनार म्हणजेच नर्तिकेचा कलागुरु. सर्वजण साथीची सिद्धता करून नर्तिकेची वाट पहात आहेत. ती पहा नर्तिका आलीच. आली म्हणण्यापेक्षां कुठल्या तरी दिव्य लोकांतून अवतरली. छुम्, छुम्, छुम् ! ती रंगमंचाच्या मध्य-भागीं येऊन उभी राहिली आहे.

तिपेडी वेणी. काळ्या नागिणीप्रमाणें ती सगळ्या पाठीवरून खालीं नितंबा-पर्यंत ओघळली आहे. अथपासून इतिपर्यंत सुगंधी शुभ्र फुलांचा हार तिच्यावर जडवलेला आहे. अग्राखालीं सोनेरी गोंडा लोंबतो आहे. कपाळीं उभें कुंकू रेखलेलें. कपोलांवरून भाळापर्यंत दोहीं अंगीं बिंदुरचना. तिच्या भुवयांच्या 'व्यंकटी' त्यामुळें अधिकच आकर्षक झाल्या आहेत. केसांच्या सरळ भांगांतून मार्ग काढीत पुढे येऊन, मोत्यांची बिंदुली भालप्रदेशीं टेकली आहे. अंगांत तंग चोळी. उरोजांवर सोनेरी नक्षीदार झांकण. दंडांत लोंबते गोंडे. सर्व अवयव विविध अलंकारांनीं नटलेले. जरीदार गडद रंगाची रेशमी साडी. सकच्छ अन् घट्ट नेसण. त्या साडीच्या चुण्या पाहून घ्याव्या. मन्मथाला हृदयसिंहासनावर चढण्या-साठीं त्या जणूं कोरीव पावठण्याच तयार केल्या आहेत. साडीवरून तलम शेला. कमरेंत मेखला. पायीं पैंजण. हातांत नाजूकशीं अनेक कंकणें. याशिवाय आणखीहि बरेंच कांहीं. पण तें वर्णनाच्या पलीकडचें.



भरतनाट्यम्—एक मुद्रा

ही सारी वेषभूषा तिच्या घाटदार आकृतीला खुलावट आणते. तिच्या सौंदर्याची रेखा बोलकी करते. ती रंगभूमीवर प्रवेशत नाहीं, तर थेट रसिक

प्रेक्षकांच्या हृदयांतच प्रवेशते. प्रथम ती आपल्या गुरूला अभिवादन करते, मग वाद्यांना नमते आणि मग प्रेक्षकांपुढें नमस्कारमुद्रेंत उभी रहाते. शांत, स्तब्ध आणि गंभीर ! नेत्रपातीं अर्धी लवलेलीं. आतां ही काय करणार, ही उत्कंठा प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न होण्याच्या आंतच 'पायलिया झनकार' होतो. अन् पाठोपाठ 'अलारिप्पु'ला प्रारंभ होतो.

अलारिप्पु हा भरतनाट्यम्‌मधला पहिला कार्यक्रम. त्याच्यामागून जति-स्वरम्. हे दोन्ही प्रकार नृत्याचे नसून शुद्ध नृत्ताचे असतात. नृत्त हें नृत्याहून वेगळें आहे. नृत्त म्हणजे केवळ तालबद्ध पदाघात अन् अंगसंचालन. नृत्त हें कोणताहि भाव अथवा आशय व्यक्त करीत नाहीं. तें ताल अन् लय यांच्याशीं सुसंवाद ठेऊन केवळ पदन्यासाची करामत दाखवतें. हे पदन्यास द्रुत, द्रुततर अशा लयींत क्रमानें वाढत जातात. वाऱ्याच्या झुळकेनें जलपृष्ठावर लहरी थरारून जाव्या, तशीं विविध प्रकारचीं भंग, संकेत अन् स्पंदनें त्या नृत्तांतून थरारत रहातात. नर्तिकेची ती कोवळी काया जणूं विजेनें भरल्यागत होते. अलारिप्पु हें रंगदेवतेचें प्रबोधन असतें. त्यानें नर्तकीच्या अंगांतलें जाड्य अन् मालिन्य ताबडतोब दूर होतें. तिची तनुलता हलकी-फुलकी होऊन पुढच्या कार्यक्रमांत सहजपणें लवते, वांकते.

'वर्णम्' हा त्याच्यापुढचा कार्यक्रम असतो. यांत नृत्त आणि नृत्य या दोहोंचाहि प्रयोग होतो. मागें एखादें गीत सुरू होतें. त्यांत वाद्यांची साथ मिळून जाते. आतां नर्तिकेला नृत्य करायचें असतें. लास्य दाखवायचें असतें. विविध प्रकारच्या हस्तमुद्रा, रसानुकूल अभिनय आणि अभिनयाच्या द्वारें त्या गीतार्थाची अभिव्यक्ति इतक्या गोष्टी तिला 'वर्णम्'मध्यें साधायच्या असतात. नर्तिका, गायक अन् वादक या सर्वांची इथें एकतानता होते. वर्णम्‌साठीं एखाद्या प्रसिद्ध रागांतलें गीत निवडतात. त्या गीताचा ढंग असा असतो, कीं त्यांत वादकालाहि आपलें कसब दाखवण्याची संधि मिळावी. नर्तिकेच्या हस्तमुद्रा, हावभाव, दृष्टीच्या फेंकी, शरीराचीं सहजसुंदर वळणें, गतींतले मृदुमंथर विलास, हें सगळें कांहीं 'वर्णम्'मध्यें पाहून घ्यावें. वर्णम म्हणजे सर्व नृत्याचा गाभा. भरतनाट्यम्‌चें तें प्रधान अंग ! हा कार्यक्रम ज्या मानानें रंगेल, त्या मानानें त्या नृत्यप्रयोगाचें मूल्यमापन होतें.

2५३०८ दि: ...१११
२९२ दि: १५/१/६

'वर्णम्'नंतरचा प्रयोग म्हणजे 'पदम्.' या प्रकारांत भक्तिभाव किंवा प्रेमभाव आविष्कृत होतो. प्रेमभावाला प्राधान्य मिळालें, कीं त्यांत सहजपणें शृंगाररस उतरतो. संभोग आणि विप्रलंभ या शृंगारमुद्रेच्या दोन बाजू. प्रत्येकाचे वेगवेगळे सहचारी आणि संचारी भाव. सूक्ष्म आणि सूक्ष्मतर! पण भरतनाट्यम्ची नर्तिका हे सगळे भाव मूर्तिमंत करते, बोलके करते. ती पहा, प्रियसमागमाच्या केवळ कल्पनेनें तिची काया पुलकित झाली आहे. लज्जा अन् विनय कसे तिच्या सर्वांगाचा संकोच करीत आहेत. प्रियसमागमांत ती भोगणार असलेल्या सुखांच्या विविध छटा तिच्या भावदर्शी डोळ्यांत तरळून जात आहेत.



भरतनाट्यम्—एक मुद्रा

पण एकाएकीं असें काय बरें झालें? तिचें ऊर धपापूं लागलें तें कां? तिच्या श्वासांचे कढत उसासे बनले ते कां? कां म्हणजे? विरहाच्या कल्पनेनें. 'संयोगा विप्रयोगान्ताः' असा नियमच आहे. समागमाला वियोगाचा शाप सदैव लागलेलाच आहे. ती एकलेपणाची आग, आर्त उत्कंठा, ती मर्मस्पर्शी हृदयव्यथा, हें सारें, सारें आतां नर्तिकेच्या अभिनयांतून साकार होऊं लागलें आहे. तिच्या विरहदु:खाची कळ आतां प्रेक्षकांच्या काळजापर्यंत जाऊन पोंचली आहे. त्या विरहणीच्या व्यथा-वेदना या आतां प्रेक्षकांना स्वतःच्याच वाटूं लागल्या आहेत. तिच्याविषयीं एक प्रकारचें अनिर्वचनीय कारुण्य आतां प्रेक्षकांच्या अंतरांत द्रवूं लागलें आहे.

अरे, पण एवढ्यांत एकाएकीं नर्तकीच्या मुद्रेंत हा विलक्षण फरक कसा काय पडला? तिच्या मुखावर हें प्रसन्न हास्य कुठून आलें? कुठून म्हणजे? तिच्या मातृभावांतून. ती आतां प्रणयिनी नाहीं किंवा विरहिणीहि नाहीं. ती आतां वत्सल माउली यशोदा बनली आहे. रंगभूमीवर दिसत असली, तरी

मनानें गायी—वासरांच्या गोकुळांत ती प्रविष्ट झाली आहे. तिच्या काळजाचा गाभा तो कृष्णकन्हैया ! तें गोजिरें अन् निळें सावळें बालब्रह्म ! तें तिच्या मांडीवर किंवा कडेवर आहे आणि ती त्याला खेळवीत, डोलवीत, जोजवीत त्याचीं कोडकौतुकें करीत आहे. तें जिवाआगळें पोर; पण किती खट्याळ ! त्याच्या खोड्या किती म्हणून तिनें सहन कराव्या ! ती उसन्या रागानें त्याला दूर लोटीत आहे अन् त्याची बालमुद्रा कोमेजलेली दिसतांच अंतरींच्या कळवळ्यानें पुन्हा त्याला जवळ ओढून उराशीं कवटाळीत आहे.

एवढ्यांत तिथें येते राधा ! ती कृष्णाला घेऊन आपल्या घरीं जात आहे. हें राधेचें रूपहि ती नर्तिकाच नटते. तिच्यासंगें तो लावण्यसुंदर रमतो. ती त्याच्यावरून आपला जीवभाव ओवाळते. वात्सल्याच्या आवरणाखालीं लपवलेला राधेचा तो प्रणयभाव ! जणूं या नर्तिकेनें खास तिच्या काळजांतून तो काढून आणला आहे........पण एकाएकीं ती बावरली कां ? तिच्या नेत्रांतून शरसंधान सुरू झालें तें कां ? तिची जिवणी एका निराळ्याच प्रकारें मुरडली ती कां ?....त्याला तसेंच कारण आहे. अजाण लेकरूं दिसणाऱ्या त्या नटखट कृष्णानें अंतरीं निराळाच भाव धरून तिचें हळूच चुंबन घेतलें आहे. केवढें धाष्टर्य ! केवढा अविनय ! तिनें भुवया वक्र करूं नये, तर काय करावें !.... ....पण छे ! दुसऱ्याच क्षणीं तिचा तो राग नाहींसा झाला. तिच्या मुद्रेवरून पार पुसून निघाला. अंतर्बाह्य कृष्णमय झालेली ती राधा आपल्या लाडक्या कृष्णावर रागावणेंच शक्य नाहीं. कशाहि भावनेंत तिला तो प्रिय आहे, प्रियोत्तम आहे !

हीं आणि अशाच प्रकारचीं नर्तिकेचीं विविध रूपें आणि तिचे लास्यविलास पहातांना प्रेक्षकांची तन्मय भावसमाधि लागते. आपलें सारें स्त्रीत्व आणि सर्वांगीं परिपुष्ट यौवन पणाला लावून ती आपल्या नृत्याचें आकर्षण वाढवते. ज्या भावविश्वांत ती प्रवेश करते, तिथें ती प्रेक्षकांनाहि आपल्या समागमें घेऊन जाते.

'पदम्' नंतरचा शेवटचा कार्यक्रम म्हणजे 'थिल्लाणा.' हाहि पुन्हा पूर्ण 'नृत्त' प्रकार आहे. यांत केवळ तिची 'पावली'च वाजत रहाते. तिचा वेग वाढत जातो. त्याच्या जोडीला स्वर, लय अन् वाद्यांचे बोल ! सारें वातावरण

करीं नादानें भरून जातें. तें नादब्रह्म प्रेक्षकवर्गाला कवळून घेतें....अन् मग नृत्य विराम पावतें. नर्तिकेचीं पैंजणें मूक झालीं, वाद्यांवरचे हात थांबले, गायकांच्या गळ्यांतले स्वर विरले, तरी प्रेक्षक थोडा वेळ त्या नादांतच गुंगून राहतो.

असें आहे हें रसमय, नादमय, भरतनाट्यम्! यांतले 'अलारिप्पु,' 'जतिस्वरम्,' 'वर्णम्,' 'थिल्लाणा' इत्यादि सगळे शब्द दाक्षिणात्य संगीतांतले पारिभाषिक शब्द आहेत. नृत्य दक्षिणेचें तसे त्याचे संकेतहि दाक्षिणात्यच! जसें औषध तसें अनुपान!

भरतनाट्यम् ही एक संमिश्र कला आहे. नाट्य, नृत्य, नृत्त, संगीत, वाद्य, काव्य, आणि लय इतक्या गोष्टींचा जेव्हां सुसंवादी मेळ जमतो, तेव्हांच भरतनाट्यम् खऱ्या अर्थानें प्रकट होतें. हें नृत्य भावप्रधान आहे. आणि यांत भावव्यक्तीचीं अनेक साधनें आहेत. भाव म्हटला कीं, मुद्रेवरचा प्रेमाचा किंवा करुणेचा भाव, अशी अनेकांची समजूत असते. पण ती अगदींच संकुचित आहे. इथें 'भाव' शब्द 'आशय' या अर्थानें घेतला पाहिजे. या नृत्यांत पौराणिक कथाप्रसंग असतात. पौराणिक व्यक्ती नर्तक-नर्तिकेच्या रूपानें आपलें स्वभावप्रदर्शन करतात. पण हें त्या कलेचें मूलभूत उद्दिष्ट नव्हे. तर त्या कथाप्रसंगांतून अथवा पात्रांच्या व्यक्तिरेखेंतून जीवनाचा आध्यात्मिक आशय व्यक्त करणें, प्रेक्षकांना अज्ञात, अव्यक्त अशा दिव्य भावांचा स्पर्श घडवणें, हें त्या कलेचें साध्य आहे. मानवाच्या भावजीवनाची पातळी उंच करणें, यांत त्या कलेची सार्थकता आहे. 'ऊर्ध्वमूलमधःशाख' असा जो सनातन अश्वत्थ वृक्ष, त्याच्याप्रमाणेंच या नृत्यकलेचींहि पाळेंमुळें अध्यात्माच्या दिव्य भूमींत असून, शाखापल्लव तेवढे पार्थिव आहेत.

भरतनाट्यम् ही नृत्यकला आज मृत्यूच्या आणि विस्मृतीच्या तावडींतून बचावली आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी तिला तो धोका निर्माण झाला होता. आज तिच्याविषयींचे सामाजिक पूर्वग्रहहि दूर झाले आहेत. आतां या कलेला प्रतिष्ठा लाभली आहे. त्यामुळें घरंदाज आणि सुविद्य कुटुंबांतल्या मुली आणि तरुणसुद्धा या नृत्याचें शिक्षण घेण्यासाठीं आवडीनें पुढें येत

आहेत. अड्यारचें कलाक्षेत्र आणि एग्मोर येथील 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ फाईन आर्टस्' या दोन संस्था अशा नव्या कलावंतांना शिक्षण देण्याचें कार्य करीत आहेत. शिवाय 'नट्टुवनार' खासगीरीत्या अनेक घरीं नृत्य शिकवितात तें वेगळेंच. गेल्या पावशतकाच्या अल्प काळांत 'भरतनाटयम्' नें केलेली ही प्रगतीची आणि लोकप्रियतेची वाटचाल निस्संशय स्पृहणीय आहे.

## तिरुकल्याण

हा रामेश्वराचा विवाहोत्सव आहे आणि तो डोळेभर पाहाण्याचा सुयोग मला लाभला आहे. मी सेतुबंध-रामेश्वरी पोंचलों तो जणूं तीर्थयात्रेसाठीं नव्हेच; तर त्या आदिदेवाच्या लग्नसोहळ्यासाठींच. मला या लग्नाची अक्षत आली नव्हती, कीं कुंकुमपत्रिकाहि पोंचली नव्हती. पण जगाचे मायबाप असलेल्या उमा-महेश्वरांच्या विवाहाला निमंत्रणाची काय गरज! तें तर सगळ्यांचें घरचेंच मंगल कार्य! खरें म्हणजे त्या दोघांचें विवाहमंगल केव्हांच होऊन चुकलें आहे. युगायुगांच्या पूर्वीची ती घटना आहे. मग या रामेश्वरक्षेत्रांत त्या घटनेची पुनरावृत्ति होत आहे, त्याचा अर्थ काय? माझ्या दृष्टीनें मी तो अर्थ मनाशीं लावला. हें लग्न नसून त्याचा वाढदिवस आहे आणि या वाढदिवसानिमित्त शिव-पार्वतींच्या प्रत्यक्ष लग्नाच्या वेळी, तसेंच त्याच्या आधीं आणि नंतर ज्या कांहीं गंभीर आणि प्रसन्न अशा घटना घडल्या, त्यांचें नाटक आतां या क्षेत्राच्या रंगभूमीवर केलें जाणार आहे. आणि अशा या शुभ अवसरीं आपण इथें पोंचलों, हें आपलें अहो भाग्यम्! माझे क्षेत्रोपाध्ये मला म्हणालेच —

"तुम्ही अगदीं योग्य वेळीं आलांत – आज श्रावण शुद्ध चतुर्थी. आज पार्वतीला वरदान मिळाल्याचा सोहळा आहे. अन् उद्या नागपंचमीस गोरज मुहूर्तावर 'तिरु-कल्याण' म्हणजे रामेश्वराचा उमा हैमवतीशीं विवाह होणार आहे. हे दोन दिवस असे आहेत, कीं तुमच्या डोळ्यांची धणी पुरेल."

हा 'तिरुकल्याण' उत्सव आषाढ वद्य अष्टमीपासून तिथें सुरू झाला होता. तें 'सुमुहूर्तें सावधान' व्हायचें, तर त्या आधींच्या कांहीं घटनांचाहि

त्या समारंभांत समावेश व्हावयलाच हवा होता. पार्वतीचा परिणय काय असा सुखासुखी झाला आहे! त्यासाठीं केवढें तरी उग्र तप तिला आचरावें लागलें. ती पितया-हिमवंताचा राजप्रासाद आणि तिथलीं विलासी सुखें सोडून एका पर्वतशिखरावर चढली. तिनें मृदु क्षौम वस्त्रें टाकून अंगाभोंवतीं वल्कल वेढलें, तिपेडी दर्भमेखला कमरेंत बांधली. चेंडू टाकून माळ हातीं घेतली. आपले विभ्रमविलास वनलतेकडे आणि चटुल कटाक्ष वनहरिणीकडे ठेवायला दिले. न मागतां मिळालेलें जल, चंद्रकिरणांतला रस आणि पिकून गळलेलीं वृक्षपर्णें यांवरच ती देहधारण करूं लागली. कांहीं काळानें तिनें पर्णांचाहि आहार टाकला अन् मग भोंवतींचे ऋषिमुनि तिला 'अपर्णा' म्हणूं लागले.

तेव्हां हें सगळें आख्यान घडल्यावांचून शिव तिला भेटणार कसा अन् तें लग्न होणार कसें? त्यासाठीं श्रावण शुद्ध चतुर्थीला पार्वती आपल्या मंदिरांतून निघून रामकुंड तीर्थावर जाते आणि तिथें एका मंडपांत तपाला बसते. हिमाचलावर तिच्याभोंवतीं ऋषिगण जमा झाले, तसे इथेंहि द्विजगण, यात्रिक आणि बुवा–बैरागी जमतात. रामेश्वर येणार, तिला वर देणार, उभयतांचा विवाह होणार आणि तो सोहळा पाहायला मोठी यात्रा लोटणार, हें पार्वतीच्या आधीं तिथल्या दुकानदारांना ठाऊक असतें आणि ते रामकुंडावर वृक्षातळवटीं आपले मेवामिठाईचे मांड घालून बसतात. पण पार्वतीच्या उपवासाची चिंता दाक्षिणात्य स्त्रियांना. त्या तिथें येतात. तिच्यापुढें मोठें केळीचें पान मांडतात. आणि त्यावर ताजें फोडून टवका उडवलेलें जलपूर्ण शहाळें, केळीं, काकड्या, नारिंगें इत्यादि फळ-फळावळ सोलून, चिरून ठेवतात. त्यामध्यें पुष्परचना असते आणि समोर धूप-दीप असतात. अपर्णेचा निग्रह थोर म्हणूनच ती त्याकडे लक्ष देत नाहीं. अन्यथा आमच्यासारख्या सामान्य जनांना ती फळसंपदा पाहून तोंडाला पाणीच सुटायचें.

नंतर नारद येऊन शिवाला पार्वतीचें प्रेम आणि तप निवेदितो. भोळ्या सांबाला मग लगबग होते. नारदाला पुढें घालून तो तिला दर्शन द्यायला, तिचे मनोरथ पुरवायला निघतो. मध्यान्हाच्या आंतच ही रामनाथाची मिरवणूक सुरू होते. रामेश्वराच्या मंदिराला पूर्व-पश्चिम दोन महाद्वारें आणि त्यांवर दोन उत्तुंग गोपुरें आहेत. पूर्वद्वार सागराभिमुख असून पश्चिमद्वार

ग्रामसन्मुख आहे. पश्चिमद्वारांतून मिरवणूक बाहेर पडली हें जेव्हां मला दुरून दिसलें, तेव्हां मी नेत्रांचीं निरांजनें पाजळून आमच्या दारांत उभा झालों. मिरवणुकींत सर्वांत पुढें चालत होता गजराज. तो ऐरावताचा बंधु शोभेल असा होता. ‘ हाथी चलत है अपने गतिसे ’ अशा थाटांत तो जात होता; पण यात्रेकरू आणि गल्लींतलीं मुलें त्याला अडवीत होतीं. चिमटींत पैसा धरून समोर गेलें, कीं तो सोंड पुढें करी. त्या मुलानें नाकपुडींत पैसा ठेवला कीं, शुंडाग्र किंचित् मुरडून तो घट्ट पकडी आणि मग सगळा शुंडादंड उभा करून माहुतासमोर धरी. माहुतानें हलक्या हातानें पैसा काढून घेऊन खिशांत टाकला, कीं पुन्हा सोंड खालीं आणि पाय पुढें. पावला-पावलाला माणसें त्या मौजेखातर त्याला थांबवीत होतीं; पण तो बहाद्दर एकदाहि चिडला नाहीं. एखाद्या स्थितप्रज्ञाची निवांत सहनशीलता मी त्याच्या ठिकाणीं पाहत होतों. पशूंमध्येंसुद्धा माणसांनीं ग्रहण करण्याजोगें पुष्कळच असतें, हें त्यानें मला दाखविलें.

हत्तीच्या मागें मंगलवाद्यें होतीं. सनई वाजवणारा पुरुष नसून एक तमिळ ललना होती, याचें मला आश्चर्य वाटलें. ती परगांवाहून त्या उत्सवासाटीं आपल्या साजिंद्यांसह आली होती. तिचें तें वर्षासनच असावें. वर्णानें श्यामा, उंचींत मध्यमा अन् रेशमी वस्त्र तामिळ पद्धतीनें नेसलेली अशी ती युवती होती. तिच्या अर्ध्या उंचीची सनई अधरावर टेकवून आणि गोटींसारखे गाल फुगवून ती फुंक भरीत होती आणि स्वरच्छिद्रांवर आपल्या कोमलांगुली नाचवीत दाक्षिणात्य संगीताची रागदारी आळवीत होती.

त्यामागें दोन दांड्यांवर जखडून बांधलेलें सुखासन होतें. ज्या अर्थीं तीस-चाळीस वाहक तें वाहून नेतांना घामानें निथळत होते, त्या अर्थीं तें किती अवजड असेल त्याची कल्पना करतां येत होती. त्यावर नंदी होता आणि त्याच्यावर प्रभावळींत शिवाची भोगमूर्ति विराजमान होती. तो नंदी पुच्छाग्रापासून तों शृंगाग्रापर्यंत सुवर्णाचा होता. अभ्रमंडळांत झांकोळलेल्या सूर्याच्या मंदोष्ण प्रकाशांतहि तो लखलख करीत होता. सोन्याचा नंदी म्हणजे असेल कुत्र्या-मांजऱ्याएवढा, अशी दरिद्री कल्पना कोणीं करूं नये. त्याची उंची अडीच-तीन हात सहज भरेल. या उंचीवरून त्याची लांबी अंदाजावी.

त्याची अपांग दृष्टि शिवाकडे लागलेली होती. त्या दृष्टींत अज्ञाधारकपणाचा भाव होता. तो शंकराला सांगत होता. ' तुमचें वजन मी पेलतों तें माझ्या शक्तीवर नव्हे; तर तुमच्याच कृपेवर. '

रामकुंडावरून परत येतांना त्याच्या पाठीवर शिव-पार्वती असें दुहेरी ओझें होतें. पार्वतीच्या भक्तिप्रेमाची परीक्षा पाहायला बटुवेषानें तिच्या आश्रमांत गेलेल्या शंकरानें स्वमुखानेंच आत्मनिंदा आरंभली होती. ' तूं त्या शंकर गोसावड्याचा नाद सोड ' म्हणून त्याचे अनेक दुर्गुण सांगतांना त्यानें तिला म्हटलें होतें—

" पार्वती, तूं नगाधिराजाची कन्या. खरें म्हणजे हत्तीवरून तुझी वरात निघायला हवी. पण हा भूतपति तुला म्हाताऱ्या बैलावरून मिरवील अन् मग नगरींचे महाजन चेष्टा करून हसतील. "

पण इथें तर मी वेगळेंच पाहात होतों. शिव आपल्या अर्धांगीसह नंदीवरूनच आपल्या मंदिराकडे चालला होता. पण नगरींचे महाजन हसत होते का ! मुळींच नाहीं. ते तर भावभक्तीनें फुलें उधळीत होते आणि घरोघरीं पुढें येऊन मंगलारत्या ओवाळीत होते. आबालवृद्धांच्या नेत्रांना टक पडलें होतें.

मिरवणुकीच्या मागून चारी वेदांचे ब्राह्मण वेगवेगळ्या गटांनीं मंत्रघोष करीत चालले होते. त्यांच्या मागून कांहीं भजनी मेळे होते. ते टाळ आणि फिडल यांच्या साथीवर ' तेवारम् ' या तमिळ शैव पुराणांतलीं गीतें गात होते—

" मैय् मौयाम् उल्वैच चेय् दु
विरप्पु एनुम् वित्तै वित्ति
पोय् म्मैयाम् कळैयै वाङ्गि
पोरै एनुम् नीरप्पै पाय् आच्चि "

—अप्पर—तेवारम्

' आपल्या आत्माच्या बागेची सत्यरूपी नांगरानें नांगरणी कर. त्यांत प्रेमबीजें पेर. असत्यरूपी झुडपें खुरपून टाक. त्या बागेला सहनशीलतेचें पाणी घाल. संयमाचें सभोंवतीं कुंपण उभें कर. आणि मग पाहा तेजाचे अनुपम अंकुर तुझ्या समोर कसे उगवतात ते ! ........'

ही सर्व मंडळी परगांवाहूनच रामेश्वराला आली होती. नाहीं तर त्या चिमुकल्या क्षेत्रांत एवढा सगळा संच कुठला ?

नागपंचमीच्या दिवशीं दुपारीं रामनाथपुरम् शहरांतून उमेला मंगळसूत्र आणि रेशमी पाटाव आलें. तिथले व्यापारी दरसाल हा अहेर पाठवतात. तो घेऊन आलेला ब्राह्मण हत्तीवरून मिरवीत मंदिरांत येतो. मग देत्याघेत्यांचे मानपान होतात. रामनाथाचा लग्नमंडप मंदिराच्या पूर्वद्वाराला लागून आहे. तो त्या दिवशीं सगळाच्या सगळा फुलांनीं शोभवला होता. जिकडे तिकडे पताका आणि पुष्पमाला लोंबवल्या होत्या. त्या एका दिवसासाठीं परगांवाहून पांचशें रुपयांचीं फुलें आलीं होतीं. उमा-महेश्वरांसाठीं तिथें सुशोभित मखर घातलें होतें. पुढें मधुपर्कादि सामग्री सिद्ध करून ठेवली होती. त्यापुढें विवाहहोमासाठीं कुंड घालून तें गोमयानें सारवून ठेवलें होतें. त्यावर छानदार रांगोळी घातली होती. मुहूर्त गोरज. पण चार वाजल्यापासूनच स्त्री-पुरुषांचा मेळावा जमूं लागला होता. बालवीर गणवेष घालून व्यवस्थेसाठीं उभे होते. मधें मोकळी प्रशस्त वाट. दोहो बाजूंनीं खांबांना टेकून बैठका घातलेल्या. एका बाजूला पुरुषानीं बसायचें अन् दुसरी केवळ पुरंध्रींसाठीं.

एका दालनांत पार्वतीचा साजशृंगार चालला होता. मंदिरप्राकारांतल्या इतर देवमूर्तींच्या अंगावरहि त्या दिवशीं वस्त्राभरणें चढलीं होतीं. ‘ अहो, वधूवरांचिये मिळणीं। वऱ्हाडियांहि लुगडीं लेणीं ’ ही तर समर्थांच्या घरची रीतच. देवस्थानच्या सगळ्या नोकरांचाकरांनाहि त्या दिवशीं नव्या वस्त्राचा अहेर मिळतो. रामेश्वराच्या घरीं ‘ कुबेर भांडारी ’ असल्यामुळें कशालाच वाण नाहीं. इथें त्याचीं आणि पार्वतीचीं प्रत्येकीं बारा वाहनें आहेत. रत्न-जडित अलंकारांची गणना तर कोण करील ! शेंकडों गांवें त्याच्या सेवेला-लावलेलीं आहेत. शेंकडों सेवेकरी आहेत. मोठमोठ्या कोठ्या-कचेऱ्या आहेत. रक्षणासाठीं पोलिसखात्याचा स्वतंत्र चौकी-पहारा आहे.

पार्वती साळंकृत होऊन बाहेर आली, तेव्हां त्या भोगमूर्तीचें जेमतेम मुखमंडळ तेवढें दिसत होतें. बाकी सगळी अलंकार आणि पुष्पहार यांची गर्दी. मीं त्या आदिमायेपुढें माथा नमवला आणि माझ्या त्या मुकुलित दृष्टीपुढें कालिदासानें वर्णिलेली गौरवधू विलसूं लागली—

'मंगलस्नान होऊन तलम अष्टपुत्री नेसल्यावर तिच्या सख्यांनीं तिला शृंगारमंदिरांत आणली. एकीनें धुपाच्या सुगंधी धुरानें तिचे ओले केंस वाळवले. दुसरीनें दूर्वादलांसह गुंफलेली मोहाच्या फुलांची माळा तिच्या गळ्यांत घातली. तिसरीनें सर्वांगाला उटणें लावलें. कोणीं अळित्यानें तिचीं पदतळें रंगवलीं. कोणीं कोवळे यवांकुर तिच्या कानांत लोंबविले. कोणीं तिच्या गालावर नि कपोलांवर गोरोचनानें पत्ररचना केली. कोणीं तिच्या डोळ्यांत काजळाची रेघ ओढली. कोणीं तिच्यापुढें आरसा धरला अन् शेवटीं तिची माता मेनाराणी हिनें पुढें येऊन लेकीला कौतुकाच्या दृष्टीनें न्याहाळीत हरताळ आणि मनशीळ यांच्या कल्काचा विवाहतिलक तिच्या कपाळीं लावला.'

गौरीसाठीं बाहेर पुष्पमंडित सुखासन सिद्ध होतें. पुजाऱ्यानें गौरीमूर्तीला आणून त्यांत बसविलें. वाहकांनीं लगेच ती 'लालकी' उचलली. बत्त्यांच्या प्रकाशांत, वाद्यांच्या गजरांत, लोकांच्या वर्तुळांत, नाचवीत, खेळवीत वाहकगण तिला लग्नमंडपाकडे नेऊं लागले. मंडपाच्या मागच्या दालनांत एक झोपाळा लोंबवलेला होता. पार्वतीला त्यावर शिवाच्या शेजारीं बसवण्यांत आलें. तिथें आरती झाली. झोपाळा मंद मंद झुलूं लागला. भक्तगणांची दृष्टिहि त्यांच्या संगें झुलूं लागली.

तिथून उभयतां लग्नमंडपांत गेलीं आणि सावधानघटका भरली. सूर्य नाइलाजानें पश्चिम सागरांत बुडला. त्यामुळें अंधकाराला समारंभ पाहायला येण्याची वाट मोकळी झाली. तो दाराखिडक्यांतून आंत घुसूं लागला; पण तिथल्या लखलखत्या दीपज्योतींनीं त्याला मागें रेटलें. पूर्वसमुद्र तिथून एका हांकेवर होता. त्याला समारंभ पाहण्याची उत्कंठा होती. पण 'समुद्रीं रेखा नोलांडावी' या जगच्चालकाच्या आज्ञेला तो बांधील असल्यामुळें बिचारा जागच्याजागीं चुळबुळत राहिला. वारा मात्र म्हणाला 'कीं, मला कोण अडवणार!' तो धुरळ्याचे लोट उठवीतच आला. वाद्यें वाजूं लागलीं. सनईचे मधुर स्वरालाप अंतरांत भावांचा फुलोरा आणूं लागले. मंत्रघोषहि त्यांतच उठावले. सगळेंच वातावरण मंगलमय झालें. शतसंख्य हात नमस्कारासाठीं उंचावले आणि तितकींच मस्तकें अवनत झालीं. त्या मंडपघसणींत सगळ्यांची एकच आकांक्षा, कीं एकवार ओझरतें तरी 'दर्शन' घडावें. अशा त्या

नरनारींच्या उल्हासित समुदायांत अग्नि-ब्राम्हणांच्या साक्षीनें 'शिवानें उमेचें पाणिग्रहण केलें. त्या वेळीं—

"रोमांचांनी तनु डवरली पार्वतीची, तसाच,
शंभूच्याहि करकिसलयीं उद्भवे स्वेद साच
त्यांचें पाणिग्रहण घडतां सर्वथा चित्तवृत्ती
कंदर्पानें जणुं विभजुनी वांटिली सारखी ती"

— डॉ. श्रीखंडेकृत 'सुश्लोककुमार'

त्यानंतर लाजाहोमादि विवाहविधि यथासांग होतात. पुढे चार दिवसांनीं मंदिराच्या प्राकारांतच वरात निघते. पुढें रामेश्वराची स्वारी आपल्या नवोढेसह सासुरवाडीस मांडवपरतण्याला जाते. ही सासुरवाड म्हणजे तिथून अर्ध्या कोसावर असलेली गंधमादन नांवाची वाळुकामय टेकडी. तिथें मुक्काम होतो, कौतुकाचे राजोपचार होतात आणि मग परत त्यांचा स्वस्थानीं वास घडतो. अशाप्रकारें आषाढ कृष्ण अष्टमीस सुरू झालेलें हें 'तिरुकल्याण' पूर्ण सतरा दिवसानंतर समाप्त होतें.

## वैकुंठ एकादशी

तामिळनाडमधले दोन प्रमुख उत्सव म्हणजे वैकुंठ एकादशी आणि पोंगळ. पहिला धार्मिक उत्सव आहे तर दुसरा सामाजिक लोकोत्सव आहे. मार्गशीर्ष महिन्यांतल्या शुद्ध एकादशीला 'वैकुंठ एकादशी' म्हणतात. तमिळनाडमध्यें 'मुक्कोडी' एकादशी या नांवानें तिला ओळखतात. त्या दिवशीं विष्णूसह तीन कोटी देव पृथ्वीवर अवतीर्ण झाले म्हणून तिचें नांव मुक्कोडी असें पडलें. श्रीविष्णु त्या दिवशीं धरातलावर आला, तो एका असुराचा निःपात करण्यासाठीं.

फार पूर्वीची म्हणजे कृतयुगांतली ही गोष्ट आहे. मुर नांवाचा एक असुर जेव्हां पृथ्वीचें राज्य बळकावून स्वर्गांतल्या देवांनाहि पिडापीड करूं लागला, तेव्हां सर्व देव वैकुंठांत गेले आणि त्यांनीं 'धाव विभो, करुणाकर माधव' अशी श्रीहरीची कळवळून प्रार्थना केली. विष्णूनें देवांचें संकट तें आपलें संकट असें मानलें आणि पृथ्वीवर अवतरून मुर दैत्याची गठडी

वळली. म्हणून तमिळनाडमधल्या वैष्णवांना तर हा दिवस महत्त्वाचा वाटतोच; पण इतरेजनांनाहि त्याचें माहात्म्य कमी वाटत नाहीं

महाराष्ट्रांत आषाढी एकादशीची जी थोरवी ,तीच तमिळनाडमध्यें वैकुंठ एकादशीची. महाराष्ट्रांतले कोनाकोपऱ्यांतले गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, जसे खांद्यावर पताका घेऊन विठ्ठलाच्या आणि संतांच्या नांवाचा उद्घोष करीत पंढरीची वारी करतात, त्याचप्रमाणें तमिळनाडमधले लोक या दिवशीं ' श्रीरंगम् ' या महान् वैष्णव क्षेत्राची यात्रा करतात. ' श्रीरंगम् 'मध्यें वैकुंठ एकादशीचा उत्सव सतत एकवीस दिवस चालू असतो. तिकडच्या विष्णु मंदिरांना एक निराळेंच दार असतें. त्याला ' वैकुंठ वासळ ' असें म्हणतात. तें फक्त वर्षांतून एकदाच आणि तेंहि या वैकुंठ एकादशीलाच उघडलें जातें. वैकुंठ वासळांतून मंदिरांत शिरून देवाचें दर्शन घेतलें, कीं कैवल्य हातीं आलें, अशी त्या लोकांची धारणा आहे. म्हणून त्या दिवशीं वैकुंठवासळावर स्त्री-पुरुष भक्तांची एकच झुंबड उडते. ज्यांना ' श्रीरंगम् 'ला जाणें शक्य नाहीं, ते प्रातःस्नान करून गांवांतल्या एखाद्या विष्णुमंदिरांत दर्शनास जातात. त्या दिवशीं दिवसभर निराहार उपोषण असतें. रात्रीं हरिजागर चालतो. रात्रीच्या वेळींच श्रीविष्णूची महापूजा करतात किंवा विष्णुपुराणाच्या वाचनांत रात्रीचे चार प्रहर सार्थकीं लावतात.

मार्गशीर्षानंतर येतो पौष. याच महिन्यांत सूर्य मकर राशींत प्रवेश करतो. संक्रांतीचा सण म्हणतात तो हाच. तमिळनाडमध्यें हा सण तीन दिवस चालतो. मकर संक्रांति हा दिवस तमिळनाडमध्यें सूर्याचा जन्मदिवस समजला जातो. पौष मासाचें तमिळ नांव ' तै मास ' असें आहे. आपला मार्गशीर्ष तो त्यांचा ' मार्गली. ' सौर गणनेनें मार्गशीर्षांत धनुर्मास येतो. या धनुर्मासांत सूर्योदयाच्या वेळीं सूर्याला महानैवेद्य करून भोजन करणें, हा आपल्याकडचा एक गोड समारंभ असतो; पण तमिळनाडमधली जनता हा महिना अशुभ आणि विघ्नकारक समजते. धार्मिक लोक या मासांत शिवाला अभिषेक करून ' विघ्नानि नाशमायान्तु ' अशी त्याची प्रार्थना करतात. बायकांचा लौकिक विधि याहून वेगळा असतो. त्या सकाळीं उठून अंगण सारवतात. तिथें रांगोळीचा चौकोन काढतात. त्यावर विघ्नेश्वर या नांवानें

एक शेणगोळा बसवतात. त्यावर महाळुंगाच्या फुलांचा तुरा खोचतात. मग सूर्यास्ताच्या वेळीं तो शेणगोळा फुलासह तेथून उचलून बाजूला कुठेंतरी ठेवून देतात. दुसऱ्या दिवशीं दुसरा तुरा आणि दुसरा गोळा. असें महिना-भर चालायचें. शेवटच्या दिवशीं गांवांतल्या सर्व बायका आपल्या घरचे सगळे शेणगोळे गोळा करून एका ठिकाणीं जमतात. तिथून त्यांची सवाद्य मिरवणूक निघते, ती गांवाबाहेरच्या माळापर्यंत. तिथें त्या शेणगोळ्याच्या रूपानें तीं सर्व विघ्नें टाकून द्यायचीं आणि घरीं येऊन दुसऱ्या दिवशींच्या संक्रांति उत्सवाच्या तयारीला लागायचें.

### पोंगळ

संक्रांतीचा सण हा तिकडे 'पोंगळ' सण म्हणून ओळखला जातो. पोंगळ म्हणजे तांदुळांची दुधांत शिजवलेली खीर. संक्रांतीचा आदला दिवस हा 'भोगीपंडिकई' म्हणजेच भोगीचा सण. दक्षिणायनांतला हा शेवटचा दिवस. उपभोगाचा दिवस असाहि त्याचा अर्थ होतो. शेतीचा हंगाम नुकताच संपलेला आहे. भाताची कापणी होऊन धान्यलक्ष्मी शेतकऱ्याच्या घरांत आलेली आहे. घरांत धान्य आहे म्हणूनच शेतकऱ्याच्या मनांत हौस आहे. पुढचे थोडे दिवस विश्रांतीसाठीं मोकळे आहेत. अशा वेळीं नेमका हा सण येतो. भोगीच्या दिवशीं आंगण आणि परसू झाडून सारवून स्वच्छ करतात. केरकचरा गोळा करून जाळून टाकतात. ही झाली पुरुषांची कामगिरी. बायका स्वयंपाकघरांत नाना परींची पक्वान्नें करण्यांत गुंतलेल्या असतात. या दिवशींचा धार्मिक कार्यक्रम म्हणजे इंद्राची पूजा. कारण इंद्रानेंच त्यांच्या शेता-भातावर योग्य वेळीं पर्जन्यवृष्टि केलेली असते. तोच त्यांचा अन्नदाता पिता ठरलेला असतो.

पण याहि पूजेवर एकदा गंडांतर आलेलें होतें. भागवतांतल्यासारखीच किंबहुना तिचा पर्याय अशी ती कथा आहे—

द्वापार युगांत इंद्राला एकदा आपल्या सामर्थ्याचा मोठाच गर्व झाला. गोकुळांतल्या श्रीकृष्णाला वाटलें कीं, इंद्राचा हा गर्वभार उतरवला पाहिजे. गोकुळांतले गवळी दरवर्षी भोगीच्या सणाला इंद्राप्रीत्यर्थ महानैवेद्य करीत. त्यावर्षी श्रीकृष्णानें त्यांना सांगितलें. 'नैवेद्य करायचा, पण तो इंद्राला न

दाखवतां गोवर्धन पर्वताला अर्पण करायचा. कारण इंद्रापेक्षां गोवर्धनाचे उपकार आपल्यावर मोठे आहेत. गोवर्धनावर गवत आणि वनस्पती वाढतात म्हणूनच तर आपल्या गोधनाचें संवर्धन होतें. तेव्हां चालू वर्षापासून इंद्रोत्सव बंद ! '

गवळ्यांनीं श्रीकृष्णाची ही आज्ञा मानली. त्यामुळें इंद्र रागावला आणि त्यानें गोकुळ अतिवृष्टीच्या महापुरांत बुडविण्याची वेळ आणली. श्रीकृष्णाला अशा उत्पाताची अटकळ होतीच. त्यानें गोवर्धनपर्वत उचलला आणि त्याखालीं गोधनासह सर्व गोकुळ सुखरूप राखलें. मग इंद्र पश्चात्तप्त होऊन कृष्णाला शरण आला. श्रीकृष्णानेंहि त्याच्यावर दया दाखवून गवळ्यांना इंद्रपूजा चालू ठेवण्याचा आदेश दिला.

वैष्णव धर्म हा लोकधर्म होण्याच्यापूर्वीं इंद्राला फार महत्त्व होतें. तोच सर्वपूज्य होता. जसा उत्तर भारतांत तसाच दक्षिण भारतांतहि. पण पुढें त्याची जागा विष्णूनें घेतली आणि सगळे इंद्रोत्सव विष्णूच्या उत्सवांत रूपांतरित झाले. आजमितीस इंद्रपूजेचे अवशेष अधून मधून क्वचित् दिसतात. तमिळनाडमधला भोगीचा सण हा असाच एक इंद्रोत्सवाचा अवशेष आहे. महाबलिपुरम् या ठिकाणीं एका खडकाच्या पाठीवर गोवर्धन पर्वताच्या उद्धरणाचें चित्र कोरलेलें दिसतें. त्याचा अर्थच हा, कीं इंद्राचें माहात्म्य संपलें आणि विष्णूचा महिमा गाजूं लागला. संक्रांतीचा हा आदला दिवस तमिळनाडमध्यें हौसा-मौजा आणि गमती करण्यांत निघून जातो आणि दुसऱ्या दिवशीं संक्रांतीच्या मुख्य सणाला प्रारंभ होतो.

या दिवशीं संक्रमणाच्या पुण्यकालांत नदीचें स्नान करणें पवित्र आणि पुण्यप्रद मानतात. उत्तर भारतांत जें महत्त्व गंगेला, तेंच तमिळनाडमध्यें कावेरीला आहे. ती त्यांची ' भुक्ति-मुक्ति-प्रदायिनी ' लोकमाता आहे. त्या दिवशीं तंजाऊरजवळ तिरुवादी या गांवीं कावेरीच्या तीरावर फार मोठी स्नान-यात्रा भरते. ताम्रपर्णी नदीच्या कांठींहि अशीच गर्दी असते. वेदारण्यम् या ठिकाणीं लोक समुद्र स्नानासाठींहि जातात.

या दिवशीं घरोघरीं तीन पूजा असतात. मुख्य ती सूर्यपूजा. सूर्य हा चराचराला जविन देणारा देव. शिवाय तो आतां उत्तरायणाच्या मार्गाला

निघाला आहे. रोग, मृत्यु आणि पाप यांचें प्रतीक असलेलें दक्षिणायन संपून प्रकाशमय उत्तरायण सुरू झालें आहे. यापुढें सूर्य पृथ्वीला अधिक प्रकाश देईल. दिवस मोठे करील. आरोग्य व उत्साह वाढवील. म्हणून ही सूर्यपूजा करायची असते. त्याच्या जोडीनें वायूचीहि पूजा करतात. कां, तर समुद्रावर निर्माण झालेले पावसाचे ढग वारा शेताभातापर्यंत वाहून आणतो, याबद्दलची कृतज्ञता त्याच्या पूजेनें व्यक्त करायची. तिसरी पूजा वास्तुदेवतेची. वास्तुपुरुष प्रसन्न असला, तरच गृहजीवनांत सुख, शांति आणि सम्‍मृद्धि यांचा लाभ व्हायचा.

या दिवशीं गृहिणींचा कार्यक्रम अतिशय घांदलीचा असतो. त्या सूर्यपूजेसाठीं जिथें स्वच्छ ऊन पडतें, अशी घराच्या आवारांतली एखादी जागा निवडतात. ती गोमयानें सारवतात. त्यावर तांदुळाच्या पिठानें वर्तुळाकृति सूर्य-बिंब काढतात. त्याच्या दोहीं अंगीं दोन स्त्रिया रेखाटतात. या दोघी म्हणजे सूर्याच्या भार्या—संज्ञा आणि छाया होत. ग्रामललना गांवालगतच्या एखाद्या जलाशयावर स्नानाला जातात आणि ओलेत्यानेंच घरीं येतात. आल्यावर ओल्या अंगानेंच अंगणांत गोवऱ्यांच्या आगीवर खीर शिजत ठेवतात. खिरीला उकळी फुटली कीं, ‘ पोंगळ ओ पोंगळ ’ असा मोठ्यानें हाकारा करतात. खीर शिजली कीं, तें भांडें गणपतीच्या पुढें ठेऊन आधीं त्याला नैवेद्य दाखवितात. त्यांतल्या थोड्याशा खिरीचा गोग्रास घालतात. मग उरलेली खीर घरांतल्या माणसांना आणि इष्ट-मित्रांना वांटतात. अभिनंदनासाठीं एकमेकांच्या घरीं जाणें हा दुपारचा कार्यक्रम. त्या दिवशीं प्रत्येकानें भेटेल त्याला प्रश्न विचारायचा तो हा. ‘ पोंगळ शिजला का ? ’ आणि त्याचें उत्तरहि ठरलेलें. ‘ हो, शिजला.’ याच दिवशीं संध्याकाळीं पोंगळाचीं गाडगीं मडकीं शिरावर घेऊन समारंभानें ग्रामदेवतेच्या दर्शनाला जायचें असतें. वर्षभर ती ग्रामदेवता प्रसन्न आणि अनुकूल राहायची, तर तिलाहि पोंगळाचा नैवेद्य पोंचायलाच हवा.

संक्रांतीच्या दुसऱ्या दिवसाला आपण किंक्रांत म्हणतों. कोंकणांत या दिवशींच बायका सामुदायिक हळदीकुंकू करतात. तमिळनाडमध्यें या दिवसाला ‘ मट्टुपोंगळ ’ म्हणतात. या दिवशीं गाईची पूजा होते आणि सर्व गोधनाला

पोंगळाचा नैवेद्य मिळतो. या दिवशीं गुरांना सजवतात, नटवतात आणि वाद्यें लावून गांवभर त्यांची मिरवणूक काढतात. महाराष्ट्रांत जसा पोळ्याचा सण, तसाच हा तिकडे माट्टुपोंगळ. वर्षांतून एक दिवस गाई-बैलांची पूजा करून वर्षभर त्यांनीं आपल्या कुटुंबासाठीं केलेल्या कष्टांची कृतज्ञता व्यक्त करणें हा त्यांतला उद्देश. पशु, पक्षी आणि वृक्ष यांच्यापर्यंत आपल्या जिव्हाळ्याचे धागे पोंचवून भारतीय संस्कृतीनें 'विश्वीं विश्वंभरा'च्या अनुभूतीची एक वरची पायरी गांठली आहे.

तिकडच्या दंतकथेप्रमाणें गाय ही ब्रह्मदेवानें मानव जातीच्या शरीराची नित्य होणारी झीज भरून काढण्यासाठीं निर्माण केली आहे. किंबहुना ब्रह्मदेवच अमृताचें प्राशन करून गाईच्या रूपानें अवतरला आहे. या पहिल्या गोमातेच्या मुखांतून जो फेंस गळत होता, त्यांत अमृत होतें. तो फेंस एका शिवलिंगावर पडला आणि शंकराचीं सर्वांगें संतोषानें निवालीं. त्या दिवसापासून अग्नि, वायु, सुवर्ण यांचें जें पावित्र्य तेंच गोमुखांतून पडणाऱ्या फेंसाचेंहि मानलें गेलें. तिरूवमथुर, करूर, अवूर आणि पट्टीश्वरम् ही तमिळमधलीं स्थानें गोपूजेसाठीं विशेष समजलीं जातात.

### गजपर्व

तमिळनाडमध्यें खास स्त्रियांचें असें एक पर्व आहे; त्याला 'गजपर्व' म्हणतात. गजपर्व म्हणजे ऐरावत हत्तीचा उत्सव. भारताच्या संस्कृतींत हत्तीला एक विशेष स्थान प्राप्त झालें आहे. हत्ती हा लक्ष्मीचा सहोदर आहे. समुद्रमंथनांतून लक्ष्मीबरोबरच तो वर आला आणि स्वर्गाधिपति देवेंद्राचें वाहन बनला. तो स्वर्गवासी बनला, तरी त्याच्या जातीनें लक्ष्मीचा संबंध सोडला नाहीं. चित्रांत किंवा शिल्पांत जिथें लक्ष्मी असेल, तिथें गजराज आपलें अस्तित्व दाखवतातच. एखाद्याच्या दारीं हत्ती झुलूं लागला म्हणजे त्याच्या श्रीमंतीची परिसीमा झाली, अशी पुरातन काळापासून समजूत आहे. 'गजान्त लक्ष्मी' हा शब्द याच धारणेचा निदर्शक आहे. लक्ष्मीशीं अतूट संबंध राखल्यामुळें हत्ती हा राजवैभवाचेंहि प्रतीक ठरला आहे. प्राचीन काळच्या राजकीय महोत्सवांत 'हस्तिमंगल' नांवाचा एक उत्सव प्रचलित होता. त्या प्रसंगीं सारा राजवाडा शृंगारीत. वाड्यापुढल्या चौकांत सोन्या-

मनोमन असते. विविध प्रकारच्या रांगोळ्याहि काढतात. बहुधा घरचीं बायकामुलेंच हें सर्व करतात.

सगळ्या आराशींच्या मध्यभागीं विद्या-कलांची देवता सरस्वती बसवतात. तिची स्थापना एका मंगल कलशावर होते आणि मग नऊ दिवस सगळे पूजोपचार चालतात. प्रतिदिवशीं नवे भोग, नवीं व्यंजनें. त्या दिवसांत घरच्या मुलाबाळांची गोडधोड खाण्याची 'आलुकी' यथेष्ट पुरी होते. तिसऱ्या प्रहरीं हळदीकुंकू होतें. 'कोलुवु अमर्चिन देवी' म्हणजे 'कलारूपानें आविष्कृत आणि मंडित झालेल्या सरस्वतीच्या दर्शनाला या' असें घरोघरच्या सुवासिनींना निमंत्रण दिलें जातें. बायका जमल्या कीं पूजा आरती होते. घरची गृहिणी त्यांच्या ओट्या भरते. त्यांना प्रसाद देते. घरोघरच्या मुलीबाळी अगदीं सजून असतात. गडद रंगाच्या साड्या नेसणें आणि पाठीवर सोडलेल्या वेणींत नानारंगी फुलें गुंफणें हा तिकडच्या कन्या-वधूंचा मुख्य 'शिणगार' असतो. त्यांच्या सांवळ्या भालीं रक्तकुंकुमाचा टिळा विशेषत्वानें शोभतो. अशा सालंकृत नागर वधूंचे समुदाय जेव्हां छुमकत ठुमकत रस्त्यानें जाऊं लागतात, तेव्हां तो राजमार्ग कृतार्थ होतो, मंगलमय होतो.



चांदीचे अलंकार घालून गजदळांतल्या हत्तींची कतार उभी करीत. मग राजा स्वतः त्यांची पूजा करी अन् राजपुरोहित 'हस्तिमंगल' स्तोत्र म्हणे.

हीच गजपूजा दक्षिणेंतल्या स्त्रियांनीं घरांत लक्ष्मी नांदावी, आपलें घर धन-धान्यसमृद्ध व्हावें, या उद्देशानें सुरू केली. हें गजपर्व आपल्या वार्षिक कृत्यांत रूढ केलें. विशेषतः अय्यंगार ब्राह्मणांच्या घरीं याचा वसा घेतला गेला. कार्तिक पौर्णिमेपासून पुढें तीन दिवस हें गजपर्व चालतें. पहिल्या दिवशीं मातीचा हत्ती बनवून त्याची पूजा करतात. दुपारीं ब्राह्मणभोजन घालतात. सायंकाळीं हळदीकुंकू करतात. तीन दिवस पूजा-उत्सव केल्यावर चौथ्या दिवशीं सायंकाळीं घरची गृहलक्ष्मी हत्तीवर अक्षता टाकून त्याला एका चांदीच्या तबकांत घेते. मग त्याच्या विसर्जनाची मिरवणूक निघते. मिरवणुकींत बायका व मुलीच भाग घेतात. त्या सगळ्याजणी एका सुरांत 'लक्ष्मीपद' नांवाचीं गाणीं गात जातात. ही मिरवणूक जवळच्या एखाद्या बागेंत येते. तिथें एका वृक्षातळीं हत्तीला बसवतात. त्याच्या भोंवतीं बायका कोंडाळें करून बसतात. मग नाचतात, गातात अन् खिरापतीचे पदार्थ खाऊन आणि त्या मृण्मय हत्तीचें विसर्जन करून तिन्हीसांजा घरीं परततात.

## कोलुवु

असाच आणखी एक बायका मुलींचा वाजता गाजता उत्सव म्हणजे 'कोलुवु.' तमिळनाडमध्यें नवरात्र बसतें, त्यांतलें हें एक प्रमुख आकर्षण असतें. 'कोलुवु' म्हणजे तमिळ ललनांच्या अंगच्या कलाप्रवृत्तींना प्रोत्साहन देणारें महापर्वच होय. ही एक मातीच्या किंवा धातूच्या बाहुल्यांची आरास असते. तमिळनाडमधले लोक आपणाला आवडतील तसल्या अनेक बाहुल्या वर्षभर जमवून ठेवतात आणि नवरात्रांत त्यांना शृंगारून, सजवून त्यांचें प्रदर्शन मांडतात. दुकानांतल्यासारख्या मांडण्या करून आणि त्यांवर वस्त्रघड्या पसरून ही मांडावळ करतात. आपल्याकडचीं मुलें दिवाळींत किल्ले करतात, त्याप्रमाणें कुठें कुठें या पांचालीप्रदर्शनापुढें माती अन् वाळू यांच्या साह्यानें नगरें, किल्लेकोट, उद्यानें, नद्या, इत्यादि निसर्गदृश्येंहि उभारतात. शेजारच्या घरीं होईल त्यापेक्षां आपल्या घरची 'कोलुवु' आरास अधिक आकर्षक, प्रेक्षणीय अन् कलात्मक झाली पाहिजे, अशी स्पर्धाहि

मनोमन असते. विविध प्रकारच्या रांगोळ्याहि काढतात. बहुधा घरच्यी बायकामुलेंच हें सर्व करतात.

सगळ्या आराशींच्या मध्यभागीं विद्या-कलांची देवता सरस्वती बसवतात. तिची स्थापना एका मंगल कलशावर होते आणि मग नऊ दिवस सगळे पूजोपचार चालतात. प्रतिदिवशीं नवे भोग, नवीं व्यंजनें. त्या दिवसांत घरच्या मुलाबाळांची गोडधोड खाण्याची 'आलुकी' यथेष्ट पुरी होते. तिसऱ्या प्रहरीं हळदीकुंकू होतें. 'कोलुवु अमर्चिन देवी' म्हणजे 'कलारूपानें आविष्कृत आणि मंडित झालेल्या सरस्वतीच्या दर्शनाला या' असें घरोघरच्या सुवासिनींना निमंत्रण दिलें जातें. बायका जमल्या कीं पूजा आरती होते. घरची गृहिणी त्यांच्या ओट्या भरते. त्यांना प्रसाद देते. घरोघरच्या मुलीबाळी अगदीं सजून असतात. गडद रंगाच्या साड्या नेसणें आणि पाठीवर सोडलेल्या वेणींत नानारंगी फुलें गुंफणें हा तिकडच्या कन्या-वधूंचा मुख्य 'शिणगार' असतो. त्यांच्या सांवळ्या भालीं रक्तकुंकुमाचा टिळा विशेषत्वानें शोभतो. अशा सालंकृत नागर वधूंचे समुदाय जेव्हां छुमकत ठुमकत रस्त्यानें जाऊं लागतात, तेव्हां तो राजमार्ग कृतार्थ होतो, मंगलमय होतो.





# गिरिजन आणि हरिजन

भारतांत अनेक ठिकाणीं नीलपर्वत नांवाच्या टेकड्या दाखवतात. त्या प्रत्येक टेकडीच्या भोंवती कांही आख्यायिका आणि दंत-कथाहि घिरट्या घालतात. पण खराखुरा नीलगिरि आहे तो तामिळनाडमध्यें. हा पर्वत एकीएक नसून अनेक पर्वतांच्या रांगांनीं बनलेला महापर्वत आहे. इथे पूर्व-पश्चिम घाट एकमेकांना भिडतात. याचें पठार ५६०० फूट आहे. त्याची लांबी ३५ मैल आणि रुंदी २० मैल भरते. याची दक्षिण सीमा भवानी नदी आणि उत्तर सीमा मोयार नदी बनली आहे. या पर्वतावर घनदाट झाडी आहे, आणि डोंगर-दऱ्यांत जें असायचें तें सर्व कांहीं आहे. या पर्वतांत मानवी वस्ती फार प्राचीन काळापासून होती, हें आतां सिद्ध झालें आहे. इथें जुन्यांत जुनीं अशी दगड रचून बनवलेलीं थडगीं पाहायला मिळतात. हीं थडगीं टेकड्यांच्या पठारांवरच आढळतात. या थडग्यांच्या उत्खननांत शस्त्रास्त्रें, भांडीं अशा इतरहि अनेक वस्तु सांपडल्या आहेत.

या नीलगिरीवर दोन आदिवासी जमाती युगानुयुगें नांदत आल्या आहेत. एका जमातीचें नांव आहे 'तोडा' आणि दुसऱ्या जमातीचें नांव आहे, 'कुरुम्ब.' तोडांची वस्ती डोंगराच्या पठरावर असते; तर कुरुम्ब लोक नीलगिरीच्या उतारावर राहतात. या दोन जमातींमध्यें वांशिक दृष्ट्या साधर्म्य नाहीं. त्यांचे व्यवसाय भिन्न आहेत, चालीरीती भिन्न आहेत आणि जातीय प्रथाहि वेगळ्या आहेत. दुसऱ्या दृष्टीनें सांगायचें, तर या दोन जमातींचा उंदरा-मांजरासारखा संबंध आहे. उंदीर आणि मांजर या दोघांत कधीं

लढाई होत नाहीं; पण उंदीर मांजराला सदैव भिऊन आणि अंग चोरून असतात. तोडा जमातीचेंहि तसेंच आहे. ही जमातहि कुरुम्बांविषयीं भेणें-भाव सदैव मनांत वागवते. आणि त्याचें कारण एकच! कुरुम्बांना जादूटोणा करतां येतो. मूठ मारण्याचें तंत्र जमतें. आणि तोडांना त्यांतलें कांहीहि येत नाहीं. म्हणूनच कुरुम्बांच्या पुढें तोडांची मिशी सदैव खालीं असते. कुरुम्बांनीं जादूटोणा करून आपल्या वस्तींत रोगराई उत्पन्न करूं नये, म्हणून तोडा लोक सदैव त्यांना मुखलेप करीत असतात.

पण त्या दोघांमध्यें एक चाल सामान्य आहे आणि ती म्हणजे बहुपति-त्वाची. दोन्हीं जमातींतल्या बायका पुरातन काळापासून एकाच वेळीं अनेक पुरुषांशीं पत्नीधर्मानें वागत आल्या आहेत. एका कुळांत चार-पांच भाऊ असले, तर ती थोरल्या भावाबरोबर लग्न करते आणि त्याबरोबरच बाकीच्या भावांशींहि तें झालें असें मानते. एका स्त्रीनें एकाच वेळीं अनेक पति वरण्याचें सर्वांना परिचित असलेलें ठळक उदाहरण म्हणजे द्रौपदीचें. त्या लग्नाच्या वेळीं तो एक मोठा पेंचप्रसंगच निर्माण झाला होता. पण कुंतीनें त्याला अनुमोदन दिलें आणि व्यासांनी द्रुपदाची समजूत घालून त्याचेंहि मन वळविलें. त्यानंतर ती याज्ञसेनी द्रौपदी राजरोसपणें पांचहि पांडवांची भार्या झाली.

पण हें कांहीं एकुलतें एक उदाहरण नव्हे. भारतांतल्या अनेक जाती-जमातींत प्राचीन काळापासून आजतागायत अविच्छिन्न चालत आलेली ही एक प्रथा आहे. हिमालयांतली ‘ किन्नर ’ जात आणि त्याच्या पायथ्याची ‘ जौनसार बावर ’ ही जात यांच्यामध्येंहि बहुपतित्व रूढ आहे. सामान्यतः डोंगरांत राहणाऱ्या गिरिजनांमध्येंच ही चाल आढळून येते.

तोडा लोकांची एकंदर जनसंख्या सुमारें सातशें आहे. ती कधीं वाढतच नाहीं. उलट, झाली तर शतकाशतकाला तिच्यांत थोडी घटच होते. नेमकी हीच स्थिति, जौनसार बावरांचीहि आहे. त्यांचीहि जनसंख्या वाढतच नाहीं. एका स्त्रीचे अनेक पति असणें हेंच या लोकसंख्येच्या ‘ जैसे थे ’ चें कारण असलें पाहिजे. जमातींत मुलींची संख्या कमी असणें हें या बहुपति प्रथेचें

मुख्य कारण आहे. ही संख्या कमी असण्याचीं आणखी कांही कारणें संशोधकांनी दिलेलीं आहेत—

( १ ) मुलगी झाली तर जन्मतांच तिच्या मानेला नख लावणें, आणि तें नच जमलें तर तिची सर्व प्रकारें उपेक्षा किंवा हेळसांड करणें. तोडा लोकांत या दोन्ही गोष्टी होत्या अन् आहेतहि.

( २ ) दुसरें कारण प्रसूतीची अव्यवस्था आणि लोकभ्रमात्मक आचार. तोडा लोकांत हीहि गोष्ट अजून चालू आहे. मात्र चारपांच भावांनीं मिळून एकाच स्त्रीशीं लग्न केलें तरी त्यांच्यामध्यें भांडणतंटे होत नाहींत. प्रत्येकाची झोपडी वेगळी असते आणि ती बाई आळीपाळीनें सगळ्या झोपड्यांतला संसार सांभाळते. अर्थात् अशा स्थितींत जन्मलेल्या मुलाचें पितृत्व लग्नामुळें ठरणें शक्यच नसतें. म्हणून या तोडांनीं एक तोड काढली आहे. गरोदरपणीं सातव्या महिन्यांत जो पुरुष स्त्रीला विधिपूर्वक धनुष्यबाण अर्पण करतो, तो भावी मुलाचा बाप ठरतो. मुलींची संख्या कमी; त्यामुळें वाङ्निश्चयहि लहानपणींच करून ठेवतात. लग्न समारंभहि अगदीं साध्या पद्धतीनें होतो. नवऱ्या मुलानें आपल्या सासऱ्याला एक रेडा द्यायचा आणि कन्येचें पाणिग्रहण करायचें. सासऱ्यानें आपल्याकडचा एक रेडा वरदक्षिणा म्हणून द्यायचा आणि मुलीची पाठवणी करायची. कुरुम्बांचेंहि असेंच. लग्न समारंभाचे फारसें अवडंबर नाहीं. वधू-वर एकत्र येतात, परस्परांवर पाणी शिंपडतात, वधू उभय पक्षांतल्या लोकांसाठीं तंबाखूची लांबलचक विडी तयार करते, जमलेली मंडळी एकत्र जेवतात, कीं लग्नसोहळा समाप्त !

तोडा आणि कुरुम्ब हे शेजारी असले तरी भिन्न वंशाचे आहेत असें जें वर म्हटलें, त्याला महत्त्वाचें कारण आहे. कुरुम्ब हे काळे अन् कुरूप तर तोडा हे बहुतांशीं गोरे आणि नाकीं डोळीं नीटस. तोडा पुरुष चांगले उंच-निंच असतात आणि त्यांची आंगकाठीहि बळकट असते. ते दाढीमिशा वाढवतात, पण त्यांतूनहि त्यांचा तजेला उठून दिसतो. हा नीटसपणा स्त्री अन् पुरुष दोघांतहि आहे. घोंगडी हें त्यांचें महावस्त्र ! कोणत्याहि ऋतूंत घोंगडीचा आणि त्यांचा वियोग होणें नाहीं. 'कंबलवन्तं न बाधते शीतम्' हें सुभाषित जणूं तोडांनाच उद्देशून लिहिलें असावें.

हे लोक नीलगिरींत सर्वत्र विखुरलेले आहेत. त्यांच्या वस्तीला ‘ माड ’ असें म्हणतात. पांच सहा झोपड्या उभ्या झाल्या, की तें माड झालें. या माडांत कांहीं झोपड्या म्हशींच्यासाठीं असतात आणि एक झोपडी स्वतंत्रपणें दुभत्या-साठीं असते. तोडांच्या चरितार्थाचें प्रमुख साधन म्हणजे म्हशी. ते दुधाचा व्यवसाय करतात आणि म्हशींची जोपासना करण्यांतच सगळें आयुष्य घालवितात. या लोकांचे सर्व धार्मिक विधि, म्हशी आणि दूध यांच्या भोंवतींच गुंफलेले असतात. ‘ ओन ’ आणि ‘ तैर्किझी ’ हीं त्यांचीं उपास्य दैवतें. ओनला ते आपल्या जातीचा मूळ उत्पादक मानतात आणि म्हशींची जातहि



तोडांचें दुग्धमंदिर

त्यानेंच निर्माण केली असें सांगतात. दूधदुभत्याचें घर हेंच त्यांचें देवालय आणि त्याची ठेवरेव करणारा तो त्यांचा पुजारी. कोणत्याहि तोडाला दुग्ध-

व्यवसाय करण्यापूर्वीं एक दीक्षाविधि करावा लागतो. प्रथम तो झऱ्यावर जाऊन स्नान करतो. त्या झऱ्याचें पाणी पिऊन शुद्ध होतो. मग गोठ्यांत येऊन एक दिवा लावतो. तिथेंच एक ताकाचें भांडें असतें, त्याचें नांव 'मु.' मग तो त्या 'मु'ची पूजा करतो आणि अशाप्रकारें दुग्ध व्यवसायासाठीं 'दीक्षित' होतो. ते दुधाला अत्यंत पवित्र मानतात आणि म्हणूनच अपवित्र स्थितींत कधींहि दुग्धालयांत पाय ठेवीत नाहींत. दुधाची चोरीहि कधीं करीत नाहींत. जर एखाद्याच्या हातून तसलें कांहीं पाप घडलेंच, तर त्याला आपल्या गोठ्यांतला एक रेडा देवाला किंवा दुसऱ्या कुटुंबाला द्यावा लागतो.

तोडांच्या लग्नांत जसा रेड्याचा संबंध आहे, तसाच तो त्यांच्या अंत्य संस्कारांतहि आहे. मृताचा अंत्यविधि करतेवेळीं रेड्याचा शिरच्छेद हा एक आवश्यक विधि असतो. ती बलिदानाची पद्धतिहि 'घर रेडा कीं, घाल घाव' अशी नसते. त्या प्रकारांत तोडा तरुणांच्या शक्तीचाहि कस लावायचा असतो. ती एक बलस्पर्धाच असते म्हणा ना! त्यासाठीं निवडक तरुण कांबळ्यांचे बुरखे घेऊन हारीनें उभे राहातात. मग इतर लोक रेड्यांना त्यांच्या अंगावर सोडतात. रेडे जवळ आले कीं, बुरखेवाले तरुण त्यांच्यावर तुटून पडतात. भोंवतालचे लोक खूप आरडाओरडा करतात. रेडे गोंधळून जातात. त्यांतले कांहीं सैरावैरा पळतात तर कांहीं समोरच्या तरुणांच्या अंगावर धडक मारतात. आणि मग जें पशु–मानव युद्ध होतें, त्यांत एखादा शक्ति–युक्तीचा तरुण एखाद्या रेड्याला शिताफीनें आडवा आदळतो. आणि मग त्या रेड्याचें जें काय व्हायचें तें होतें!

### कुरुम्ब

तोडांच्या मानानें कुरुम्ब हे अत्यंत दरिद्री जीवन जगतात. पण या लोकांना आपल्या राजकीय इतिहासाचा अभिमान आहे. ते सांगतात, कीं एका काळीं गोवा ही राजधानी करून उभ्या कोंकणपट्टीवर आपली सत्ता गाजविणारे बनवासीचे कदम्ब राजे हे कुरुम्ब वंशांतले होते. दक्षिणेंतले यादव, बंगालमधले संताळ आणि पश्चिम किनाऱ्यावरचे अहीर, यांच्याशीं या कुरुम्बांचे लागेबांधे असल्याचें इतिहाससंशोधक सांगतात.

...ालय, ठाणे. स्थ...
दि. ...१.३.३...

कुरुम्बांची वाडीहि चार-पांच झोपड्यांचीच असते. या वाडीला ‘ कोम्बाई ’ म्हणतात. प्रत्येक कोम्बाईत एका ओट्यावर दोन उभे दगड पुरलेले असतात. त्यांना ते आपले पूर्वज समजतात. जें कांहीं शिजवायचें तें एकाच पानांत बसून खायचें, असा त्यांचा खाक्या असतो. प्रत्येक वाडींत एक ‘ मुदाळी ’ असतो. मुदाळी म्हणजे त्या जमातीचा रखवालदार. तो चेटूक करण्यांतहि पटाईत असतो. ‘ बदगा ’ ही त्यांच्या शेजारची आणखी एक आदिवासी जमात. प्रत्येक मुदाळीच्या कक्षेंत बदगांचीं कांहीं कुटुंबें असतात. कुरुम्ब हे तसे बळजोर लोक आहेत. त्यांनीं बदगांना त्रास देऊं नये म्हणून मुदाळी नेहमीं सावध असतो. हे बदगा लोकहि तोडांप्रमाणेंच कुरुम्बांना निरनिराळ्या वस्तूंची खंडणी लग्नप्रसंगीं आणि इतर वेळींहि देतच असतात.

कुरुम्बांचा दुसरा छंद मधमाशांचीं पोळीं गोळा करण्याचा. मधाचें पोळें कितीहि उंचावर किंवा कसल्याहि अडचणीच्या जागीं असो; हे लोक जिवावरचें साहस करूनहि तें हस्तगत करतील. एखाद्या कुरुम्बानें एखादें पोळें हेरलें, कीं तो त्याच्या खालीं दोन काठ्या पुरून ठेवतो. त्या काठ्या दिसल्या, कीं दुसरा कोणीहि त्या पोळ्याच्या वाटेला जाणार नाहीं. मध आणि डिंक विकणें आणि त्या वस्तूंच्या मोबदल्यांत आवश्यक या वस्तू विकत घेणें असा वस्तुविनिमयानें त्यांचा आर्थिक व्यवहार चालतो.

त्यांच्या मुख्य देवाचें नांव ‘ बिराप्पा. ’ हा धनगरांचाहि देव आहे. कुरुम्बांचा आणि धनगरांचा जातीय किंवा वांशिक संबंध आहे. कित्येक कुरुम्ब शिवभक्तहि असतात. त्यांच्या बायका कपाळीं भस्म लावतात. ‘ मुरनी ’ ही त्यांची स्त्रीदेवता. तिला ते शिवाची भार्या मानतात. त्यांचा आणखी एक नावाजता धंदा आहे. कुरुम्ब हे मोठे निष्णात वाजंत्री आहेत. बांसरी हें त्यांचें जातीय वाद्य. हिंदुधर्माशीं संपर्क आल्याकारणानें बऱ्याचशा हिंदु दैवतांनाहि ते आतां भजूं लागले आहेत.

### मलपुलयन

याच कुरुम्बांची आणखी एक पोटजात आहे. तिला ‘ मलपुलयन् ’ म्हणतात. यांच्यांत रजस्वलेचे नियम अत्यंत कठोर असतात. जेव्हां एखाद्या

मुलीला प्रथम रजोदर्शन होतें तेव्हां तिला ‘ विटाळ घरांत ’ जाऊन राहावें लागतें. हें झोंपडें वाडीच्या बाहेर जरा दूरच असतें. ही मुलगी तिथें तब्बल एक महिना म्हणजे तीस दिवस एकांतवासांत काढते. या मुदतींत तिनें कोणत्याहि पुरुषाचें तोंडहि बघायचें नसतें. तीस दिवस तिनें अस्नातच राहायचें. एकतिसाव्या दिवशीं स्नान करून तिचा दुसरा ‘ गृहप्रवेश ’ व्हायचा. कुटुंबांतल्या लोकांनीं मग तो दिवस सणासारखा मानायचा. त्या दिवशीं त्या घरांत ज्ञातिभोजन व्हायचें.

कलियन आदिवासींतहि अशीच चाल आहे; पण ते फक्त त्या मुलीला पंधरा दिवसच वेगळ्या झोंपडींत ठेवतात. म्हणजे त्यांनीं तिची अर्धी शिक्षा कमी केली, असें म्हटलें पाहिजे. सोळाव्या दिवशीं स्नान करून आणि डोक्यावर मडकें घेऊन ती घरीं येते. तिनें त्या दिवशीं स्वयंपाक करून घरच्या आणि शेजारच्या बायकांना जेवायला वाढलें, कीं तिची संपूर्ण शुद्धि झाली.

यांच्यांत बालविवाहाची पद्धत नाहीं. मुलें मुली वयांत आल्यावरच त्यांचीं लग्नें लावतात. कुरुम्ब जातींत देज देण्याची पद्धत नाहीं. फक्त नवरीला एक साडी दिली, कीं काम भागतें. लग्नांत केशराच्या पाण्यांत बुडवलेली एक दोरी नवरीच्या गळ्यांत बांधतात. आपल्याकडे मंगळसूत्राचें जें महत्त्व तेंच कुरुम्बांत या दोरीचें. त्यांचें लग्न कसें छाटछूट असतें. पण पुलयनांत मात्र लग्नसमारंभ तीन दिवस चालतो आणि मुलीला व तिच्या आईला भात, लुगडीं आणि चिटें असें देज द्यावें लागतें. पुलयनांतलें लग्न रात्रींच लागतें. लग्नाला दिवस वर्ज्य असतो. लग्नांत नवरानवरी एका ताटांत जेवतात आणि एकमेकांना घासहि देतात.

मामेबहीण आणि आतेभाऊ यांच्यांत लग्न करण्याची चाल बहुतेक ठिकाणीं आढळते. ‘ आत्या ’ हा एक सासूचाच पर्यायवाचक शब्द आहे, यावरून ही गोष्ट कळून येईल. अशा लग्नांत मुलीची आत्या हीच तिची सासू होते. पण चुलतभावंडांत लग्नें करण्याची चाल या मलपुलयनांत आहे. अत्यंत तुरळक आढळणारी अशी ही चाल आहे. दुसरी गोष्ट विधवाविवाहाची. मलपुलयनांत धाकट्या भावाच्या विधवेशीं थोरला भाऊ लग्न करूं शकतो.

अन्यत्र मात्र याच्या उलट आहे. म्हणजे थोरल्या भावाच्या विधवेशीं धाकटा भाऊ लग्न करतो. ' ही चाल महाराष्ट्रांतल्या जवळ जवळ सर्व अब्राह्मण जातींत दिसून येते, ' असें श्री. इरावती कर्वे सांगतात. उत्तर हिंदुस्थानांत थोरल्या दिराला जेठ म्हणजे ज्येष्ठ म्हणतात आणि धाकट्याला देवर म्हणतात. तदनुसार जेठाची बायको ती जेठाणी अन् देवराची बायको ती देवराणी ठरते. देवराणीला म्हणजेच धाकट्या भावजयीला जेठ हा सासऱ्या सारखा असतो आणि ती त्याला सुनेप्रमाणें असते. दुर्दैवानें जेठाणी विधवा झाली, तर ती धाकट्या दिराशीं पुनर्विवाह करूं शकते. या प्रघाताला ' दियेरवटूं ' असें नांव आहे. महाभारतांत धर्मराजानें या प्रघाताला मान्यता दिलेली आहे. तो म्हणतो—

> गुरोरनुप्रवेशो हि नोपघातो यवीसयः ।
> यवीयसोऽनुप्रवेशो ज्येष्ठस्य विधिलोपकः ॥
>
> —म. भा. आदि. २१३.३२

' धाकट्या भावानें थोरल्याच्या मागून त्याच्या स्त्रीशीं संबंध केल्यानें थोरल्या भावाची प्रतिष्ठा कमी होत नाहीं; पण धाकट्यामागून थोरल्यानें तसें करणें हें मात्र विहित नव्हे. '

पण धर्मराजानें दीर-भावजयीचा हा जो संबंध विधियुक्त म्हणून सांगितला, त्याच्या उलट मलपुलयनांची धर्मकल्पना असावी. या जमातींत व्यभिचाराचा विधिनिषेध नाहीं. स्त्रीपुरुषांचा संकर आणि सावळागोंधळ बराच चालतो.

### काणीकार

याउलट व्यभिचार होऊं न देण्याविषयीं कटाक्ष बाळगणारी, व्यभिचार म्हणजे महापाप समजणारी, अशी एक आदिवासी जमात तमिळनाड आणि त्रावणकोर या भागांत वास्तव्य करते. काणीकार या नांवानें हे लोक ओळखले जातात. व्यभिचार उघडकीस आला, कीं जमात एकत्र जमते. व्यभिचारी पुरुषाला झाडाच्या फांदीस उलटा टांगून खालीं मिरच्यांची धुरी करतात. ती तिखट धुरी त्या पुरुषाच्या नाकातोंडांत घुसून त्याचा जीव कासावीस करते.

मग त्या पुरुषाला मागेंपुढें झोके देतात. शिवाय पंचवीस फटकेहि मारतात. व्यभिचारी स्त्रीला हें असलें ‘ धूम्र दिव्य ’ करावें लागत नाहीं; पण पंधरा फटके मात्र खावे लागतातच.

हे लोक एकपत्नी व्रतानें वागणारे आहेत. म्हणजेच हे एकाहून अधिक बायका करीत नाहींत. दुसरी बायको करण्याचा प्रसंग आलाच तर पहिलीच्या बहिणीशींच लग्न करतात. पत्नी मेल्यानंतरहि तिच्या बहिणीशीं लग्न करण्याचाच रिवाज आहे. हेहि रजोदर्शन झालेल्या मुलीला घरापासून दूर अशा एका झोपडींतच ठेवतात. मात्र तिला ही शिक्षा सहा दिवसच भोगावी लागते. सातव्या दिवशीं स्नान करून घरांत आल्यावर भगतानें दिलेला अंगारा ती आपल्या कपाळीं लावते आणि शुद्ध होते. गर्भारपणीं सातव्या महिन्यांत हे ‘ वयरूपोंगळ ’ नांवाचा एक संस्कार करतात. या संस्कारांत सूर्याला खिरीचा नैवेद्य दाखवायचा असतो. यांची मिळकत मुलगे आणि भाचे यांच्यामध्यें सारख्या प्रमाणांत विभागली जाते. भाचे नसतील तर सगळा वारसा मुलाकडे येतो. या लोकांत बापाकडून पिढ्या सांगण्याची वहिवाट नाहीं. त्या आईकडून सांगितल्या जातात. मुलांचा संबंध बाप-आजा यांच्याशीं न जोडतां आईच्या माहेराशीं जोडला जातो. मातृसत्ताक कुटुंबपद्धति आणि पितृसत्ताक कुटुंबपद्धति या दोन्ही पद्धतींचें या लोकांमधलें हें चमत्कारिक मिश्रण आहे.

उत्तरेच्या कित्येक आदिवासींत तरुण मुलांमुलींसाठीं एक वेगळें शयनगृह असतें. त्याला ‘ घोट्टुल ’ अशी संज्ञा आहे. मुलें वयांत आलीं, कीं रात्रीं झोपायला त्या घोट्टुलांत जातात. त्यांतूनच पुढें मुलगा आपली जन्माची जोडीदारीण निवडतो किंवा मुलगी आपला जीवनसाथी पसंत करते. काणीकारांमध्येंहि अशीच प्रथा आहे, पण ती वेगळ्या पद्धतीची. यांचीं घोट्टुलें मुलामुलींच्यासाठीं स्वतंत्र असतात. अविवाहित तरुणांच्या शयनगृहांत बायकांना जाण्याची मनाई असते. काणीकार तरुण फक्त जेवणापुरेसेंच आपल्या घरीं जातात आणि बाकीचा सर्व काळ आपल्या घोट्टुलांत घालवतात. उद्योगधंद्यासाठीं तिथूनच जायचें आणि तो आटोपून तिथेंच परत यायचें. अविवाहित मुलीहि आपापल्या घोट्टुलांत याच पद्धतीनें वागतात. त्यांच्या त्या घरांत पुरुषांना जाण्याची बंदी असते.

हे लोक पितृपूजक आहेत. शिवाय ते अगस्त्यालाहि आपला देव मानतात.

## उरळी

नीलगिरींतल्या कांहीं आदिवासींबद्दल मीं वर सांगितलें. अशीच 'वेलची' डोंगरावर राहणारी आणखी एक आदिवासी जमात आहे. हा वेलची डोंगर त्रावणकोर आणि मद्रास यांच्या सीमेवर आहे. या लोकांना 'उरळी' असें नांव आहे. यांच्यासंबंधीं विशेष गोष्ट ही, कीं हे मूळचे आदिवासी नव्हते. पांड्य राजांच्या कारकीर्दींत हे नगरवासी जनच होते. त्यांच्याकडे पांड्य राजांच्या मस्तकावर छत्र धरण्याचें काम होतें. यांच्या हातून काय अपराध घडला न कळे; पण एक दिवस पांड्य राजा यांच्यासह या डोंगरांत आला आणि या छत्रधारी सेवकांना इथेंच सोडून निघून गेला. तेहि मग मदुरेला जाण्याच्या भानगडींत पडले नाहीत. त्यांनीं इथेंच म्हणजे या डोंगरावर आपलें बस्तान मांडलें आणि तिथें आपल्यापुरतें एक स्वतंत्र राज्य निर्माण केलें. तो डोंगर वेलचीच्या लागवडीला उपयुक्त आहे, असें वाटल्यावरून त्यांनीं तिथें वेलचीची लागवड केली आणि अशा रीतीनें आपला उपजीविकेचाहि प्रश्न सोडवला. त्याच छत्रधारी सेवकांचे वंशज म्हणजे आजचे हे उरळी.

डोंगराच्या उतारावर यांची वस्ती असते. यांच्या झोपड्या जमिनीवर आणि झाडावर अशा दोन ठिकाणीं असतात. तिथल्या परिस्थितीमुळें त्यांना असा हा दुहेरी निवारा करावा लागतो. त्या डोंगरांत उरळींच्या प्रमाणेंच हत्तींचीहि वस्ती आहे. हे हत्ती माजाला आले, कीं सगळ्या डोंगरांत धुमाकूळ घालतात. या धुमाकुळांत झाडेंमाडें तर उद्ध्वस्त होतातच; शिवाय उरळींच्या झोपड्याहि जमीनदोस्त होतात. हत्तींचा उन्मत्त कळप चाल करून आला, कीं सर्वनाशच म्हणून समजावें ! आपल्या वस्तीच्या शेजारीं त्यांची एक सार्वजनिक झोपडी असते. तिचा उपयोग ते मंदिरासारखा करतात. त्यांचें सामुदायिक नृत्यहि त्याच झोपडींत होतें. तिथें एक ढोल ठेवलेला असतो. जंगली हत्तींचा कळप वस्तीच्या रोखानें येत आहे असें कळलें, कीं कोणी तरी तो ढोल वाजवून सर्व लोकांना सावधागिरीचा इशारा देतो. मग तें अस्मानी संकट टळून जाईपर्यंत हे लोक आपल्या बायकामुलांसह वृक्षावरच्या

आपल्या झोपडींत जाऊन बसतात. हत्तींचा कळप त्यांच्या झोपड्यांना बगल देऊन गेला, तर देवच पावला ! पण समजा, त्यानें झोपड्या तुडवल्याच तर उरळींना त्या पुन्हा उभारायलाहि वेळ लागत नाहीं.

निसर्गाच्या उत्पातांना आणि हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यांना तोंड देत देत उरळींना आपलें जीवन कंठावें लागतें. पण तरीहि ते कधीं निराश आणि दुर्मुखलेले दिसायचे नाहींत. त्यांचे चेहरे काळे कुळकुळीत खरे; पण ते सदैव प्रसन्न आणि हंसतमुख असतात. उरळी स्त्रिया तर नाजूक अन् आकर्षक असतातच; पण पुरुषांचे चेहरेहि जरासे नाजूकच दिसतात. हे लोक शिकार करण्यांत मोठे पटाईत आहेत. धनुष्यबाणांच्या सहाय्यानें ते शिकार करतात. त्यांचें धनुष्य दुहेरी दोरीचें असतें.

यांच्यांत साटेंलोटें करण्याची पद्धत आहे. म्हणजे आपली बहीण दुसऱ्याला द्यायची आणि त्याची बहीण आपल्या घरीं आणायची. त्यामुळें ज्यांना बहिणी नाहींत, त्या तरुणांचें लग्न होणें कठीण जातें. पूर्वीं तर प्रत्येक उरळी जितक्या बहिणी असतील तितक्या स्वतःला बायका करी. पण आतां ती संख्या दोहोंवर आणून ठेवली गेली आहे. याच्या उलट विरळा कां होईना; पण बहुपतित्वाची म्हणजे एका स्त्रीनें अनेक पति वरण्याची चालहि या लोकांत आढळते.

हे लोक आपल्या बायकोला प्रसूतीच्या वेळीं दूरच्या एका वृक्षगृहांत नेऊन ठेवतात. त्या बांक्या प्रसंगीं कोणीहि त्या आसन्नप्रसवेला मदत करीत नाहींत. आजूबाजूच्या बायका तिथें जातात. पण दूर अंतरावर उभ्या राहूनच तिला ज्या कांहीं सूचना द्यायच्या त्या देतात. त्यामुळें प्रसूतीचें सगळें तंत्र तिला एकटीलाच स्वतंत्रपणें हाताळावें लागतें. आश्चर्याची गोष्ट ही, कीं नवरा प्रसूतीचें अशौच एकवीस दिवस पाळतो आणि त्या अवधींत कांहींहि काम न करतां नुसता हातापायांची जुडी करून बसून राहतो.

भात हें या लोकांचें मुख्य अन्न आहे. डोंगराच्या कांहीं भागांतलें जंगल तोडून आणि तें जाळून हे त्या ठिकाणीं भात पेरतात. त्यामुळें यांची शेती एका जागीं नसते. यावर्षीं या डोंगरखोऱ्यांत तर दुसऱ्या वर्षीं डोंगराच्या दुसऱ्या

पालथाणाला. यांच्यांतहि उच्चनीच भाव किंवा स्पर्शास्पर्श भावना आलेली आहेच. हे मन्नान आणि पलियान या लोकांच्या हातचें जेवीत नाहींत.

## माडिगा

तमिळनाडमधली एक हरिजन जमात म्हणजे 'माडिगांची.' माडिगा हे आपल्याकडच्या मांगांच्या बरोबरीचे आहेत. तशा पूर्वास्पृश्य हरिजन जमाती तमिळनाडमध्येंहि पुष्कळ आहेत; पण त्यांतल्या माडिगांविषयीं एवढ्याचकरितां लिहायचें, कीं या लोकांचा सवर्णांशीं सांस्कृतिक संबंध आहे. माडिगा हे पट्टीचे कथा सांगणारे आहेत. माडिगा नसेल तर पोलेरम्माची जत्रा होणारच नाहीं. पोलेरम्मा आणि तत्सम इतर मारी देवता यांचीं पुराणें आणि महात्म्यें या माडिगांच्या संग्रहीं असतात. एखाद्या देवाच्या उत्सवांत जसें कीर्तन हें एक आवश्यक अंग असतें, त्याचप्रमाणें माडिगांच्या लयबद्ध सांगितल्या जाणाऱ्या कथाहि त्या ग्रामदेवतेच्या जत्रेचें एक अनिवार्य अंग आहे. पोलेरम्माची ही जत्रा वर्षातून एकदा होते, किंवा प्रसंगोपात्त गांवांत जरी–मरी उत्पन्न झाली तर त्याहि वेळीं होते. माडिगा, गांवचा धोबी आणि गांवकामगार येट्टी असे तीघे मिळून गांवभर या जत्रेची खबर देतात. गांवाच्या मध्यभागीं एका कोऱ्या भांड्यांत हळद, कोळसा आणि भात हे पदार्थ घालून तें भांडें एका जागीं ठेवतात.

ही जत्रा सामान्यतः चार दिवस चालते. या वेळीं गांवांतलीं माणसें पोलेरम्माला पूर्वीं केलेले नवस फेडतात आणि नवे करतात. बलिदानहि भरपूर होतें. मुख्य बलिदान रेड्याचें असतें आणि त्याच्या मानेवर घाव घालण्याचें 'धर्मकृत्य'हि माडिगाच करतो. तो देवीच्या कथा सांगायला उभा राहिला, कीं त्याच्या सभोंवतीं लहान-थोर माणसांची सभा घनदाट होते. माडिगा अशा कांहीं अद्भुत कथा रंगवून सांगतो, कीं त्या ऐकण्यासाठीं आबाल वृद्धांनीं जिवाचे कान करावे. बोलतांबोलतां त्याच्या अंगांत वीरश्री संचारते. त्याच्या मानेच्या आणि कपाळींच्या शिरा फुगतात. डोळे गुंजावर्ण होतात. हातवाऱ्यांत दमदारपणा येतो. आणि मग ती देवीची कथा शेवटच्या उत्कर्ष बिंदूवर नेतां नेतां तो एकदम पुढें झेपावतो आणि त्याच बेभान आवेशांत बलिदानाच्या रेड्याचें मस्तक धडावेगळें करतो.

माडिगाच्या अंगांत कथाप्रसंगीं वीरश्री संचरते ती उसनी नसून आनुवंशिक आहे. माडिगांना पुरातन काळापसून वीरपरंपरा लाभलेली आहे. ते अनेक युद्धांत 'उसिण्या घाई' झुंजले आहेत आणि प्रसंगीं स्वतःचें बलिदान करूनहि निर्वाण पावले आहेत. माडिगांच्या अशा पूर्वजांची कथा तमिळनाडमधल्या धनगरांच्या पुराणांत वर्णिलेली असून तिचें कथनहि माडिगांच्याच मुखांतून आजवर होत आलें आहे—

" छेन्निया बालुदु नांवाचा एक धनगर राजा होता. त्याच्यावर एकदा लढाईचा प्रसंग आला. त्या लढाईत त्यानें माडिगांची मदत मागितली. माडिगा आपल्या तलवारी परजून धावून आले आणि वीरश्रीनें लढले. छेन्निया बालुदुला त्यांनीं विजय मिळवून दिला. दुसऱ्या दिवशीं त्यानें सर्व सैनिकांना श्रमभोजन द्यायचें ठरवलें. तो आपल्या प्रधानाला म्हणाला.

" प्रधानजी ! सर्व वीरांना मेजवानीसाठीं बोलावून आणा. माडिगांना सुद्धा बोलवा. आज मी माडिगांची अस्पृश्यता नष्ट करून टाकणार आहें. सर्वांची अंगत पंगत करणार आहें. "

पण प्रधानाला तें रुचलें नाहीं. तो होता कावेबाज. त्यानें माडिगावीरांना निमंत्रण द्यायला जाण्याचें नुसतें ढोंग केलें; पण प्रत्यक्षांत त्यांना मेजवानीचा पत्ताहि लागूं दिला नाहीं. पानें मांडायच्या वेळेला छेन्निया बालुदूनें विचारलें. 'माडिगा कुठें आहेत ?'

प्रधान हात जोडून म्हणाला, 'ते आंघोळ करताहेत सरकार'. पुन्हा थोड्या वेळानें राजाचा तोच प्रश्न. पुन्हां प्रधानाचें उत्तर—'ते मुद्रा टिळे लावताहेत सरकार.' तिसऱ्याहि वेळीं त्यानें असेंच कांहींतरी खोटें नाटें सांगितलें.

शेवटीं छेन्निया कंटाळला. शिजवलेलें अन्नहि निवून चाललें. त्यानें मग इतरांच्या पंगती बसविल्या. त्यांना जेवायला वाढलें आणि माडिगांचें अन्न बाजूला काढून ठेवलें. ही गोष्ट माडिगांना समजली. ते सगळे घाईगर्दीनें भोजनमंडपाकडे आले. पाहातात तों, सैनिकांच्या पंक्ति जेवताहेत आणि आपलें अन्न तेवढें बाजूला काढून ठेवलेलें आहे. ते राजाला म्हणाले.

२८३०८
२६२
२५/११/६०

" महाराज, खांद्याला खांदा लावून लढतांना, तुमच्या रक्तांत आमच्या रक्ताच्या धारा मिसळतांना आमची अस्पृश्यता तुम्हाला खुपली नाहीं. जेवायच्या वेळेला मात्र तुम्हीं ती पुढें आणलीत."

छेन्नियानें वस्तुस्थिति सांगितली. सर्वांची एक पंगत करण्याचा आपला विचार होता, असेंहि सांगितलें, पण माडिगांना तें पटलें नाहीं. ते म्हणाले, 'एका लढाईनें युद्ध संपलें नाहीं. अजून लढाया व्हायच्या आहेत. आम्ही न जेवतांच पुढच्या मोहिमेवर जाऊं.' छेन्निया म्हणाला, 'तें चालायचें नाहीं. तुम्ही आधीं मुकाट्यानें जेवा.' माडिगा म्हणाले, 'आम्ही जेवणार नाहीं.' छेन्नियानें 'ठीक आहे' म्हटलें आणि त्यांना आपल्या सेनादळांतूनच निरोप दिला. छेन्नियाचा मोठा भाऊ 'कतमराजू' नांवाचा होता. माडिगा आपलें गाऱ्हाणें घेऊन त्याच्याकडे गेले; पण तोहि त्यांच्यावर रागावला. माडिगांना तो आपला अपमान वाटला. ते सगळे तिथून एका मैदानांत आले अन् त्यांनीं आपापल्या तलवारी हवेंत उंच फेंकल्या आणि त्यांच्याखालीं आपल्या निधड्या छात्या उघड्या केल्या. ते सगळे उरीं घाव लागून पडले आणि मरण पावले. त्याच क्षणीं त्यांना स्वर्गाचीं द्वारें उघडलीं. या वीर मरणानें ते सगळे 'वीरलु' बनून धनगरांच्या जातीला उपास्य देव ठरले. ज्या ठिकाणीं ही हाराकिरी झाली, त्या ठिकाणीं आजहि एक दगड दाखवितात. लग्नप्रसंगीं ह्या वीरलूंची पूजा करण्याची धनगरांत पद्धत आहे. नवविवाहित दंपतीच्या संततींत वीरलूंचें तेज आणि सामर्थ्य उतरावें, ही त्या पूजेच्या मागची भावना असते.

'मथम्मा' ही खास माडिगांची देवता. दक्षिणेंत ज्या 'सात बहिणी' नांवाच्या देवता आहेत त्यांतली एक मथम्मा आहे. माडिगांच्या वस्तींत तिच्यासाठीं एखादें छप्पर उभें केलेलें असतें. महाराष्ट्रांत खंडोबाची जशी मुरळी, तशी माडिगांमध्यें या मथम्माची एक 'बसवी' असते. ती वृक्षाशीं लग्न लावते आणि सदैव मथम्माच्या आवश्यांत राहाते. माडिगा लोक त्या बसवीला साक्षात् मथम्माची मूर्ति समजतात. जत्रेच्या वेळीं मथम्मा तिच्या अंगांत येते. घुमत घुमत माडिगांचें चुकलें माकलें सांगते आणि सुखी भविष्यकाळाचा दिलासाहि देते. एक बसवी देवाघरीं गेली, कीं तिच्या जागीं दुसरी बसवतात, तो विधि मात्र कठोर आणि भयावह असतो.

जातींतून एखाद्या चांगल्या मुलीची प्रथम निवड करतात. मग एक वारुळ खणून त्या खळग्यांत तिला बसवतात. तिच्या डोक्यावर उलटी टोपली ठेवतात. मग माडिगांतला कथेकरी तिला तिच्या पूर्वी ज्या 'मथम्मा' झाल्या त्यांच्या कथा सांगतो आणि या सगळ्या दिव्यांतून ती पार पडली, कीं मग मथम्मा म्हणून तिची स्थापना होते. मग सर्व माडिगा जातां येतां भक्तिभावानें तिला प्रणाम करूं लागतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११४२१
शाखा



ग्रं. डॉ. स्वकमत.
२६३०५ क्र.
२६२ दि. १६/११/८०

REFBK-0011421

REFBK-0011421